म. ग्रं. सं. ठाणें
विषय चरित्र
सं. क्र. ३५४
RFFBK-0017809

अब्दुल हमीद



السلطان عبد الحميد خان

भारतभूषण ग्रंथप्रसारक मंडळ.

तुर्की लोकमताचा

# अस्त आणि उदय

अथवा

## अब्दुल हमीद.

( पूर्वार्ध )



REFBK-0017809

लेखक—रा. कृ. का. फडके.

प्रिंटर आणि पब्लिशर

पी. बी. पाठक आणि कंपनी.

'पाठक कंपनी प्रेस' ठाकुरद्वाररोड मुगभाटलेन मुंबई नं. ४

( सर्व प्रकारचे हक्क प्रकाशकाने स्वाधीन ठेविले आहेत. )

किंमत १२ आणे.

नवीन ! विक्रीस तयार. मोठी सवलत !!

## मद्रासचे सुप्रसिद्ध देशभक्त डॉ. सुब्रह्मण्य अय्यर

यांचें चरित्र फोटोसह लेखक कृ. का. फडके. यांत डॉक्टरसाहेबांनीं अमेरिकेचे प्रेसिडेंट डॉ. वुइल्सन यांस पाठविलेलें पत्र व त्या संबंधानें त्यांनीं दिलेला सणसणीत जबाब वगैरे प्रसिद्ध होणाऱ्या दिवसापर्यंतची समग्र हकीकत दिली आहे. किं. ८६ आणे. स- किं. ८३ आणे. ट. ख. वेगळा.

## हिंदुस्थानच्या सद्यःस्थितीचें चित्र.

लेखक—अं. दा. काळे. आपल्या देशांत संपत्ति किती होती व आतां आमच्या उद्योगधंद्याची कशी दैना झाली याचें ज्ञान हें पुस्तक वाचल्यानें बरेंच होईल. किं. ८८ आणे, स. किं. ८४ आणे. खर्च वेगळा.

## प्रख्यात नट बालगंधर्व.

यांचें चरित्र सुंदर आर्टपेपरवरील ४ फोटो. ग्लेझ कागदावर छापलेली पृ. ६०, किं. ८६, स. किं. ८३. ट. ख. वेगळा.

## प्रणयकुंज.

हें चार अंकी गद्य नाटक निरनिराळ्या प्रमुख वृत्तपत्रांनीं नांवाजलेल्या श्री. केयूरकांच्या ओजस्वी लेखणींतून उतरलेलें आहे. ही प्रणयाची सुंदर बाग कोणाहि श्रमलेल्या जीवास रंजविण्यास समर्थ आहे. हें नाटक रंगभूमीवर लवकरच येईल. किं. ८१२ आणे, स. किं. ८६ आणे. ट. ख. वेगळा.

वरील ४ पुस्तकें एकदम मागविणारास पो. व्ही. पी. खर्च माफ.

आमचेकडे असलेलीं पुस्तकें चातुर्मासाकरितां सवलतीनें मिळतात. अर्ध्या आण्याचें तिकीट पाठवून नवीन लिस्ट मागवा.

**पी. वी. पाठक आणि कंपनी.**

मुगभाटलेन, ठाकुरद्वाररोड, गिरगांव मुंबई नं. ४.

### तुर्की लोकमताचा

# अस्त आणि उदय

अथवा

# अबदुल हमीद.

## उपोद्घात.

एके काळीं तुर्की साम्राज्यानें सगळ्या युरोपखंडांत आपला दरारा गाजविला होता असें इतिहासावरून दिसतें. हें साम्राज्य इ. स. १६६२ सालीं उच्चातम शिखरास पोंचलें होतें. त्यावेळीं युरोपांतील सर्व राजे तुर्की तरवारीला थरथर कांपत होते ! पण 'नीर्गच्छत् युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण' या न्यायानें हें एवढें साम्राज्य इ. स १८७६ सालीं ह्मणजे जवळ जवळ तीनशें वर्षांत त्याच युरोपांत नाममात्र होऊन राहिलें आहे. तीस चाळीस वर्षांपूर्वी शाळेंत अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांस युरोपच्या नकाशांत जें तुर्की राज्य दिसलें असेल तोच विद्यार्थी आज तोच नकाशा पाहूं लागेल तर

तो विस्मयानें चकित होऊन जाईल. ईश्वरी नेमानेम काय आहे पहा. ज्या साम्राज्याकडे वाकड्या नजरेनें पाहण्याची कोणाची छाती नव्हती त्याच साम्राज्याचें दुर्दिन येतांच आजूबाजूच्या मांडलिकांनीं लहान लहान लचके तोडले व कित्येक प्रांत स्वतंत्र होऊन राहिले. एके वेळीं युरोपखंडांतील प्रबळ खिस्ती राष्ट्रांत असा प्रश्न येऊन पडला होता कीं, या मुसलमानी धर्माच्या बादशाहीस युरोपांतून हाकलून काढावी किंवा कसें ? याला ह्मणतात दैवाचा तडाका ! ! ! युरोपियन राष्ट्रांत विद्येचा प्रसार होऊन सुधारणा जारी होऊं लागल्या पण तुर्कीसाम्राज्य आपल्या पूर्वीच्याच शिस्तीस चिकटून राहिलें त्यामुळें त्या साम्राज्याचा असा नाश झाला असें सांगण्यांत येत आहे. एके काळीं सगळ्या जगाला भारी झालेल्या साम्राज्यांतील लोकांस आजूबाजूला काय चाललें आहे हें दिसूं नये हा तरी दैवाचाच परिणाम नव्हे काय ? असो अबदुल हमीद नांवाचा बादशहा इ. स. १८७६ सालीं गादीवर आला याच्या पूर्वी जे बादशहा गादीवर बसले त्यांनी राज्याचा सर्व कारभार प्रधानांच्या स्वाधीन केला होता. त्यांची व त्यांच्या राण्यांची यथास्थित चैन चालली ह्मणजे हे बादशहा सहसा प्रधानांच्या कारभारांत हात घालीत नसत. पण अबदुल हमीद हा महाराष्ट्रांतील दुसऱ्या बाजिरावाप्रमाणें प्रधानासंबंधानें संशय बाळगणारा असल्यामुळें त्यानें सर्व कारभार आपल्याच हातीं घेतला होता. याच्या कारकीर्दीत तुर्की साम्राज्याची इमारत पार ढासळून पडली

अथवा नवी इमारत बांधतांना जुनी पाडावीच लागते या न्यायानें अब्दुलनें जी इमारत पाडली ती सुशिक्षित तुर्की लोकमतानें पुनः पायाशुद्ध उभारण्याचा प्रयत्न केला असेंही ह्मणतां येईल.

आज रशियांत रक्ताचा एक थेंबही न सांडतां जी राज्यक्रांति झाली तशाच प्रकारची राज्यक्रांति तुर्की लोकमतानें अबदुल हमीदच्या कारकीर्दीत घडून आणलेली आहे. तेव्हां या राज्यक्रांतीचा इतिहास महाराष्ट्रीय देशबांधवांस समजावा ह्मणून आह्मी अबदुल हमीदच्या कारकर्दीचा थोडक्यांत गोषवारा देणार आहों. आमच्य पुस्तकांत दिलेली ही हकीकत चालू लढाईंत टर्की जर्मनीला मिळण्यापूर्वीची आहे तेव्हां या हकीकतीवरून टर्कीच्या भविष्यत् कालाची कल्पना करणें चुकीचें होईल ? एवढें सांगून आह्मी अबदुल हमीदच्या कारकार्दीच्या इतिहासाकडे वळतों.

---

## भाग १ ला.

## बालपण.

अबदुल हमीद ता. २२ सपटेंबर १८४२ मध्यें जन्मले. यांच्या वडिलांचें नाव अबदुल मेजिद. यांणी १८३९ पासून १८६१ पर्यंत राज्य केलें. यांच्या मृत्यूनंतर त्यांचे वडील चिरंजीव मुराद हे

गादीवर आले पण त्यांची मनःस्थिती चांगली नसल्यामुळें त्यांस थोड्याच आठवड्यांत बादशाही तक्त सोडावें लागलें. यांच्या मागून अबदुल हमीद हे गादीवर आले.

अबदुल मेजिद यांची बहीण येसमे सुलतान यांच्यापाशीं एक नृत्य करणारी आरमेनिअन स्त्री होती. तीच अबदुल हमीद यांची मातोश्री होय. या स्त्रीनें पुढें मुसलमानी धर्म स्वीकारला होता. मुसलमानी धर्माप्रमाणें कोणाही स्त्रीपासून झालेला मुलगा तक्तनशीन होऊं शकतो. या मातोश्रीचा अरमेनिअन नवरा मेसजिदच्या राजवाड्यांत होता व त्यांचा जन्म अयोग्य परिस्थितींत झालेला होता वगैरे नानातऱ्हेच्या गप्पा आहेत पण त्यावर विश्वास ठेवणें धाडसाचें आहे. अबदुल हमीद यांच्या या मातोश्री १८४९ त मरण पावल्या. यावेळीं अबदुलचें वय अवघें सात वर्षांचें असल्यामुळें त्यांचें संगोपन बादशाही जनानखान्यांतील एका गुलाम स्त्रीनें केलें. पण हीही स्त्री लवकरच मरण पावली. तेव्हां अबदुल मेसजिदची चवथी राणी पेरेस्टो हनम इणें यांचें संगोपन केलें. या स्त्रीस मूलबाळ मुळींच नव्हतें. या बाई फार उत्तम स्वभावाच्या होत्या. यांणीच अबदुल हमीद यांस चांगलें शिक्षण दिलें.

पेरेस्टो हनम यांस वलीदा सुलताना ( सुलतान मातोश्री ) अशी पदवी होती. या बाई नेहमी पडदानशीन होत्या तरी पण त्यांची सर्वत्र

नं. ......... ता. .........

त्राखाणणीच होत असे. गादीवर आल्यावर ... व ... झालें. पटेनासें झालें अर्थात त्या बाई निशांताश येथें राहावयास गेल्या.

अबदुल हमीदच्या बाल्यावस्थेची विशेष हकीकत उपलब्ध नाहीं. यांचे वडील अबदुल मेसजिद यांचा ग्रह या मुलासंबंधानें चांगला नव्हता. हंगेरी प्रांतातील एक प्रवासी यांचें असें वर्णन करतो चेहरा उदास व फिक्कट, शांत पण दु:खी मन:स्थिती. चेहऱ्याच्या ठेवणीवरून सहांसी आणि लबाडवृत्तीचे. यांस लहानपणापासूनच एकलकोंडेपणा आवडत असावा असें दिसतें. ते समान वयस्क मुलांत कधींच खेळले मिवरले नाहींत. पुढें पुढें तर त्यांचा हा एकलकोंडेपणा इतका विकोपास गेला कीं ते कुटुंबातील मंडळींत कधींच बसत उठत नसत किंबहुना खुद्द बापाचीही भेट घेण्याची टाळाटाळ करीत. त्यांचे पुष्कळ पंतोजी होते व त्यांपैकींच केमाल पाशा हे एक होत. यांचा वडील भाऊ मुराद मोठा बुद्धिवान व होतकरू विद्यार्थी होता. अबदुल स्वतंत्र वृत्तीचा असल्यामुळें त्याचें शिकण्याकडे लक्ष नसे. यांणीं आपल्या शिक्षणाची इतकी हेळसांड केली होती कीं, त्यास त्यांची भाषाही चांगली येत नव्हती ! अबदुल हमीद धर्मभोळे होते व जादू मंत्र वगैरेंवर त्यांचा बराच विश्वास होता.

अबदुल हमीद यांस बापाच्या हयातींत दरमहा दोन हजार रुपये खर्चण्यास मिळत असत पण ही रक्कम अपुरी आहे असें त्यांचें रडगाणें

नेहमीं चालूच होतें. पैशाची उधळपट्टी करण्याचें व्यसन त्यास बाळ-पणींच लागलेलें होतें. तरी पण लोकांचें देणें व नोकरांचा पगार ते अगदीं वेळच्या वेळीं देत असत. त्यास थोडा जुगाराचाही नाद होता.

यांच्या लहानपणाच्या कृतीवरून हे तक्तनशीन झाले तर रयतेला सुखावह होतील असें मुळींच वाटत नव्हतें. शिक्षणाच्या नावानें पूज्य, सभोंवतालच्या दरबारी माणसांबद्दल अविश्वास, स्वयंभू शहाणपणाची घमेंड आणि एकलकोंडेपणा यामुळें ते सर्वांसच अप्रिय झाले होतें. यांस लहानपणापासून बादशहा होण्याची फार हाव होती. या हावेस आपला वडील भाऊ आडवा येत आहे याबद्दल त्यांस फार वाईट वाटे. पण या भावाच्या शारीरिक व्यंगामुळें आपणास लवकरच तक्त मिळेल अशी त्यांस खात्री वाटत होती.

अबदुल हमीदच्या चारित्र्याची वाचकांस ओळख करून देण्या-पूर्वी तुर्की राज्यपद्धतीचें थोडें विवेचन करणें अस्थानीं होणार नाहीं. ही राज्यपद्धत लष्करी दडपशाहीची आहे. हे तुर्क लोक ज्यावेळीं एशियामायनरमध्यें आले तेव्हां त्यांनी आपले लहान लहान समूह तयार केले आणि त्या समूहाच्या मार्फत ही लष्करी राज्यपद्धत सुरू केली. एशियामायनरमधील रयत बहुशा शेतकरी किंवा व्यापारी पेशाची होती तेव्हां त्या ठिकाणीं हा लष्करी अम्मल सुरू

नं.........
ता.........
ठाणे.



झाला यांत नवल नाहीं. हे लहान समूह पुढे विस्तृत झाले व त्यांनी आपल्या गादीचा मालक कोण असावा याबद्दल कांहीं नियम केले. एखादें अज्ञान पोर किंवा स्त्री असा मालक होणें इष्ट नाहीं असें ठरवून कुटुंबातील अगदीं वडील माणूस गादीचा मालक असावा असें त्यांनी ठरविलें. या लोकांनी मुसलमानी धर्म स्वीकारल्यामुळें बहुपत्नीत्वाचें तत्व त्यांस मान्य झालें होतें. या तत्वामुळें प्रत्येक स्त्रीला आपला मुलगा गादीवर बसावा अशी प्रबळ इच्छा उत्पन्न होई आणि ही इच्छा पुरी करून घेण्यासाठीं त्या त्या दरबारांत नानातऱ्हेचीं कुलंगडीं व अत्याचार होऊं लागले; आणि यामुळेंच बादशाही कुटुंबांत बालहत्येचा प्रघात पडून गेला.

ही बालहत्येची पद्धत अबदुल हमीदच्या वडिलांनी कांहींशी बंद पाडली. ही बंद पाडण्यास एक अत्यंत हृदयद्रावक गोष्ट घडून आली. दुसरा महंमद हा फार प्रीय सुलतान होता. याचें आपल्या [illegible] नावाच्या मुलीवर प्राणाहून जास्त प्रेम होतें. नेहमींच्या चालीप्रमाणें आपलें पोर मारलें जाईल असें समजून या मुलीनें गर्भार असतां वैद्याकडून शस्त्रक्रिया करून घेतली. या शस्त्रक्रियेमुळें [illegible] तिचें मूल मृत्यु पावलें. आपल्या लाडक्या मुलीनें हा शस्त्रप्रयोग कां करून घेतला हें चाणाक्ष महंमदास समजलें व त्यानें ही चाल बंद करण्याचा जोराचा प्रयत्न केला. तरी पण ती पद्धत तशीच चालू राहिली. हा सुल्तान १८३९ मरण पावला व त्याच्या

गादीवर अबदुल हमीदचा बाप बसला. राजपुत्री मिहीरचें हृदयद्रावक कृत्य सर्व युरोपांत गाजवजून राहिलें होतें इतक्यांत आणखी एक तसेंच हृदयाला पाझर फोडणारें कृत्य घडून आलें. अबदुल मेजिद यांची आटेया सुलताना नांवाची एक बहीण होती. या बहिणीच्या मुलांपैकीं एका मुलास दरबारी पद्धतीप्रमाणें ठार मारण्यांत आलें. ही बहीण जेव्हां पुनः गर्भार राहिली तेव्हां तिच्या नवऱ्यानें इतर आयांची सहानुभूति मिळावी म्हणून पुष्कळ पैसा खर्च केला पण या बहिणीस जेव्हां मुलगा झाला तेव्हां त्या सर्व आया त्या मुलाचा द्वेष करूं लागल्या. अर्थात या मुलास अबदुल मेसाजिदच्या हुकुमावरून ठार मारण्यांत आलें. पण मुलाच्या विरहानें आई इतकी वेडी झाली कीं दोन महिन्याच्या आंतच मृत्यू पावली. या कृत्यामुळें अबदुल यांस अत्यंत वाईट वाटलें व त्यानें ही पद्धत बंद पाडण्याचा निश्चय केला.

बालहत्येची पद्धत साधारणपणें बंद झाली खरी पण त्याच्याच बरोबर दुसरी एक पद्धत सुरू झाली. गादीवर नसणाऱ्या पण गादीचा वारसा लागणाऱ्या राजपुत्रास जवळ जवळ कोंडून ठेवण्याचा प्रघात सुरू झाला. अबदुल हझीझ गादीवर असतांना मुराद यास अशाच तऱ्हेनें कोंडून ठेवण्यांत आलें होतें. मुराद गादीवर सुमारें दोन महिने होता, नंतर अबदुल हमीद गादीवर आले त्यांनीं मुराद यांस असेंच कैदी करून ठेवलें होतें. आपल्या मागून गादीवर बसणाऱ्या राज-

पुत्रासंबंधानें गादीवर असलेला सुलतान इतका संशयी असे की आपण राज्यांत नसलों तर कदाचित् हा राजपुत्र गादी बळकावील. याच संशयानें अबदुल हझीझ यांणी इंग्लंडांत जातांना आपल्या बरोबर आपले दोन मुलगे मुराद व हमीद यांस बरोबर नेलें होतें ! विलायतेस असतांना अबदुल हमीद यांणीं लपून बसण्याचा एकदोनदां प्रयत्नही केला ह्मणतात. अबदुल हमीद यांस नेहमी ' आपण मारले जाऊं ' अशी भीति वाटत असे. तुर्कस्थानांतील बादशाहीकुटुंबांत कशा प्रकारच्या व्याधी व उपाधी असतात् हें वरील विवेचनावरून दिसून येतें.

## भाग २ रा.

# टर्कींची पूर्वस्थिती.

अबदुल हमीद गादीवर येण्याच्या सुमारला युरोपांतील टर्कींची काय स्थिती होती हें पाहूं या. या सुमारास तुर्कस्थानचे लचके तोडण्याचें किंवा कांहींप्रांत स्वतंत्र होण्याचें कृत्य चालू होतें. इ. स. १४५३ सालीं तुर्कांनी कांन्स्टांटिनोपल सर केलें. बालकन प्रांत बहुतेक सर्व त्यांच्या ताब्यांत त्या वेळीं गेला होता. क्रीमिया व रशियाचा दक्षिण भाग यावर तुर्की निशाण फडकत होतें. भूमध्यसमुद्राच्या दक्षिण किनाऱ्यावरील

प्रत्येक प्रदेश तुर्कांचा झाला होता. तुर्कांनी व्हीएन्ना शहरास घातलेला वेढा पोलंडच्या राजानें इ. स. १६८३ मध्यें उठविला. या काळापर्यंत तुर्की साम्राज्य वाढत्या पंथासच होतें. इ. स. १६८९ मधील इंग्लंडच्या परिस्थितीचें वर्णन करतांना मेकॉले एके ठिकाणीं ह्मणतात कीं. युरोपखंडातून एखादा प्रवासी इंग्लंडांत आला तर त्यास पहिला प्रश्न असा विचारला जाई कीं, ' तुर्की बादशहाची मोहीम कोठवर आली आहे " या प्रश्नावरून एके काळीं तुर्की साम्राज्य युरोपांत किती प्रबळ झालें होतें हें स्पष्ट दिसतें. जर्मनींतील संस्थानिकांस तर तुर्कांच्या स्वारीचें अतीशय भय वाटे; आणि ही स्वारी ऐकून इंग्लंड व फ्रान्स. हे देश तर अत्यंत भयभीत होत ! पण व्हिएन्ना येथील वेढा उठल्यापासून तुर्की साम्राज्यास उतरती कळा लागली, यावेळेपासून या साम्राज्याचे तुकडे पडूं लागले व जे एकदां फटकले ते पुनः साम्राज्यास मिळाले नाहींत. प्रथम ग्रीसनें स्वातंत्र्य मिळविलें. सर्व्हिया, मालडेव्हिया. वालाचिया हे प्रांत अर्धवट स्वतंत्र झाले. यावेळीं टर्कीला खरा शत्रु रशिया एकटाच होता, युरोपांत लष्करी शक्तीचा समतोलपणा राहण्यास टर्कीची अवश्यकता आहे असें इंग्लंड व फ्रान्स यांस वाटत होतें. लढाईस तोंड लागूं नये ह्मणून सर्व्हिया व बलगेरिया हे युरोपिन वस्तीचे प्रांत स्वतंत्र झाले तरी चिंता नाहीं असें इ. स १८७७ सालीं कान्स्टांटिनोपल येथें युरोपस्थ राजांची जी एक सभा भरली होती त्यांत ठरलें होतें. या सभेंत इंग्लंडचे मुखत्यार लार्ड स्यालिसबरी हे एके

ठिकाणीं ह्मणतात कीं आह्मीं ( या सभेनें ) टर्कीला जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करून केला पण त्याच्याच मनांत जिवंत राहावयाचें नाहीं त्यास आह्मी काय करणार ? " सर्व्हिया स्वतंत्र झाला बॉलेचिया आणि मॉलडेव्हिया हे रोमानियाच्या बगलेंत शिरले. मांटेनीग्रोचें स्वातंत्र्य कबूल करण्यांत आलें. बोसनीया आणि हरझेगोव्हिना हे प्रांत कारभार सुरळीत व्हावा ह्मणून आस्ट्रियाच्या स्वाधीन करण्यांत आले. याच हेतूनें सायप्रेस बेट इंग्लंडला मिळालें. बाटूम, कार्स, आणि एशियामायानरमधला कांहीं भाग रशियानें गट्ट केला. अशा प्रकारची तुकडेतोड अबदुल हमीदच्या दुसऱ्या वर्षाच्या कारकीर्दीपर्यंत चालू होती. याच्या कारकीर्दींत तें राष्ट्र अत्यंत संपुष्टांत आलें.

अबदुल हमीद गादीवर येईपर्यंत तुर्की साम्राज्याच्या अंत:स्थितींत फेरफार झालेला नव्हता. त्यांतील बहुत्येक लोक लष्करी शिक्षण घेतलेलें लढवय्ये होते. जेनासरीज नांवाचा एक वर्ग या शिक्षणानें फार प्रबळ झाला होता व यानेंच पूर्वींच्या लढाया जिंकल्या होत्या. इ. स. १६८३ पर्यंत हे लोक लष्करी शिक्षणांत तरबेज होते पण या वेळेपासून त्याच्यांत एक प्रकारचा ऐषआराम शिरला व त्यामुळेंच त्यांचा पुढें विनाश काळ आला. या वर्गाचें प्राबल्य पुढें इतक्या थरास गेलें कीं त्यांनी कित्येक प्रधानांचे जीव घेतले आणि कित्येक सुलतानांस पाणी पाजलें. पुढें पुढें यांच्या या कृत्यामुळें ते जनतेच्या मनांतून उतरले आणि सुलतानांसही ढकलून देण्यापर्यंत स्थिति येतांच

उलेमा म्हणून धर्माध्यक्षही त्यांच्या विरुद्ध झाले. इ. स. १८२०-३० च्या सुमारास यांणी खुद्द कान्स्टांटिनोपल शहर लुटलें व केवळ लहरीखातर हजारों लोकांची कत्तल केली.

महंमदाच्या कारकीर्दींत हे जेमेसरी लोक व बादशहा यांच्यांत खटका उडूं लागला. महमदाच्या मनांत या लोकांस युरोपियन पद्धतीचें लष्करी शिक्षण द्यावें असें फार होतें पण तें घेण्यास हा वर्ग तयार नव्हता. युरोपियन पद्धतीवर तोफखाना तयार करावा असेंही त्यांस वाटे. या वर्गानें पुढें बंड केलें. हें बंड शमविण्यासाठीं महमदाच्या लष्करानें चांगला प्रयत्न केला आणि सुमारें ६००० जेमेसरी कापून काढले.

तुर्की साम्राज्यांत खडें सैन्य असेंच. पण बशीबझुक नांवाचें बिनपगारी लष्करही असे. हें लष्कर लुटालुट करून आपलें उपजीवन करीत असे खड्या सैन्यास युरोपियन लष्कराप्रमाणें कवाइत. शिस्त व लष्करी शिक्षण द्यावें असें तत्कनशीन बादशहास वाटूं लागलें, त्यांनी फ्रान्स देशांतून लष्करीं शिक्षण देण्यासाठीं लष्करी अधिकारी आणण्यांत आले होते. यानंतर इ स. १८७० सालीं फ्रान्स व जर्मनी यांच्यांत युद्ध माजलें व त्यांत जर्मनी विजय पावला. यामुळें या नंतर इ. स. १८८० पासून तशा प्रकारचें शिक्षण देण्यासाठीं फ्रेंचांच्या ऐवजीं जर्मन अधिकारी नेमण्यांत आले. खड्या सैन्याची तयारी अशा रितीनें झाल्यावर आरमारी शिक्षण

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. नं.

देण्यासाठीं इंग्लंड मधून अधिकारी आणण्यांत आले. पण आरमारी शिक्षणांत तुर्की आरमार फारसें तयार झालें नाहीं.

इ. स. १८६१ सालीं मृत्यू पावलेले सुलतान अबदुल मेजिद यांणी आपल्या कारकीर्दीत लष्करी शिक्षणाची एक शाळाही स्थापन केली होती. यामुळें अलीकडच्या तुर्की सैन्यांत बरीच सुधारणा झाली होती.

आरमारी शक्ति वाढावी तशी वाढली नाहीं. याचें कारण त्या वेळचे धर्मभोळे मुसलमान असें ह्मणत कीं. अल्लानें जमिनीवर मुसलमान लोकांस विजयी केलें आहे आणि पाण्यावर त्यांच्या दुष्मानास विजयी ठेवलें आहे. अबदुल मजिदच्या कारकीर्दींत आरमारी शाळाही स्थापन करण्यांत आली होती.

## दिवाणी कारभार.

तुर्कीसाम्राज्यांत हा कारभार विशेष न्यायानें चालत होता असें नाहीं. साम्राज्यांतील निरनिराळ्या प्रांतावर गव्हरनर नेमण्यांत येत असत. हे गव्हरनर बहुशा दरबारी लोकांच्या अगर जनानखान्याच्या शिफारशीवरून नेमले जात असत. यांचें पहिलें कर्तव्य हें कीं, प्रजेच्या कागाळ्या सुलतानाच्या कानापर्यंत जाता कामा नयेत. तसेंच त्यांनी सुलतानाच्या पैशाच्या मागण्या पुऱ्या केल्या पाहिजेत. हे गव्हनर आपल्या हाताखालील अधिकाऱ्याच्या जागा मक्त्यानें देत

असत. लाचलुचपत वगैरे गोष्टी दिवसा ढवळ्या चालत असत. एकंदरीनें हा कारभार विशेष चांगला होता असें ह्मणतां येत नाहीं.

---

## भाग ३ रा.

# अबदुल हमीद गादीवर कसे आले ?

इ. स. १८७६ सालीं जी एक अत्यंत महत्वाची गोष्ट झाली त्यामुळें अबदुल हमीद यांचें नांव ऐकूं येऊं लागलें. यावेळीं अबदुल-हझीझ हे सुलतान होते. हे रयतेला विशेष अप्रिय नव्हते पण अती-शय चैनी व उधळे होते. उत्तम प्रकारचे राजवाडे बांधणें, झनानखाना खूप ठेवावयाचा वगैरे गोष्टी हे सुलतान करीत असत. अशा प्रकारच्या गोष्टी केल्या असतां पूर्वी त्यामुळें प्रजा विशेष नाराज होत असे अशांतला प्रकार नाही तरी पण याच सुमारास तुर्कस्थानांतील तरुण पिढीला युरोपांतील सुधारणाप्रमाणें आपल्या राज्यांतही सुधारणा व्हाव्यात असें वाटूं लागलें होतें. परंतु सुलतान साहेब जुन्या काळाचे त्यांस या नव्या सुधारणा मुळींच नको यामुळें या सुलताना बद्दल तरुण प्रजेंत नाराजीपणा वाढत होता. क्रीमियाची लढाई झाल्या नंतर ह्या सुधारणां-

वाचून तुर्कस्थानाचा तरणोपाय नाहीं असें तरुण विद्वांस वाटूं लागलें.

एकतंत्री ह्मणून जुलमी राज्यपद्धत पूर्वींचीच चालू होती पण सर्विया, बोसनिया, हेरझेगोविना आणि बलगेरिया या प्रांतांतील प्रजेनें व विशेषतः ख्रिस्ती प्रजेनें या राज्यपद्धतीशी झगडण्यास सुरुवात केली होती. रयतेला व राजाला दोघांसही सुखावह अशी राज्यपद्धत असणें जरूरीचें आहे असें ह्मणणार कांहीं प्रधान यावेळीं ( इ. स. १८७५-७६ ) पुढें आले या प्रधानांत मिधतपाशा हे मुख्य होते. या सुमारासच हे प्रधान ड्यान्यूब नदीच्या प्रांतावर गव्हरनरी करीत होते व त्यांच्या कारकीर्दीत विशेष चळवळ नव्हती. ख्रिस्ती व मुसलमान या दोन्ही जातींच्या प्रजेस सारख्याच दर्जानें वागवावें असें या प्रधानांस वाटत होतें.

राज्यकारभारांत सुधारणा होण्याबद्दलचा जो पक्ष यावेळीं निर्माण [illegible] होता त्या पक्षाचे हे गृहस्थ पुढारी झाले. पण सुलतानाचा जनानाना आणि लांच खाऊ अधिकारी या पक्षाच्या विरुद्ध होते. याच [illegible]ळीं मिधतच्या सांगण्यावरून ज्या मुख्य वजिरांस रजा देण्यांत आली होती त्यास सुलतानानें पुनः रुजू केलें या गोष्टीमुळें तर मिधतपाशा अतिशय संतापले व त्या संतापाच्या भरांत आपल्या जागेचा राजीनामा दिला. पूर्वी त्या देशांत राजाशीं अशा प्रकारचा उद्धटपणा केल्यास

त्याचा परिणाम फार भयंकर होतो हें ठरलेलेंच आहे. पण मिथतपाशा एवढेंच करून थांबले नाहींत तर त्यांनी राजवाड्यांत जाऊन सुलतानांस असें स्पष्ट बजावलें कीं, ' तुह्मी अधिकाधिक खोल पाण्यांत घसरत जात आहांत याचा विचार करा. ' इतकें करून ते आपल्या वतनवाडीवर स्वस्थ जाऊन बसले. राजा व प्रधान राज्यांत करीत असलेला खर्च वाजवी आहे कीं नाहीं हें पहाण्यासाठीं लोकनियुक्त मुखत्यारांची एक सभा असावी ही पहिली सुधारणा इ. स. १८७५ च्या डिसेंबरांत पुढें आली; व या सुधारणेसंबंधानें बलगेरियांत विशेष चळवळ सुरू झाली. या चळवळीस मिथतपाशा अनुकूल होते हे सांगावयास नकोच या चळवळीला उपमा ( धार्मिक ) पंथाचे लोक आणि त्यांच्या हाताखालील विद्यार्थी यांचा मजबूत पाठिंबा होता. आपली चळवळ वृद्धांस मान्य आहे हें पाहून ही तरुण पिढी आपली चळवळ अधिकाधिक रंगांत आणूं लागली !

ता १० मे १८७६ या दिवशीं एक अत्यंत महत्वाचा प्रकार घडून आला. वर सांगितलेल्या तरुण पिढीनें या दिवशीं सुलतानाचे वडील चिरंजीव मुसफ इझेडिन यांस रस्त्यांत आडविलें आणि ' आतांच्या आतां सुलतानाकडून मुख्य वजीर महमूद आणि होस-उल-इसलाम यांस बडतर्फ करून घ्या ' असें त्यांस सांगण्यांत आलें. चिरंजीव विचारे परत फिरले आणि सुलतानानें त्याप्रमाणें केलें. याच वेळीं

मिधतपाशा यास पुनः प्रधानकीचीं वस्त्रें परिधान करावीं लागलीं.

आपण ह्मणतो त्या सुधारणा सुलतान अबदुल हझीज यांच्या कडून होण्यांत येणार नाहींत असें मिधतपाशा व इतर सुधारणाप्रीय अधिकाऱ्यांस वाटूं लागलें. तेव्हां यास एकच उपाय, सुलतान साहेबांस पदच्युत करणें. अबदुलहझीज यांस पदच्यूत केलें तर गादीवर कोणांस बसवावें हा दुसरा प्रश्न पुढें आला. हझीज यांस पदच्यूत केलें तर वडीलपणाच्या हक्कानें पहातां त्याचा पुतण्या जो मुराद त्यांस सुलतान केलें पाहिजे. पण हे मुराद पक्के दारूबाज आणि शिवाय अर्धवट तेव्हां यांस गादीवर बसविलें तर भीक नको पण कुत्रा आवर असें व्हावयाचें. तेव्हां असा तूट निघाला कीं मुराद यांस गादीवर बसवून त्याचा धाकटा भाऊ जो अबदुलहमीद यांस वहिवाटदार ( रीजंट ) नेमावें. या गोष्टी बद्दल हमीदची अनुमति मिळावी ह्मणून मिधतपाशातर्फे कांहीं लोक त्यांस भेटावयास गेले. पण हमीद यानें साफ सांगितलें कीं ' मी रीजंट वगैरे कांहीं होण्यास तयार नाहीं. मी सुलतान होण्यास तयार आहे. बाकीच्या लटपटी फुकट आहेत. ' हमीदचें उत्तर ऐकून सुधारणा पक्ष पुनः घोटाळ्यांत पडला. मुरादला सुलतान न करता हमीदलाच एकदम सुलतान बनवावें अशी त्यावर तोड काढण्यांत आली. पण येथे तुर्कस्थानांतील धर्म गुरू ( उलेमा ) आडवे आले. ते ह्मणूं लागलें कीं वडील भाऊ जिवंत असतां धाकट्या भावांस

गादी देणें मुसलमानी धर्मा विरुद्ध आहे. शेवटीं मुराद यांसच सुलतान करण्याचें असें ठरलें. सैन्याची लहानशी तुकडी व थोडेंसे आरमारी सैन्य बरोबर घेऊन मिधतपाशा सुलतान अबदुल हझीज यांच्या राजवाड्यांत शिरला आणि पदच्यूत करण्याचा विधी उरकून घेण्यांत आला. मिधतपाशानें यावेळचें कृत्य अत्यंत धाडसाचें केलें कारण कदाचित यावेळीं त्याची गर्दनही छाटली गेली असती. असो. या उलटा पालटी संबंधानें रयतही खुष झाली आणि वर्तमान पत्रांत या संबंधानें रसभरित वर्णनें येऊं लागलीं.

या गादीच्या अदलाबदलीबद्दल फ्रान्स व इंग्लड यांस फार बरें वाटलें. सुलतान मुसलमान असून प्रजा इतर धर्माची पडल्यामुळें दोघांत सौख्य नांदण्यांस राज्यांतील एकतंत्री कारभार नाहींसा झाला पाहिजे व येणें करून टर्की जिवंत राहून सशक्त होईल असें या दोन्हीं राष्ट्रांचें मत होतें. प्रजेला धर्मस्वातंत्र्य असावें असा एक फर्मान इग्लंडच्या आग्रहास्तव तुर्कस्थानांत प्रसिद्ध करण्यांत आला होता व याबद्दल ख्रिस्ती राष्ट्रांत आनंदही झाला होता. पण या कायद्याचा अम्मल मुळींच होत नव्हता व जो कोणी महंमदी धर्म सोडून ख्रिस्ती धर्म स्वीकारील त्यांस फाशी देण्यांत येत असे. परधर्म स्वीकारल्याचें एक उदाहरण क्यानिंग यांच्या चरित्रांत दिलें आहे तें असे. लार्ड क्यानिंग हे कॉन्सांटिनोपल येथें असतांना एक मुसलमान ख्रिस्ती झाला. त्याच्यावर ह्या अपराधाबद्दल खटला सुरू झाला. वरील फर्मान अम्मलांत असतां

असा खटला होणेंच मुळीं गैर कायदा होय पण एकतंत्री राज्यांत इतकी दाद घेतो कोण ? ही गोष्ट क्यानिंग यांस समजताच त्यानें एकदम सुलतानाची मुलाखत घेतली. सुलतानानें हुकूम करतो असें आश्वासन दिलें पण नुसत्या आश्वासनानें काम भागावयाचें नाहीं हें क्यानिंग यांस माहीत असल्यामुळें त्यांनीं ' लेखी हुकूम मला मिळ-ल्या वाचून मी येथून जात नाहीं ' असा जबाब दिला तेव्हां सुलता-नांनी तसा हुकूम दिला आणि एका माणसाचे प्राण वाचले.

मुराद यांस गुळाचा गणपती करून गादीवर बसविलें खरें पण अर्धवटपणा अधिकाधिकच वाढूं लागला. शिवाय शांपेन, कॉगन्याक वगैरे दारू तो अतीशय पिऊं लागला. अशा प्रकारें त्याची मनःस्थिती बिघडत असतां त्याच स्थितीला आणखी भर पडूं लागली. पदच्युत झाल्या नंतर अबदुल हझीजनें थोड्याच दिवसांनी आत्महत्या करून घेतली, त्यानें मुरादला एक भय सूचक पत्र पाठविलें होतें व अझी-जच्या पत्न्या पैकीं एका पत्नीच्या भावानें सात बारी पिस्तुलानें एका प्रधानास ठार मारला वगैरे गोष्टींमुळें मुराद मनांत बराच भ्याबला होता. अशा रितीनें मुरादची मनःस्थिती जरी विशेष बिघडली तरी निदान एक वर्ष तरी गादी उपभोगल्या शिवाय कोणाही सुलतानास पदच्यूत करता येत नाहीं ' असें स्पष्ट मत धर्म गुरूनीं दिलें. शेवटीं मिधतपाशानें सरदार, दरकदार व कांहीं श्रीमंत लोक यांची एक सभा भरविली व त्यांत सुधारणांचा एक खर्डा तयार करण्यांत आला. या

खलयांत धर्म स्वातंत्र्य व ख्रिस्ती प्रजेस योग्य मानानें वागविणें या गोष्टींचा उल्लेख केला होता. या सुधारणा या जमलेल्या मंडळीस मान्य झाल्या. इतक्या अवधींत मुरादची प्रकृति फारच बिघडली. दुखणें दुःसाध्य असाही अभिप्राय वैद्यांकडून मिळाला तेव्हां अबदुलहमीद यांस सुलतान बनविण्याचें कायम ठरलें. दरम्यान मिधतपाशा अबदुल हमीदच्या वारंवार गांठीं घेई व 'राज्यकारभारांत याहूनही ज्यास्त सुधारणा करीन' अशा गुळचट थापा हमीद प्रत्येक वेळीं मारी. शेवटीं अबदुल हमीद सुलतान झाला आणि राजवाड्यांत येऊन राहिला.

---

## भाग ४ था.

# मिधतपाशाचा खून.

अबदुल हमीद सुलतान झाला खरा पण त्याच्या सभोंवार नाना तऱ्हेच्या अडचणींचा डोंगर वाढला होता. त्यास पहिली आणि महत्वाची अडचण ही होती कीं आपली गादी चांगल्या तऱ्हेनें टिकेल कशी ? आणि दुसरी महत्वाची अडचण ह्मणजे ड्यान्यूब प्रांतांत जो बंडखोरपणा उपस्थित झाला होता तो शमन कसा होईल. आपणास ही गादी चांगल्या तऱ्हेनें लाभेल कीं नाहीं या बद्दल त्याच्या मनांत वारंवार

संशय उत्पन्न होई. त्याच्या हक्काबद्दल प्रजाजनांत कोठें अपवाद घेण्यांत येत नव्हता, मूराद यांस धर्मिक गुरूंनी पदच्यूत केलें होतें तेव्हां त्या त्या बाजूनेंही अडचण होती अशी गोष्ट नव्हती. मुरादच्या पक्षपाती उल्मांनी राजवाड्यावर हल्ला करण्यापर्यंतही मजल नेली होती पण या पक्षांतील पुढाऱ्यांस कैद करून व कित्येकांस फाशी देऊन ही अडचण समूळ नष्ट झाली होती.

अबदुल हमीदच्या पुढें फार मोठा अडचणीचा डोंगर म्हटला म्हणजे मिधत पाशा होय. तुर्कस्थानची एकतंत्री राज्य पद्धत नष्ट होऊन त्याच्या जागीं लोकनियंत्रित राज्यपद्धत सुरू व्हावी म्हणून या देशांत एक तरुण पक्ष निर्माण झाला होता व त्या पक्षाचा मिधत पाशा हा पुढारी होता हें पूर्वी लिहिलेंच आहे. 'तुम्ही म्हणतां त्याहूनही जास्त सुधारणा मी करीन' असें आश्वासन अबदुल हमीदनें मिधत पाशा यांस गादीवर बसण्यापूर्वी दिलें होतें हेंही मागील भागांत सांगितलें आहे. पण अबदुल हमीद हा सुलतान बनल्या बरोबर मागील सर्व गोष्टी विसरून गेला व पूर्वीची एकतंत्री अतएव जुलमी राज्यपद्धत पुढें कायम ठेवण्याच्या उद्योगास लागला अर्थात या त्याच्या दुष्ट बेतास मिधत पाशा हा आड येणारा होता तेव्हां ही व्याद नजरे-आड कशी करता देईल याबद्दल अबदुल हमीद दिवस रात्र विचार करीत होता.

मिधत पाशाचा कांटा काढून टाकण्याच्या विचारांत अबदुल

हमीद असतां एक निराळीच अडचण उत्पन्न झाली. हमीद सुलतान होण्याच्या पूर्वीपासून बलगेरिया वगैरे प्रांतांत लोक मताचा प्रक्षोभ इतका झाला होता कीं त्याचें शमन योग्य वेळीं न झालें तर लढाई-च्या रूपानें सगळ्या युरोपांत भडका उडेल अशी दुश्चिन्हें दिसूं लागलीं. तेव्हां हा भडका न उडावा ह्मणून कान्स्टॉंटिनोपल येथें यूरोपस्थ राष्ट्रांच्या मुख्यत्यारांची एक सभा भरविण्याचा घाट घालण्यांत आला. ही सभा ता. २३ दिसेंबर १८७६ रोजीं भरावयाची होती. या सभेंत प्रजेला सुधारणा देण्याबद्दल अबदुल हमीद यांस भाग पाडलें जाईल असा रंग दिसत होता. या दरबारान्वयें सुधारणा दिल्या तर तुर्की सुल-तान इतर राष्ट्रांस भितो अशी सगळ्या जगांत दुंदुभी वाजून सुलता-नाची मान हानी होईल. बरें या सुधारणा न दिल्या तर सगळ्या युरो-पस्थ राष्ट्रांशीं युद्ध करावें लागेल. या दुहेरी पेंचांत अबदुल हमीद हा सांपडला होता. या पेंचातून अब्रूनिशी बाहेर कसें पडतां येईल याबद्दल अबदुल हमीदनें मुख्य वजीर मिथतपाशा यांस सल्ला विचारली. त्यांनी असें सांगितलें कीं ' यास एक तोड आहे. दरबार भरेल त्याच दिवशीं शंभर तोफांची सरबत्ती करून सुधारणा दिल्याचें तुह्मी होऊनच जा-जाहीर करा ह्मणजे दरबारांतील मुखत्यार मणगटे चावीत घरोघर निघून जातील आणि तुमचेंही नांव होईल.' मिथतपाशांनी सांगित-लेली ही युक्ती सुलतानास मानवली व त्यांनीं त्याप्रमाणें १०० तोफांची सरबत्ती दिली अर्थात दरबारास आलेले मुखत्यार घरोघर निघून गेले.

परंतु विशेष ध्यानांत ठेवण्या सारखी गोष्ट ह्मटली ह्मणजे मुखत्यार घरोंघर गेल्यावर सुधारणा देण्याच्या ऐवजीं सुलतान साहेबांनीं मिधतपाशा व इतर सुधारणेस अनुकूल असलेले प्रधान यांस एकदम बडतर्फ केले. हीं गोष्ट ता. ९ फेब्रुवारी १८७७ रोजीं घडली.

सुलतानांनी मिधतपाशास जागेवरून दूर केलें आणि सुधारणांच्या नांवानें प्रजेच्या तोंडांस पानें पुसलीं तरी या सुधारणांपैकीं लोक प्रतिनिधींची एक पार्लमेंट सभा सुलतानांस बोलावणें भाग पडलें. अशी प्रकारची सभा निदान टर्कीच्या प्रातांत तरी अश्रुतपूर्वच होय. या सभेंतील मुखत्यार योग्य निवडणारांकडून निवडले गेले नाहींत वगैरे आक्षेप घेण्यांत आले होते तरी पण ही सभा कॉन्स्टांटिनोपल येथें एकदाची भरली. या सभेस बगदाद, आलबानिया, आरमेनिया, सीरिया वगैरे दूर दूरच्या प्रांतांतून मुखत्यार आले होते. आपापल्या प्रांतांवर गव्हरनरचें काम करणारे अधिकारी जुलमी, लाचखाऊ आहेत असें प्रत्येक मुखत्यारानें या सभेंत गाऱ्हाणें केलें. सभेचा परिणाम पुढें कांहींच झाला नाहीं. तुर्कस्थानांतील सर्व ठिकाणचे गव्हरनर कुमार्गी आहेत असें सर्वांच्या निदर्शनास आलें. या सभेंत झालेलीं भाषणें पार्लमेंटच्याच धर्तीवर झालीं नाहींत कारण त्या कामीं हे मुखत्यार अजून नवखे होते. या सभेंत मुखत्यारांच्या बोलण्याचा विशेष रोख अधिकाऱ्यांवर होता. खुद्द सुलतानासंबंधानें एकानेंही अवाक्षरही काढलें नव्हतें. कांहीं कांहीं वेळीं तर मुखत्यारांनीं अधिकाऱ्यांच्या

खाजगी वर्तणुकीवरही टीका केली. या सभेचे अध्यक्ष अहंमद वेफीक हे होते. यांस उत्तम प्रकारचें शिक्षण मिळालेलें होते पण अत्यंत हेकट स्वभावाचे होते. या सभेंत एक पांढरा फेटा घातलेला मुखत्यार एक लांबलचक व्याख्यान झोडूं लागला तेव्हां त्यांस उद्देशून अध्यक्ष ह्मणाले ' अहो गाढव, पुरे करा तुमचें वक्तृत्व ' हें भाषण ऐकतांच बदुकीची गोळी लागल्या प्रमाणें वक्ते पटकन खालीं बसले.

या सभेंत अधिकाऱ्या विरुद्ध करण्यांत येणारे आरोप उत्तरोत्तर भयंकर स्वरूपाचे होऊं लागले. अशा गैरवर्तणुकीच्या अधिकाऱ्यांस जबाब देण्याकरतां या सभेंत पाचारण करण्यांत यावें येथपर्यंत जेव्हां मजल येऊन पोचली तेव्हां गुन्हेगार अधिकाऱ्यांत मोठीच चळवळ उडाली. त्यांनी पुढें येण्याचें साफ नाकारलें. सभेनें अशा प्रकारचें स्वरूप धारण केलेलें पाहून अधिकाऱ्यांचा एकतंत्री कारभार लवकरच संपुष्टांत येणार असें प्रजाजनांस वाटूं लागलें. पार्लमेंट सभा बोलावण्याचें हें नसतें घोंगडें मिधातपाशानें आपल्या मागें लावलें हें हमीद जाणून होता. तेव्हां या सभेंत ज्या वेळीं तिघां अधिकाऱ्यां विरुद्ध स्पष्ट व निर्विवाद आरोप करण्यांत आले त्यावेळीं सुलतान साहेबांनी सभाच उधळून लावली ! आणि अशा प्रकारची सभा बोलावण्याचें काम कांहीं मुदत लांबणीवर टाकण्यांत आलें आहे असें सुलतानांनी फर्मान काढलें. अशारितीनें सुलतान या कटकटींतून मोकळे झाले. या सभेनें खरोखर कांहींच काम केलें नाहीं हें खरें पण एकतंत्री

राज्यपद्धतीस आळा घालणें झाल्यास काय केलें पाहिजे याचा धडा या सभेनें समजदार प्रजेस घालून दिला यांत शंका नाहीं; आणि याचाच परिणाम इं. स. १९०८ च्या राज्यक्रांतीस चांगला उपयोगी पडला. असो.

अबदुल हमीदनें लोकप्रतिनिधींच्या सभेस अशाप्रकारें वाटण्याच्या अक्षता दिल्यानंतर या सर्व उपाधी सुलतानाच्या मागें लावण्यांत मिधतपाशाच कारणीभूत आहे तेव्हां तो कांटा कायमचा उपटून काढण्याकडे अबदुल हमीदची दुष्ट दृष्टी वळली. पार्लमेंटला गच्चू दिल्यानंतर त्यानें मिधतपाशा यांस एके दिवशीं राजवाड्यांत बोलावलें. मिधत राजवाड्यांत शिरतांच त्याच्यासभोंवतीं सुलतानाच्या शिपायांनीं वेढा दिला व त्याच्यापासून मुख्य वजिराचा शिक्का मोर्तब हिसकून घेतला आणि त्याचपायीं त्यांस आगबोटीवर चढवून ब्रिंडीसी येथें त्यांची उचलबांगडी करण्यांत आली. नंतर कांहीं दिवसांनीं त्यांस तुर्कस्थानांत राहण्याची परवानगी देण्यांत आली.

मिधतपाशा सुधारणा पक्षाचा अध्वर्यू असल्यामुळें लोकांस तो अत्यंत प्रीय झाला होता. पण या लोकप्रीतीनेंच तो सुलतानाचा कट्टा शत्रू बनला होता. सुलतान अबदुल त्याच्याशीं अत्यंत नीच अशा सूडाच्या बुद्धीनें वर्तन करीत होता. आपला तो सूड उगवण्याची तो संधी पहात होता.

सूड उगवून घेण्याची ही उत्तम संधी अबदुलच्या सुदैवानें आणि मिधतच्या दुर्दैवानें लवकरच प्राप्त झाली. अबदुल अझीझ नांवाचा सुलतान गादीवरून पदच्युत केला गेला होता हें मागें सांगितलेंच आहे. या अझीझनें पदच्युत झाल्यापासून पाचवे दिवशींच आत्महत्या केली होती. पण सदर सुलतान आत्महत्या करून मेला नसून त्याचा खून करण्यांत आला होता व तो खून मिधतपाशानें केला असा एक अत्यंत घाणेरडा पण गंभीर स्वरूपाचा आरोप सुलतान अबदुल हमीद यांणी केला. यावेळीं अबदुल हझीजचा थोडा पूर्व इतिहास सांगितला पाहिजे. अबदुल हझीस यास पदच्युत केल्यानंतर त्यास दोन दिवस राजवाड्यांतच कैद करून ठेवलें होतें व नंतर सेऱ्याग्लिओ ( Seraglia ) नांवाच्या सुंदर जागीं कैदी ह्मणूनच ठेवण्यांत आलें होतें. या ठिकाणाहून त्यांस चेरागनयेथील राजवाड्यांत ठेवण्यांत आलें होतें. पदच्युत केल्या नंतर पाचवे दिवशीं ह्मणजे ता. ४ जून १८७६ रोजीं सदर सुलतान आत्महत्या करून मयत झाले असें प्रसिद्ध झालें कोणाही टर्कचा व विशेषत: राजकुलो-त्पन्न माणसाचा मृत्यू असा एका एकीं झाला असतां त्याबद्दल संशय उत्पन्न होणें साहजिक होतें व तुर्कस्थानांत तर हा संशय विशेष रूपाचा असे. हा मृत्यू खूनानें झाला नसून आत्म-हत्तेनेंच झाला अशाबद्दल त्यावेळीं जय्यत पुरावा होता. अबदुल

हझीझ ज्या ठिकाणीं मेलेला सांपडला त्या ठिकाणीं एक कातरी सांपडली. त्याच्या डाव्या खांद्यांतून रक्त वहात होतें. तो ज्या खुर्चीवर वसला होता ती खुर्ची त्याच्या झनानखान्यांतून स्पष्ट दिसत होती. त्याच्या वलीदा सुलतानानें ' आपणापासून दाढी कातरून काढण्यासाठीं अझीझनें कातरी मागून घेतली, ' असें कबूल केलें होतें. तसेंच आत्महत्येचें वेड राजकुलांत कधीं कधीं उत्पन्न होतें असें हीच सुलताना कबूल करते. यांच्या मृत्यूनंतर तो मृत्यू कसा झाला हें ठरविण्यासाठीं निरनिराळ्या १९ डाक्टरांनी प्रेताची तपासणी केली होती. एका जर्मन डाक्तरानें तर हा मृत्यू खुनानेंच झाला असा पूर्वग्रह करून प्रेताची तपासणी केली. पण त्यासही ही आत्महत्याच वाटली. अशा प्रकारें हा मृत्यू आत्महत्येनेंच झाला असा जनतेचा कायमचा ग्रह झाला. पण जनतेच्या ग्रहाशीं अबदुल हमीदला काय करावयाचें होतें ? आपल्या एकतंत्री आणि सुलतानी राज्यकारभाराच्या मुळावर येणाऱ्या मिधतपाशास केव्हां आणि कोणत्या पाशांत अडकवून टाकावयाचें हाच निजध्यास अबदुल यांस लागला होता. अबदुल हझीझचा मृत्यू आपल्या कपटजालास कसा उपयोगी पडेल याचीच तो तर्तूत करीत होता. शेवटीं सैतानानें अबदुल हमीद यांस हात दिला आणि बिचाऱ्या मिधत पाशाचीं शंभर वर्षे पुरीं भरलीं !

अबदुल हझीझ मृत्यू पावल्या नंतर पांच महिन्यांनी अबदुल हमीद

यांस असा चमत्कारिक शोध लागला कीं, हफ्रीझचा मृत्यू आत्महत्येनें झाला नसून खुनानें झालेला आहे आणि तो खून मिधतपाशा यांणीं केला अशीही बितं बातमी त्यास समजली. या बातमीला आधारही तसाच मजबूत सापडला. मिलदिझ येथील राजवाड्याच्या जमा खर्चाची तपासणी करतांना त्यांत दोन बागवानांच्या नांवानें कांहीं तनखा खर्च पडलेला आहे असें आढळून आलें. नंतर या दोन बागवानांची तपासणी करतां त्यांनी असा स्पष्ट कबुली जबाब दिला कीं आह्मांस मिधत पाशानें तैनातीस ठेविलें होतें व त्यांच्या सांगण्यावरूनच आह्मी अबदुल हझीझ यांचा खून केला आहे. इतकें कोलीत हातीं सांपडतांच अबदुल हमीद सुलतान मिधत पाशाच्या पंचप्राणाच्या इमारतीस जाळून टाकण्यास थोडाच कमी करणार होता. खरोखर पाहिलें असतां इतका बलवत्तर पुरावा मिळाला असतां कोणत्याही एकतंत्री राज्यकारभारानें गुन्हेगारास फासावर चढविण्यास कमी केलें नसतें मग अबदुलचा अम्मल तर सुलतानी तऱ्हेचा. तेव्हां त्यांस मिधत-पाशास केव्हांच सुळावर लटकावता आला असता. पण यावेळीं एकंदर युरोपखंडाची राजकीय परिस्थिती फार चमत्कारिक झाली होती. तुर्कस्थानांतील बलगेरिया वगैरे ख्रिस्ती प्रजेचे प्रांत लोकनियं-त्रित राज्यव्यवस्था व्हावी ह्मणून खवळून गेले होते. किंबहुना ही चळवळ इतक्या थरास गेली होती कीं तुर्कस्थानांत लढाईचें शिंगही

नं.

फुंकलें जाईल. शिवाय मिधतपाशा ह्मणजे प्रजेच्या तर्फेचे एक लोकमान्य पुढारी तेव्हां त्यांस एकदम उचलून फांसावर चढविलें तर खुद्द तुर्कस्थानांतच कदाचित् युद्धाची ठिणगी उडेल. या सर्व गोष्टींचा विचार करून अबदुल हमीदनें मिधतपाशा याची न्यायाधिशामार्फत चवकशी सुरू केली. पण या चवकशींतही साक्षीदारांची उलट तपासणी वगैरे मुळींच करूं देण्यांत आली नाहीं. शेवटीं मिधतपाशा यास एका न्यायाधिशाशिवाय सर्वांनीं गुन्हेगार ठरविलें आणि फाशीची शिक्षा सांगितली.

मिधतपाशासारख्या राज्यकाभारांत सुधारणा करूं इच्छिणाऱ्या तुर्कास अशाप्रकारें फाशीची शिक्षा झालेली ऐकून सर्व युरोप व विशेषतः इंग्लंड व फ्रान्स या देशांत फार जोराची खळबळ उडाली. शेवटीं या देशाच्या वकिलातीच्या मध्यस्थानें फाशीची शिक्षा रद्द होऊन त्यास हद्दपारीची शिक्षा करण्यांत आली. अर्थात मिधतपाशा यांस अरबस्थानांत जावें लागलें. पण तेथेंही त्याचे सुखानें दिवस गेले नाहींत. अबदुलच्या मारेकऱ्यांनी त्यांस ठार मारलें व त्याचें मुंडकें अबदुल हमीदकडे पाठवून दिलें.

## भाग ५ वा.

# बलगेरिया प्रकरण.

आपली गादी सुरक्षित ठेवण्यासंबंधानें अबदुल हमीदला नेहमीं काळजी वाहावी लागत असे. बलगेरिया, सर्विया, बोसनिया आणि हेरझेगोविना या प्रांतांत लोकमत फार प्रक्षुब्ध झालें होतें. इ. स. १८७५ सालीं हेरझेगोविना येथें बंड उभारण्यांत आलें होतें. व ही बंडाची ठिणगी सर्बिया वगैरे जवळच्या प्रांतांत पसरूं लागली. इ. स. १८७६ सालीं सर्विया आणि मॉंटेनीग्रो या प्रांताविरुद्ध लढाई पुकारण्यांत आली. एप्रिल, मे, जून, या महिन्यांत बलगेरिया प्रांतांत कत्तल उडविण्यांत आल्या. ता. १ सपटेंबर रोजीं तर बंडाच्या कित्येक पुढाऱ्यांस फाशी देण्यांत आलें व पुष्कळ अत्याचार करण्यांत आले. या सुमारास बलगेरिया प्रांतांत फार खळबळ उडाली होती.

बलगेरिया प्रांतांतील लोक जुन्या ख्रिस्ती धर्माचे होते. यामुळें त्यांची विशेष वार्ता ऐकूं येत नसे. या लोकांवर केवळ तुर्कच जुलूम करीत होते असें नाहीं तर धार्मिक अधिकारीही त्यास अत्यंत वाईट तऱ्हेनें वागवीत असत. या प्रांतांतील सुखवस्तु लोकांनीं आपलीं मुलगे ओडीसा नांवाच्या रशियन हद्दींतील शहरीं विद्याभ्यासाठीं पाठविण्याचा परिपाठ ठेवला होता. बालकन प्रांतांतील लोक तुर्कांच्या

कारभारास फार कंटाळले होते व आपणांस रशियानें मदत करून यां त्रासांतून सोडवावें अशी त्यांची फार इच्छा होती. ओडीसा शहरीं राजकीय चळवळीसंबंधानें विशेष प्रकारची तरतूद करण्यासाठीं एक कमेटी नेमण्यांत आली होती. बलगेरिया प्रांतांतील लोकांच्या दुःखा-बद्दल रशियास फार वाइट वाटे केवळ एका प्रांताच्या सुखासाठीं सगळ्या युरोपांत लढाईचा भडका उडवून देण्याचे साहस रशियास करावेसें वाटलें नाहीं. बलगेरिया प्रांतांतील धार्मिक संस्था कोणत्या हुकमतीखालीं चालाव्या याबद्दल नेहमीं वाद चालू असे. असो. इ. स. १८७६ सालीं बलगेरियानें स्वतंत्र होण्यासाठीं मोठ्या जोराची चळवळ सुरू केली. या चळवणीस ग्रीक लोकांनी बराच अडथळा आणला.

इ. स. १८७५ साली सर्व्हियानें बंड उभारलें त्यावेळीं बलगेरिया फारसा विकोपास गेला नव्हता. पण तुर्की अधिकाऱ्यांनी या प्रातांत चळवळे पुढारी जे होते त्यांच्या विरुद्ध जोराची दडपशाही सुरू केली. सरकारासंबंधानें असंतोष दाखविणारांवर त्यांनीं दमदाटी सुरू केली. शाळेंतील मास्तर, धर्मोपदेशक आणि सुशिक्षित लोक यांच्यावर त्यांचा विशेष कटाक्ष होता. यापैकीं कित्येकांस कैद करण्यांत आले व बऱ्याच लोकांस क्रूरतेनें वागवून देशोधडीस लावण्यांत आले. कित्येकांस हद्दपार केलें. हद्दपार केलेल्या लोकांनी बुखारेस्ट येथें एक कमेटी

स्थापन केली. बल्गेरियांतील राज्यकारभार सुधारावा या हेतूनेंच ही सभा स्थापन करण्यांत आली होती. प्रजा असंतुष्ट झाली असतां तिला ताळ्यावर आणावयाचें म्हणजे त्यांच्यावर नानातऱ्हेचे जुलूम करावयाचे, छळ करावयाचे व तीस त्रासवून सोडावयाचें या पूर्वीच्या पद्धती याही वेळीं तुर्की अधिकाऱ्यांनी अनुसरल्या होत्या. या पद्धती-संबंधानें इंग्लंडांत फार खळबळ उडाली. या पद्धतीची रसभरित वर्णनें इंग्लंडांत प्रसिद्ध होऊं लागलीं. त्यावेळच्या एका बातमीदार 'डेलीन्यूज' नांवाच्या पत्रांत म्हणतो कीं, बल्गेरियांतील ३० खेडीं अधिकाऱ्यांनी जाळून टाकलीं आणि तेथील प्रजेस ठार मारण्यांत आलें. 'तुर्की अधिकारी तरुण मुली कैद करतात व प्रत्येकीं दोन किंवा तीन पौंडास विकून टाकतात' असाही एक गंभीर आरोप इंग्लंडच्या पत्रांतून करण्यांत आला होता. तुर्कस्थानांतील या जुलमांची आणि क्रूरपणाची हाकाटी इंग्लंडांत अतीशय विकोपाला गेली. या संबंधानें पार्लमेंटांतही प्रश्नोत्तरें झालीं. शेवटीं या आरोपांचा खरेखोटेपणा आजमावून पाहण्यासाठीं तिकडे एक मुखत्यार पाठविण्यांत यावा असें पार्लमेंटांत ठरलें. मि. बारिंग नावाच्या एका गृहस्थास मुखत्यार म्हणून पाठविण्यांत आलें. याचवेळीं अमेरिकन सरकाराकडूनही एक मुखत्यार पाठविण्यांत आला होता. मि. बारिंग यांणी जो रिपोर्ट सदर केला होता. त्यांत '९१ खेडीं बेचिराख करण्यांत आलीं व

१२ हजार माणसांस ठार मारण्यांत आलें आहे ' असें लिहिलें होतें. अमेरिकन मुखत्यारानें आपल्या रिपोर्टांत ६० खेडीं लिहून कत्तल उडविलेल्या माणसांची संख्या १५००० दिली होती. तुर्की अधिकाऱ्यांच्या या जुलमी कृत्यांबद्दल सर्व युरोपांत व विशेषतः इंग्लंड व रशिया या देशांत फार हल्लकल्लोळ उडाला. हा जुलूम कमी व्हावा आणि तुर्की राज्यपद्धत व्यवस्थित व्हावी ह्मणून कान्स्टांटिनोपल येथें सुधारणांचा खर्डा तयार करण्यासाठीं एक परिषद बोलवावी असें ठरलें. या सूचनेस तुर्की अधिकाऱ्यांस उघड उघड निषेध दाखवितां येईना. ही परिषद ता. २१ दिसेंबर १८७६ रोजीं भरली. लार्ड सालिसबरी हे या परिषदेंत इंग्लंड तर्फे मुख्यत्यार होते. सावेटपाशा व इधेम पाशा हे टर्कीचे मुखत्यार होते.

या परिषदेंत ज्या सुधारणा सुचविण्यांत आल्या त्या पाहून अबदुल हमीद यांचें धाबेंच दणाणलें. त्यांचें ह्मणणें असें पडलें कीं ' ज्या सुधारणांच्या योगानें माझा अधिकार पूर्वीच्या सुलतानाहून कमी प्रमाणांत होईल तशा सुधारणा ग्रहण करण्यास मीं कसें तयार व्हावें ? तुर्कस्थानांतील वर्तमान पत्रें ह्मणजे सुलतानानें भारून ठेवलेलीं भुतें. तीं सुलताना प्रमाणेंच बोलूं लागलीं यांत नवल नाहीं. इंग्लडचे प्रधान मि. डिझ्रायली हे सुलतानाच्या पक्षाचे होते तेव्हां या पत्रांनीं अशी कोल्हेकुई केली कीं, ' इंग्लडच्या प्रधानांस ज्या सुधारणा सम्मत नाहीं त्यांस त्यांचे मुखत्यार येथें अनुमती देतात पण हें करणें अयोग्य होय. '

या परिषदेंतील युरोपियन मुखत्यारांनी सुधारणांस सम्मती दिली पण टर्कीचे मुख्यत्यार अबदुल हमीदच्या अनुमती शिवाय सम्मति कशी देणार ? एकंदरीनें परिस्थिती मोठी कठीण प्राप्त झाली पण मिधतपाशाचा मंत्र अबदुलहमीद यांस मिळाला होता तेव्हां परिषदेची बैठक सुरू होण्याच्या वेळींच १०० तोफांचा गडगडाट झाला. तेव्हां सुलतानसाहेब सुधारणा देण्यास तयार आहेत हें पाहून परिषदेंत पहिल्याच दिवशीं मोठी गडबड उडाली. आतां काय करावें या विवंचनेंत असतां रशियन मुखत्यार एम-इगनेटिव्ह यांनीं परिषदेंत स्पष्ट बोलून दाखविलें कीं प्रत्येक मुखत्यारास आपल्या सरकारची इच्छा प्रदर्शित करावयाची आहे व त्यासाटींच आपण येथें जमलों आहोत तेव्हां सुलतानाच्या जाहीरनाम्याशी आपणांस कांहीं एक कर्तव्य नाही ' हें भाषण ऐकून परिषदेंत शांतता झाली व तिचें काम कांहीं दिवस शांतपणें चालू राहिलें. पण शेवटीं त्या परिषदेचा व्हावा तसा परिणाम घडला नाहीं परिषदेंत सुचविलेल्या सुधारणा करण्याचें साफ नाकारण्यांत आलें. तुर्कस्थानांतील प्रजे विषयीं व विशेषतः ख्रिस्ती प्रजे विषयीं इग्लंड व रशिया यांस फार आदर वाटत होता. पण केवळ बलगेरिया साठीं सर्व युरोपांत युद्ध माजणें चांगलें नाहीं व कांहीं झालें तरी युरोपांत टर्की ल्हानसा का होईना पण स्वतंत्र असा असावा असें इग्लंडचें मत पडलें त्यामुळें ही परिषद कांहींही न करता सुरू झाली तशीच बंद झाली. युरोपियन राष्ट्रांत सुधारणासंबंधानें ऐक्यता नाहीं हें पाहून सुलतान

अधिकच चढून गेले व त्यांनी दिलेल्या सुधारणा अम्मलांत आणण्याचेंही नाकारलें. वर सांगितलेल्या परिषेंत जे दोन मुखत्यार टर्कीच्या तर्फे होते त्यांनी ' कांहीं तरी सुधारणा द्या ' असें सुलतानसाहेबांस परोपरीनें सांगितलें पण सुलतान ऐकतना शेवटीं या मुखत्यारांवर सुलतानांचा गैर मर्जी झाली एवढा लाभ मात्र त्यांस झाला.

परिषदेंत ठरल्या प्रमाणें किंवा सुलतानानें जाहिर केल्या प्रमाणें कांहींच सुधारणा दिल्या जात नाहींत हें पाहून रशियानें एक जाहिरनामा काढला व त्यांत स्पष्ट ह्मटलें कीं ज्या अर्थी शांत आणि सौम्य उपायांनीं टर्कीचें सुलतान राज्यकारभारांत सुधारणा करीत नाहींत त्या अर्थी त्या सुधारणा घडवून आणण्यासाठीं आह्मांस निराळे उपाय योजले पाहिजेत ' हा जाहिरनामा काढून रशियानें लागलीच टर्कीच्या विरुद्ध लढाई पुकारली.

या लढाईत तुर्की सैन्यानें प्रथमतः चांगलें शौर्य दाखविलें. मुखत्यार पाशा हा या सैन्याचा मुख्य अधिपती होता. हा एशिया मायनर मध्यें होता. रशियानें दक्षिणेस ह्मणजे एशियामायनरमध्यें व युरोपांत लढाई सुरू केली ? रशिया एशियामायनर मधून पश्चिमेकडे येत होता. याचा ही स्वारी मुक्त्यार पाशानें चांगल्या रिसीनें थांबवून धरली. ड्यन्युबनदीच्या मार्गानें येणाऱ्या रशियन सैन्यावर तुर्की सैन्याची एक तुकडी गेली आणि बोसनीया आणि हेरझेगोविना येथें उपस्थित झालेलीं बंडें मोडण्यासाठीं महेनत आल्ली हा सैन्यानिशीं गेला. पश्चिमेकडे

सेनान्य: रशियन सैन्यास रोम्यानियन सैन्याची चांगली मदत झाली. या सैन्यासह रशिया ड्यान्यूब नदी पार होऊन बाल्कन प्रांतांत शिरला. या प्रांतातील खिस्ती प्रजा रशियास अनुकूल होती पण तुर्की फौजेनें चांगलें तोंड दिल्यामुळें रशियन सैन्य बाल्कन प्रांतांत शिरलें. प्लेवना नांवाच्या ठिकाणीं बरेंचसें तुर्की सैन्य वेढलें गेलें. याठिकाणीं ओसमान पाशा सेनाध्यक्ष होता. हें ठिकाण लवकरच पडलें. नंतर शेवना येथें जंगी लढाई झाली. या ठिकाणीं एक लाख तुर्की सैन्य होतें. येथेंही तुर्की सैन्याचा पराभव होऊन त्या सैन्याचा अधिपती व्हेरोल पाशा हा शरण आला. या सैन्यानें शस्त्रें खालीं ठेविलीं व सर्व कैदी झाले. रशियन सैन्य फिलिपोपोलिस प्रांतांत आलें असून आपल्या सैन्याचा मोड होत आहे असें पाहून अबदुलनें मुखत्यार पाठविले पण त्यास कोणत्याही प्रकारचें कायमचें बोलणें करण्याचा अधिकार नव्हता अर्थात रशीयानें लढाई थांबविण्याचें साफ नाकारलें. रशिया आपलें १,६०,००० सैन्य घेऊन कान्स्टांटिनोपलच्या बराच जवळ गेला तेव्हां इ. स. १८७८ च्या जानेवारी महिन्यांत तह करणें भाग झालें व त्याप्रमाणें वडूनही आलें.

याबेळीं आपणांस इंग्लंडची चांगली मदत होईल असें अब्दुल हमीद यांस वाटलें होतें. पण ती मदत व्हावी तशी झाली नाहीं. मारमोराच्या समुद्रांत इंग्लंडचें आरमार व हिंदी सैन्य आलें होतें हें खरें पण रशिया पुढें चाल करून येतच आहे हें पाहून अबदुल हमीद फार घाबरला.

याचेळीं सर हेन्री लेयर्ड हे तुर्की दरबारांत इंग्लंडचे वकील होते. रशियन सैन्य राजधानीकडे वेगानें येत आहे असें पाहून अबदुल हमीदनें आपलीं कुंडी भांडीं पुढें पाठवून आपणही ब्रुसा येथें जाण्याच्या तयारीस लागला. ही गोष्ट इंग्रजी वकिलास कळतांच त्यानें अबदुल हमीद यास अशी ताकीद दिली कीं जर तुह्मी कान्स्टांटिनोपल सोडाल तर इंग्लंड कधींही मदत करणार नाहीं आणि तुह्मांस परतही येऊं दिलें जाणार नाहीं.' या ताकिदीमुळें अबदुल हमीदनें निघून जाण्याचा बेत रहित केला.

रशियाचें सैन्य कान्स्टांटिनोपल जवळ आलें असतां तें त्या शहरावर गेलें नाहीं यांस एक दोन कारणें होतीं. मारमोराच्या समुद्रांत इंग्लंडचें आरमार आलें होतें हें एक कारण व दुसरें कारण रशिया आणि आस्त्रिया यांच्यामध्यें झालेला गुप्त तह हें होय. या गुप्त तहानें असें ठरलें होतें कीं बालकन्सप्रांताच्या पलीकडे रशियानें जातां कामा नये. रशियन सैन्य स्यान स्टेफयानो पर्यंत गेलें असें ऐकतांच आस्त्रियानें सैन्य सरहदीवर गोळा करण्याची सुरुवात केली. आस्त्रियाची ही गडबड पहातांच त्या वेळचे प्रसिद्ध मुत्सद्दी प्रिन्स बिसमार्क यांणी आस्त्रियाच्या बादशहास असा निरोप पाठविला कीं इंग्लंडनें आपलें आरमार नेलें आहेच तेव्हां तुह्मी यावेळीं गप्प बसणें चांगलें.'

कान्स्टांटिनोपल पासून १२ मैलांवर इंग्लंडचें आरमार होतें आणि

२० मैलांवर रशियाचें सैन्य होतें. या कचींत सांपडल्या मुळें स्यास्टेफेनो येथें तह करणें सुल्तानास भाग झालें. या तहान्वयें रोमानिया, सर्विया आणि मांटेनीग्रो या देशांस पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें. बेसअरेबिया आणि डोब्रुजा हे प्रांत रोमानियास देण्यांत आले. ड्यानूब नदीवरील सर्व किल्ले पाडून टाकावे आणि दार्दानेल्सची सामुद्रधुनी व्यापारासाठीं सर्व राष्ट्रांस मोकळी असावी असें ठरविण्यांत आलें. या तहांत फार महत्वाची अट ही होती कीं बल्गेरिया प्रांतास स्वातंत्र्य देण्यांत आलें. तसेंच या तहानें बल्गेरिया देशाचें क्षेत्रही फार मोठें करण्यांत आलें

अशा रितीनें रशियानें टर्कीशीं तह केला खरा पण तुर्कस्थानासंबंधानें जी कोणतीही व्यवस्था करावयाची असेल ती युरोपांतील सर्व राष्ट्रांच्या सम्मतीनें झाली पाहिजे असें मि. ग्लाडस्टन यांचें मत होतें. तेव्हां स्टेफेनोच्या तहाची तपासणी अशा परिषदेमार्फत पुनः व्हावी अशी एक सूचना त्यांनी पुढें आणली व ती सर्वांस पटल्यामुळें तशी परिषद बर्लिन येथें बोलावण्याचें ठरलें. इंग्लंडची ही ढवळाढवळ रशियाला मान्य नव्हती व तो या परिषदे संबंधानें कुरकुर करूं लागला होता. रशिया आपल्या १,८०,००० सैन्यासह राजधानी पासून २० मैलावर होता व त्याच्या मनांतून कान्स्टांटिनोपलवर स्वारी करून तें हस्तगत करून घेण्याचें फार होतें. पण जर्मनीच्या मदतीनें आस्ट्रियानें लढाई पुकारल्यास रशियाचें सैन्य अडकलें जाणार होतें ह्मणून

रशियास विशेष गडबड करता येईना. अशा चमत्कारिक पेचांत सांपडल्यामुळें रशियानें बर्लिन परिषदेस अनुमोदन दिलें.

या परिषदेचें काम ता. १२ जून १८७८ रोजीं सुरु झालें आणि हें काम एक महिना चालू होतें. ता. १३ जुलै रोजीं तहावर सह्या झाल्या. या तहावरून बलगेरियाचें राज्य क्षेत्र कमी करण्यांत आलें. पूर्व रूमेलिया नावाचा एक नवा प्रांत तयार करण्यांत आला व यावर सुलतानानें गव्हरनर नेमावा मात्र त्यांस इतर राष्ट्रांची अनुमती असली पाहिजे. बलगेरिया प्रांतावर ज्या राजपुत्राची नेमणूक होईल तो सुलतानाचा मांडलीक ह्मणून असला पाहिजे. मात्र या प्रांताच्या राज्यकारभारांत हात घालण्याचा अधिकार सुलतानास नाहीं. पूर्व रूमेलियांत दगा फिसाद झाल्यास तो शांत करण्यासाठीं सुलतानास आपलें सैन्य पाठवितां येईल. या तहानें लढाईचा खर्च ह्मणून बरीच रक्कम सुलतानास द्यावी लागली.

स्टेफयानो येथील तहांत टर्कीनें बेसआरेबिया हा प्रांत रशियास द्यावा आणि त्या ऐवजीं डोब्रुजाचा बराच भाग रोमानियास मिळावा असें ठरलें. बेस अरेबियाबद्दल रशिया इतकी कां मागणी करतो याचें उत्तर क्रीमियन लढाईत त्याचा जो नक्षा उतरला होता तो भरून निघावा हेंच होय. रोमानिया, सर्विया आणि मांटेनिग्रो यांस पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें.

२० मैलांवर रशियाचें सैन्य होतें. या कैचींत सांपडल्या मुळें स्यास्टेफेनो येथें तह करणें सुलतानास भाग झालें. या तहान्वयें रोमानिया, सर्विया आणि मांटेनीग्रो या देशांस पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें बेसअरेबिया आणि डोब्रुजा हे प्रांत रोमानियास देण्यांत आले. ड्यानूब नदीवरील सर्व किल्ले पाडून टाकावे आणि दार्दानेलची सामुद्रधुनी व्यापारासाठीं सर्व राष्ट्रांस मोकळी असावी असें ठरविण्यांत आलें. या तहांत फार महत्वाची अट ही होती कीं बलगेरिया प्रांतास स्वातंत्र्य देण्यांत आलें, तसेंच या तहानें बलगेरिया देशाचें क्षेत्रही फार मोठें करण्यांत आलें

अशा रितानें रशियानें टर्कीशीं तह केला खरा पण तुर्कस्थानासंबंधानें जी कोणतीही व्यवस्था करावयाची असेल ती युरोपांतील सर्व राष्ट्रांच्या सम्मत्तीनें झाली पाहिजे असें मि. ग्लाडस्टन यांचें मत होतें. तेव्हां स्टेफेनोच्या तहाची तपासणी अशा परिषदेमार्फत पुनः व्हावी अशी एक सूचना त्यांनी पुढें आणली व ती सर्वांस पटल्यामुळें तशी परिषद बर्लिन येथें बोलावण्याचें ठरलें. इंग्लंडची ही ढवळाढवळ रशियाला मान्य नव्हती व तो या परिषदे संबंधानें कुरकुर करूं लागला होता. रशिया आपल्या १.८०,००० सैन्यासह राजधानी पासून २० मैलावर होता व त्याच्या मनांतून कान्स्टांटिनोपलवर स्वारी करून तें हस्तगत करून घेण्याचें फार होतें. पण जर्मनीच्या मदतीनें आस्त्रियानें लढाई पुकारल्यास रशियाचें सैन्य अडकलें जाणार होतें म्हणून

रशियास विशेष गडबड करता येईना. अशा चमत्कारिक पेंचांत सांपडल्यामुळें रशियानें बर्लिन परिषदेस अनुमोदन दिलें.

या परिषदेचें काम ता. १२ जून १८७८ रोजीं सुरु झालें आणि हें काम एक महिना चालू होतें. ता. १३ जुलै रोजीं तहावर सह्या झाल्या. या तहावरून बलगेरियाचें राज्य क्षेत्र कमी करण्यांत आलें. पूर्व रूमेलिया नावाचा एक नवा प्रांत तयार करण्यांत आला व यावर सुलतानानें गव्हरनर नेमावा मात्र त्यांस इतर राष्ट्रांची अनुमती असली पाहिजे. बलगेरिया प्रांतावर ज्या राजपुत्राची नेमणूक होईल तो सुलतानाचा मांडलीक ह्मणून असला पाहिजे. मात्र या प्रांताच्या राज्यकारभारांत हात घालण्याचा अधिकार सुलतानास नाहीं. पूर्व रूमेलियांत दगा फिसाद झाल्यास तो शांत करण्यासाठीं सुलतानास आपलें सैन्य पाठवितां येईल. या तहानें लढाईचा खर्च ह्मणून बरीच रक्कम सुलतानास द्यावी लागली.

स्टेफयानो येथील तहांत टर्कीनें बेसआरेबिया हा प्रांत रशियास द्यावा आणि त्या ऐवजीं डोबुजाचा बराच भाग रोमानियास मिळावा असें ठरलें. बेस अरेबियाबद्दल रशिया इतकी कां मागणी करतो याचें उत्तर क्रीमियन लढाईत त्याचा जो नक्षा उतरला होता तो भरून निघावा हेंच होय. रोमानिया, सर्विया आणि मांटेनिग्रो यांस पूर्ण स्वातंत्र्य देण्यांत आलें.

या बर्लिनच्या तहांत आणखीही लहान मोठ्या अटी होत्या. क्रीट-बेटांतील राज्यव्यवस्था नीट व्हावी ह्मणून या तहांत त्या संबंधानें खडा करण्याचें ठरलें. ग्रीस आणि मांटेनीग्रो यांस कांहीं नवे प्रांत मिळाले आणि या तहावर सुलतानाच्या मुखत्यारांनीं सह्या केल्या असतांही ते नवे प्रांत त्यांस देण्याचें सुलतानानें साफ नाकारलें. सुलतानाची ही सुल्तानशाही तीन वर्षें चालली पण जेव्हां इग्लंडचें आरमार आलें तेव्हां त्यांस आपलें ह्मणणें परत घ्यावें लागलें. आरमेनिया प्रांतांतील राज्यकारभारासंबंधानें एक अट होती व ती अट अमलांत आणली असती तर राज्यकारभारही सुधारला असता पण तसें कांहीं घडलें नाहीं आणि आरमेनियाचे दुर्दैव तसेंच चालू होतें. बर्लिन तहावर सह्या झाल्यानंतर बरेंच दिवस इंग्रजी आरमार मारमोरा समुद्रांत होतें तें इ. स. १८७८ च्या आक्टोबरांत परत गेलें.

टर्कीच्या दरबारांत इग्लंडच्या वकिलातीचें काम करीत असलेले सर लेयार्ड यांणी क्रीट बेटा संबंधानें सुलतानाशीं कांहीं गुप्त तह केला होता व तो तह बर्लिन येथील परिषदेचें काम आटोपल्यावर कांहीं दिवसानीं प्रसिद्ध करण्यांत आला. हा तह करण्यांत हेतू काय होता हें स्पष्ट होत नाहीं. भूमध्य समुद्रांत इंग्रजी आरमारास कोठें तरी निवाऱ्याची जागा असावी ह्मणून हा तह केला या ह्मणण्यांत कांहींच अर्थ नाहीं. रशियानें टर्कीवर स्वारी केल्यास त्या वेळीं इग्लंडनें टर्कीला मदत करावी या हेतूनेंच हें बेट सुलतानानें इग्लंडला दिलें असें त्यासंबंधाच्या

अटी वरून दिसतें. हें बेट ग्रीसला परत द्यावयाचें होतें पण तसें कांहीं न होतां हें बेट इ. स. १९१४ साली ब्रिटिश साम्राज्यास जोडण्यांत आलें.

---

## भाग ६ था.

# बर्लिन परिषदेनें उत्पन्न झालेले प्रश्न.

बर्लिन परिषदेंत ठरलेल्या तहावर ज्यांनीं सह्या केल्या त्यांस तीन मुख्य प्रश्नांचा विचार करावयाचा होता. ( १ ) आरमेनिया प्रांतास सुधारणा देणें ( २ ) मांटेनीग्रोचें क्षेत्र वाढविणें आणि ग्रीसचेंही क्षेत्र वाढविणें. ( ३ ) पूर्व रुमेलिया प्रांतावर गव्हरनराची नेमणूक करणें.

आरमेनियाला सुधारणा देण्यासंबंधानें बर्लिन तहाच्या ६१ व्या कलमांत ह्मटलें होतें कीं:—" आरमेनियन लोकांची वस्ती ज्या प्रांतांत असेल त्या प्रांतांस सुधारणा देणें व तेथील राज्यकारभार सुधारणें या गोष्टी टर्की फार लवकर करील. तसेंच सरक्याशियन आणि कर्ड या कडव्या जातीपासून त्यांचें रक्षण करील. या गोष्टी कसकशा अमलांत आल्या त्याची माहिती टर्की इतर राष्ट्रांस वेळोवेळीं देईल."

या प्रांतांत कोणकोणत्या सुधारणा कराव्यात हें सुलतानास सुच-

विण्याची कामगिरी सर हेन्री लायर्ड याजवर सोंपविली होती. सदर-गृहस्थ टर्कींच्या दरबारांत इंग्लंडचे वकील होते. हे तुर्क लोकांचे चहाते होते. सरहेन्री यांणी ही कामगिरी मोठ्या उत्साहानें अंगावर घेतली.

आपण आरमेनिया प्रांतांत ज्या सुधारणा करण्याबद्दल सुलतानांस सांगणार आहोंत त्या ख्रिस्ती व मुसलमानी या दोन्ही प्रजेस हितावह असल्यामुळें त्यांस सुलतान खात्रीनें आपली सम्मति देईल असें सर हेन्री यांस वाटत होतें. सर इलियट यांच्या मागून हे सर हेन्री ज्यावेळीं टर्कींच्या दरबारांत आले त्यावेळीं अबदुल हमीद यानें त्यांचे चांगलें आदरातिथ्य केलें यामुळें तर अधिकच आशा वाटूं लागली. अबदुल हमीद गादीवर येण्यापूर्वी टर्कीचा राज्यकारभार बऱ्याच अंशानें वजिरांच्या सल्ल्यानें होत होता. आणि असाच कारभार अबदुल हमीदच्या कारकीर्दीतही चालू असता तर सर हेन्री यांची आशाही सफल झाली असती. पण अबदुल हमीद गादीवर आल्यावरोबर त्यानें राज्याचा सर्व कारभार आपल्या हातीं घेतला व वजिरांस बाहुलीं बनविलीं होतीं. ‘ सुधारणा ’ किंवा लोकनियंत्रित राज्यकारभार ’ हे शब्द अबदुल हमीद यांस शत्रू-प्रमाणें वाटत. अशी जेथें वस्तुस्थिती तेथें सर हेन्री यांच्या आशा व्यर्थ गेल्या यांत नवल नाहीं. सर हेन्री यांणी तयार केलेल्या सुधारणा अबदुल हमीदचे मुखत्यार आणि इतर राष्ट्रीय वकील यांणी तपासून पाहिल्या व त्यांनीं पसंतही केल्या. पण या कामीं

तुर्की प्रधानांस कोणताही अधिकार नाहीं असें जेव्हां निदर्शनास आलें तेव्हां त्या सुधारणा अमलांत यावयाच्या कशा ! हा मोठाच प्रश्न पडला. या विवेचनांत सुलतानाच्या तर्फे ज्या प्रधानानें विशेष भाग घेतला होता त्यांसच या सुधारणांस जोराचा विरोध करण्याबद्दल हुकूम करण्यांत आला. अर्थात या विवेचनांत प्रत्येक कलमाचा विचार होई व त्यास सदर प्रधान विरोध करीत. सर हेन्री यांणी तयार केलेल्या सुधारणा बरोबर नाहींत असें बाह्यतः दाखवून सुलतानानें सुधारणांचा नवा खर्डा तयार केला. शेवटीं सुलतान साहेब खुद्द सर हेन्री साहेबांबद्दल व ते ज्या देशाचे वकील होते त्या देशाबद्दल जरी खूप आदर दाखवित होते तरी कोणत्याहि प्रकारच्या सुधारणा देण्यास ते तयार नाहींत असेंच दृष्टोत्पत्तीस आलें. या वेळीं सर हेन्री यांची परिस्थिती मोठी बिकट झाली. आपण तुर्की लोकांचे मोठे चाहाते आहोत ही इंग्लंडमध्यें दुमदुमून राहिलेली आपली कीर्ति अबदुल हमीदच्या या कृतानें फुकट जाणार असें या साहेबांस वाटूं लागलें. सर साहेबांनीं सुलतान साहेबांस सुधारणा सुचवून बरेच महिने लोटले तरी सुलतान साहेब कांहीं करीत नाहींत हें पाहून आरमेनियन लोकांचें दुर्दैव अजून संपलें नाहीं असेंच सर साहेबांस वाटूं लागलें.

सरते शेवटीं हो ना करतां करतां आरमेनिया प्रांतांत जो सर ग०व्हरनर नेमावयाचा तो ख्रिस्ती असावा अशी एक सुधारणा कर-

ण्याचें ठरलें. अशा प्रकारची नेमणूक झाली असतां कायद्याची अम्मल बजावणी नरम गरम होऊं शकली असती पण ही नेमणूक करण्याचा अधिकार सुलतान साहेबांनीं आपल्या हातीं ठेवला होता तेव्हां गव्हरनरच्या मर्जीविरुद्ध अगर सुलतान साहेबाच्या मर्जीविरुद्ध वागल्यास या ख्रिस्ती सब गव्हनराची उचलबांगडी सहन होऊं शकली असती अर्थात या सुधारणेनें कांहींच फायदा झाला नाहीं हें सांगावयास नकोच.

इकडे हा असा प्रकार चालू असतां इंग्लंडमध्यें नवी निवड झाली व त्यांत लिबरल पक्ष राज्यारूढ झाला. या पक्षानें सर हेन्री यांस एकदम परत बोलावलें. सर साहेबांनीं सुधारणा घडवून आणूं अशी खूप बढाई मारली होती पण त्यांच्या हातून तसें कांहींच घडलें नाहीं तेव्हां त्यांसही विशेष गडबड न करतां चुरमुरे खात परत यावें लागलें. याचवेळीं आणखीहि एक गमतीचा प्रकार घडून आला, एका ग्रीक गृहस्थानें ग्रीक भाषेंत मि. ग्लाडस्टन यांस एक पत्र लिहिलें होतें. याचें उत्तर मि. ग्लाडस्टन यांणी त्याच भाषेंत दिलें. होतें. हें पत्र या गृहस्थानें सर साहेबांस दाखविलें. पण सर साहेबांस ग्रीक येत नव्हतें तेव्हां त्याचें भाषांतर करून घेतलें हें भाषांतर मुळांत चुकलें होतें. पण तें सर हेन्री यांस न समजल्यामुळें त्या खोट्या भाषांतरावर त्यांनीं विलायतेंतील एका वर्तमानपत्रास एक बातमीपत्र पाठविलें व त्यांत मि. ग्लाडस्टनवर

या पत्राप्रमाणें कांहीं आरोप करण्यांत आले. शेवटीं भाषांतर चुकीचें ठरून सर साहेबांचें ह्मणणें खोटें ठरलें तेव्हां सर साहेबांस मुठींत नाक धरून परत येणें भाग पडलें. यांच्या नंतर राईट आन. गास्चेन यांची नेमणूक झाली. सर साहेबांस परत बोलावलें यावरून इंग्लंडच्या वकिलामार्फत त्या देशाचा मी पराभव केला अशी खोटीच बढाई अब्दुल हमीद याणें मारली. सुलतान-साहेबांच्या अक्कलेची तारीफ काय करावी? बर्लिनच्या तहा प्रमाणें आरमेनियाशिवाय इतर गोष्टी संबंधानें तरी कांहीं करा असें मि. गास्चेन यांस सांगण्यांत आलें होतें.

आरमेनियन प्रश्नाचा निकाल वर लिहिल्या प्रमाणें झाल्यानंतर बर्लिन येथें ठरलेल्या तहांत ठरल्याप्रमाणें मांटेनीग्रो यांस स्वातंत्र्य देण्याचा दुसरा प्रश्न मि. गाश्चेन यांणी हातीं घेतला. आड्रियाटिक समुद्रावरील आंटिवारी हें बंदर मांटेनीग्रो यांस द्यावें असें या तहांत ठरलें होतें. अशा प्रकारें एखादें बंदर किंवा प्रांत मी कधींही देणार नाहीं असें अब्दुल हमीद यांणी ठासून सांगितलें होतें. तुर्कस्थानचे निरनिराळे लचके निरनिराळ्या वेळीं देण्यांत आलेले होते. या प्रत्येक वेळीं सुलतान एक गमतीची युक्ति योजी. या तुकड्यावर ख्रिस्ती गव्हरनराची नेमणूक करण्यांत येई आणि या ख्रिस्ती माणसानें काफिरास टर्की मुसलमानी राज्याचा तुकडा तोडून दिला असा बहाणा करण्यांत येई; यामुळें प्रजा सुलतानास दोषी न ठरवितां या काफीर ख्रिस्ती

गव्हरनराच्या डोक्यावर या दोपाचें खापर फोडा ! खुद्द बर्लिन येथें तुर्कस्थान तर्फे जो मुखत्यार गेला होता तो खिस्ती धर्माचा होता. याचें नांव अलेक्झांडर पाशा होय. या परिषदेंत या मुखत्यारानें प्रिन्स बिस्मार्क व लार्ड सालिसबरी यांच्याशीं बेसुमार वाद घातला पण जेथें सर्व युरोपियन राष्ट्रें एकमताचीं झालीं होतीं तेथें या एकट्या बिचाऱ्याचें काय चालणार. प्रिन्सबिस्मार्कनें तर या मुक्त्यारास असा दम भरला कीं या परिषदेंत वादविवाद करण्याचा तुम्हांस हक्कच नाहीं; ही परिषद जें ठरवील तें मुकाट्यानें कबूल करणें हाच तुमचा धर्म आहे. काल गती काय विचित्र आहे पहा ज्या मुसलमानी साम्रा ज्याच्या मुखत्यारास त्या साम्राज्याच्या संबंधानें वादविवाद चालू असतां बोलण्याचा हक्क नसावा हा न्याय कोठला ? यास एकच उत्तर. काल-चक्र. अशा प्रकारें मुखत्यारानें कबुली दिली आहे असें ठरवून त्या तहाची अम्मलबजावणी हीं बलाढ्य राष्ट्रें करूं लागलीं ? पण ' मी कांहीं देणार नाहीं ' हें गाणें अबदुल हमीदचें चालूंच होतें. आरमेनिया प्रकरणांत इंग्लंडला चकविलें तेव्हां पुढेंही आपण असेंच चकवूं असा अबदुलहमीद खुषींत गाजरें खात होता. बिचारा निःशक्त बन लेला सुलतान बलाढ्य बनलेल्या राष्ट्रांपुढें काय करणार ! त्यांतल्या त्यांत हात पाय झाडून पहात होता झालें. आंटिवारी हें बंदर साफ देणं नाहीं असा सुलताना कडून जबाब मिळाल्या नंतर ब्रिटिश प्रधान मंड-ळानें बर्लिन येथें जमलेल्या राष्ट्रांस पुनः एकत्र बोलावलें. आड्रियाटिक

समुद्रांत सगळ्या राष्ट्रांनी आपापलें थोडें थोडें आरमार आणावें आणि सुलतानास वरील बंदर देण्यास भाग पाडावें असें ठरलें व त्या प्रमाणें सर्वांचे आरमार त्या ठिकाणीं आलें. पण या धमकावणीस अबदुल हमीद भीक घालीना. कित्येक आठवडे गेले तरी कांहींच प्रकार घडेना हें पाहून इंग्रज शिवाय सर्वांचें आरमार परत फिरलें. हें पाहून अबदुल हमीद मनांत हर्ष पावला आणि ' सगळ्या युरोपियन राष्ट्रांस मी धुडकावून लावलें ' अशी खात्री प्रजेला लवकरच पटेल अशा प्रकारचे मनचे मांडे खाऊं लागला. इतर राष्ट्रांनीं जें ठरविलें तें घडवून आणण्याचें जोखमाचें काम एकट्या इंग्लडनें आपल्या अंगावर घेतलें. मि. गाश्चेन एके दिवशीं अबदुलहमीद यास भेटावयास गेले आणि त्यांनी निर्वाणीचा प्रश्न सांगितला. सुलतानानें ' कांहीं द्यावयाचें नाहीं ' असें जाहिर केलें होतें आणि इतर राष्ट्रांचें आरमार निघून गेल्या मुळें एकट्या इंग्लंडचेंच आरमार आहे हेंही अबदुलहमीदला समजलें होतें तेव्हां अशा प्रकारें निर्वाणीचा प्रश्न सुलतानापुढें टाकणें वरेंच धोक्याचें होतें. इतकेंच नाहीं तर यावेळीं इंग्लंड आपल्या शक्तीच्या पलीकडे हें काम करीत आहे असें तुर्कस्थानांतील समंजस लोकांस वाटत होतें. सुलतान इंग्लंडला चांगलाच ठोका मारील असेंही कित्येक राष्ट्रांस वाटलें; असो. मि. गाश्चेन यांणी अबदुल हमीदला असें कळविलें कीं, जर यावेळीं तुह्मीं आमचें ऐकणार नाहीं तर तुमच्या राज्यांतील एक मजबूत ठिकाण आमचें आरमार आपल्या ताब्यांत घेईल. आणि आमचें ह्मणणें

कबूल होई पर्यंत ते ठिकाण सोडण्यांत येणार नाहीं. पण या धमका-वणीस अबदुलनें भीक घातली नाहीं आणि त्यानें साफ नाकाराचें उत्तर दिलें. इतर राष्ट्रांनी हात टेकलेंच होतें आतां फक्त इंग्लंड राहिलें होतें. मि. गाश्चेन यांच्या भेटींत अबदुल हमीद बराच गांगरून गेला होता असें दिसतें कारण त्याच दिवशीं सायं-काळीं त्यानें रागानें असे उद्गार काढले होते कीं 'इंग्लंडचा सत्यानाश होवो' इंग्लंडचें आरमार जय्यत तयार होतें व ठरलेल्या वेळीं उघडण्यांत येणारा एक सीलबंद लखोटाही त्या आर-माराच्या मुख्य अधिपतीपाशीं होता. लखोटा उघडण्याची वेळ जवळ जवळ येत चालली. आरमारानें नांगारलेले नांगर वर घेतले इतक्यांत त्याच दिवशीं सायंकाळीं एक लहान आगबोट कान्स्टांटिनोपल येथून या आरमाराकडे येतांना दिसूं लागली. यांत बसलेले गृहस्थ आपला हातरुमाल फडफडावीत होते. ही आगबोट आरमाराच्या सन्निध जातांच जिकडे तिकडे आनंदाच्या टाळ्या वाजूं लागल्या. या आगबोटींत बस-लेल्या गृहस्थानें एक लखोटा आणला होता व त्यांत 'सुलतानसाहेब शेवटीं एकदाचे कबूल झाले' असेंलिहिलें होतें. हा निरोप पोचतांच आरमारानें पुनः नांगर टाकले आणि कांहीं दिवस तेथें राहून परत इंग्लंडकडे आरमाराचें सुकाणू वळलें. सुलतान ठरलेलें बंदर मांटेनीग्रोला न देईल तर आरमार कोणचें ठिकाण आपल्या ताब्यांत घेणार होतें हें दोन महिन्यांनी बाहेर आलें. तें ठिकाण स्मर्ना हें होय.

ग्रीस संबंधानें उपस्थित झालेला लढा लवकरच मिटला. रशिया आणि टर्की यांच्यांत जी लढाई झाली त्यांत ग्रीस पडला नाहीं ह्मणून त्यास कांहीं बक्षिस द्यावयाचें होतें. यासंबंधानें सलोख्यानें विचार व्हावा ह्मणून बर्लिन येथें इ. स. १८८० सालीं एक परिषद भरली होती. याच सुमारास ग्रीसनें आपलें सैन्यही एकत्र गोळा केलें होतें. पण कांहीं महिने बोलाचाली होऊन थेसेली हा प्रांत ग्रीसला देण्याचें ठरलें. ग्रीस संबंधाचे इतर प्रश्नही लवकरच सुटले. क्रीट बेटांत सुधारलेली राज्यव्यवस्था व्हावी ह्मणून कांहीं पत्रव्यवहार चालू होता. पण हें बेट इंग्लंडनें आपल्या साम्राज्यास जोडलें तेव्हां सगळाच तंटा मिटला.

मांटेनिग्रो आणि ग्रीस या संबंधानें अशा प्रकारें निकाल लागल्यावर बल्गेरिया प्रकरण बर्लिन तहानें पुनः उपस्थित केलें होतें. स्यानस्टेफानोच्या तहावरून बल्गेरिया देशांत बराच मोठा प्रांत सामील करण्यांत आला होता. पण बर्लिन येथें जो नवा तह झाला त्यावरून त्यापैकीं बराचसा भाग तुर्कस्थानास परत देण्यांत आला होता. पूर्व रुमेलिया ह्मणून सरकारी कागद पत्रांत दाखल असलेला प्रांत सुलतानाच्या सार्वभौमत्वाखालीं ठेवण्यांत आला होता. या प्रांतावर ख्रिस्ती गव्हरनर नेमण्यांत येऊन तो इतर राष्ट्रांच्या सम्मतीनें सुलतानानें नेमावा असें ठरलें होतें. पूर्वी वर्णन केलेल्या रूसो

टर्कांच्या युद्धाच्या वेळीं जें रशियन सैन्य बलगेरिया प्रांतांत आलें होतें तें याच प्रांतांत होतें आणि या प्रांताच्या राज्यकारभाराची सुव्यवस्था झाल्यावर हें सैन्य परत रशियांत गेलें. मासेडोनिया हा एक निराळाच प्रांत वसवून तो बलगेरिया पासून अलग करण्यांत आला होता. या प्रांतांत सुधारणा करण्या संबंधानें सुलतानानें फार आढे वेढे घेतले आणि या मुळेंच त्याचा इतर राष्ट्रांशीं नेहमीं खटका उडत असेल. या प्रांतांत सुमारें २९ वर्षे सुलतानशाही उर्फ अराजकतेचा अम्मल चालू होता; आणि हल्लीं युरोपांत जो युद्ध प्रळय चालू आहे तोटी याच अराजकतेचा परिणाम होय.

दक्षिण बलगेरिया प्रांतावर एका ख्रिस्ती गव्हरनराची नेमणूक करण्यांत आली. हा विशेष हुषार किंवा बुद्धिवान होता असें नाहीं पण त्याचा स्वभाव चांगला असल्यामुळें तो बलगेरियन प्रजेस आवडता झाला होता. याचा अम्मल हे लोक सहन करीत होते कारण बर्लिनच्या तहा वरून कांहीं दंगा फिसाद झाल्यास या प्रांतांत फौज घुसविण्याचा हक्क सुलतानास होता ही गोष्ट तेथील प्रजा जाणून होती. बलगेरिया देशाचे हे दोन विभाग करण्यांत आले त्यामुळें बलगेरियन लोक फार नाखूष होते. एकाच जातीच्या लोकांची अशी फारकत काय ह्मणून असें त्यांच्या मनांत येई आणि त्यामुळें गव्हरनर व लोक यांच्यांत नेहमीं भांडणें लागत. अबदुल हमीद यास असा आपसांत लढा पाहिजे होता परंतु ही दुही फार वेळ टिकली नाहीं. फिलिपिपोलास येथें एका

१५०८०१

सणाच्या दिवशीं एक्य दर्शक निशाण सर्व ठिकाणीं फडकविण्यांत आलें आणि अशा रितीनें कोणत्याही प्रकारचा रक्तपात न होता दोन प्रांत एकत्र जोडले गेले. दक्षिण रूमालिया प्रांतावर जो गव्हरनर नेमला होता त्यानें हा चमत्कारिक प्रकार पाहून आणि सुलतानाच्या अमलाचा बडबडीत अपमान झाला असें समजून तो कांस्टांटि-नोपल येथें परत गेला. लोकांनींही त्याच्या परत जाण्यास आडकाठी आणली नाहीं. बलगेरियाचा राजा प्रिन्स अलेक्झांडर हा दक्षिण रुमा-निया प्रांतांत गेला तेव्हां त्याचा सन्मान फार उत्तम रितीनें करण्यांत आला. हे दोन प्रांत अशा रितीनें एकत्र झाले खरे पण हें एक्य अब-दुल हमीद यांस सहन होणार नाहीं व त्या ऐक्यांत बिघाड पाडण्यासाठीं तो पुनः सैन्य पाठवील असें बलगेरियन लोकांस खात्रीनें वाटत होतें. बलगेरिया प्रांताचें झालेलें हें ऐक्य युरोपांतील सर्व राष्ट्रांस मान्य झालें होतें. सुलतानाच्या मुख्य वजिरांनी सैन्य पाठविण्याबद्दल अबदुल हमीद यास जोराची सल्ला दिली. पण सुलतानानें याबद्दल असें स्पष्टीकरण दिलें कीं आपल्या सैन्यांत आडदांड शिपाई फार आहेत तेव्हां १८३६ सालीं ज्या प्रमाणें रशियाशीं युद्ध जुंपलें तसें पुनःकदा-चित जुंपेल तेव्हां या भानगडींत न पडणें हेंच चांगलें. अशा प्रकारें या प्रकरणाचा निकाल लागला आणि बलगेरियाचा राजा प्रिन्स अले-क्झांडर यांसच सुलतानानें दक्षिण रुमानियाचा गव्हरनर नेमलें व ही नेमणूक पांच वर्षे पर्यंत चालू राहील असें ठरविलें. या हुकुमा प्रमाणें

प्रिन्स अलेक्झांडर गव्हरनर ह्मणून दक्षिण रुमानियावर राज्य करीत होता.

पण बलगेरियाचें नष्टचर्य अजून संपलें नव्हतें. बलगेरियाचें हें वैभव पाहून आस्ट्रियाच्या पोटांत दुखूं लागलें आणि त्याच्याच जवळ असलेल्या व स्वातंत्र झालेल्या सर्व्हियास बलगेरियाचा हेवा वाटूं लागला. दक्षिण रुमेलिया प्रांत आपल्या राज्यांत यावा अशी इच्छा बाळगून त्यानें बलगेरियावर स्वारी केली. रुमालियां प्रांत तत्वतः जरी बलगेरियाचा झाला होता तरी कागदो पत्रीं तो सुलतानाचाच होता व प्रिन्स अलेक्झांडर हा त्या प्रांतावर सुलतानाचा गव्हरनर ह्मणून अम्मल चालवीत होता. तेव्हां सुलतानानें मदतीसाठीं सैन्य पाठवावें अशी इच्छा बलगेरियानें अबदुल हमीद याजपुढें प्रदर्शित केली. पण अबदुल हमीद मोठा वस्ताद सुलतान असल्यामुळें त्यानें तशी मदत पाठविण्याचें साफ नाकारलें. त्यानें असा विचार केला कीं तुर्की साम्राज्यांतून फटकून निघून स्वतंत्र झालेले हे दोन देश ह्मणजे सर्व्हिया व बलगेरिया हें आपसांत खुशाल लढोत आह्मांस त्याबद्दल सुख नाहीं व दुःखही नाहीं.

बलगेरिया तुर्की सामाज्यापासून फुटून निघाला व स्वतंत्र झाला याचें सर्वस्वी श्रेय रशियाला दिलें पाहिजे आणि या रशियाच्या उपकाराबद्दल बलगेरिया प्रजा रशियना संबंधानें कृतज्ञही होती. प्रत्येक बलेगेरियन गृहस्थाच्या घरांत रशियाचा झार अलक्झांडर याचा तसबीर

मराठी ग्रंथ संग्रहालय, नं. ता.

लटकाविलेली होती व त्या तसबिरीच्या खालीं 'बंध मुक्त करणारा' अशीं अक्षरेंही लिहिलीं होतीं. पण बल्गेरियाला अशा रितीनें स्वतंत्र करण्यांत रशियाचा गुप्त हेतू कांहीं निराळाच होता. बल्गेरियन फौजेंत बहुतेक सर्व अधिकारी रशियन होते आणि बल्गेरियन फौजेंत 'बल्गेरियन गृहस्थास क्याप्टनहून जास्त हुद्याची जागा मिळूं नये असा रशियानें निर्बंध घातला होता. रशियाची ही वर्तणूक पाहून बल्गेरियन लोकांत मोठी चळवळ उडाली. त्यांतील कांहीं लोक असें ह्मणूं लागले कीं रशिया किंवा इतर परकीय बलाढ्य राष्ट्रांच्या मदती वांचून बल्गेरियास आपलें स्वातंत्र्य कायम ठेवतां यावयाचें नाहीं. दुसऱ्या कित्येकांचें असें ह्मणणें पडे कीं आपण जर रशियाचें मांडलिक होऊन राहणार तर फायदा काय झाला? तुर्की अम्मल जाऊन रशियन आला एवढेंच. रशियांतही फिनलंड स्वातंत्रतेसाठीं धडपडत आहेच. मग आपला प्रांत दुसरा फिन्लंडच होणार कीं नाहीं? अशा प्रकारे प्रजेंत चळवळ उडाली असतां रशियानें बल्गेरियावर आपला ताबा राहण्यासाठीं प्रयत्न चालूच ठेविले होते. रशियाचें हें चमत्कारिक वर्तन इतर राष्ट्रांस मुळींच मान्य नव्हतें अर्थात रशिया जरी आंतून जळफळत होता तरी त्यास उघडपणें असें कांहींच करता येत नव्हतें. तरी पण त्यानें बल्गेरियावर सूड उगवावयाचा तो उगविलाच. सर्व्हियाला बल्गेरियाचा मोठेपणा सहन होत नाहीं ही गोष्ट रशियास पूर्णपणें माहीत होती इतकेंच नाहीं तर सर्व्हिया बल्गेरियावर टपकरच चाल

करून येणार अशीही बातमी त्यास लागली होती. तेव्हां या संधीचा फायदा घेऊन रशियानें आपले लष्करी अधिकारी एकदम परत बोलावले. बल्गेरियन प्रजा देशभक्त खरी पण लढण्याच्या कामीं जें एक प्रकारचें शिक्षण लागतें त्याचा पूर्ण आभाव असल्यामुळें बल्गेरियन सैन्यांत मोठी धास्ती उत्पन्न झाली होती इतक्यांत सर्व्हियानें खरोखरच बल्गेरियावर स्वारी केली. जिवावर बेतली ह्मणजे मनुष्य वाटेल तें धाडसाचें काम करण्यास उद्युक्त होतो. सर्व्हियानें अशा विकट प्रसंगीं स्वारी केलेली पाहून बल्गेरियन देशभक्त यत्किंचितही डगमगले नाही. त्यांनी सैन्याची योग्य प्रकारें शिस्त लाऊन सर्व्हियाच्या सैन्यास तोंड देण्याची उत्कृष्ट तयारी केली. दैवाचा चमत्कार ह्मणा अगर अप्रतिम देशभक्तीचा प्रसाद ह्मणा पण स्लिव्हनिटझा येथें बल्गेरियन सैन्यानें सर्व्हियन सैन्याचा मोड करून त्यास आपल्या सरहद्दीच्या पलीकडे पिटाळून लावलें. बल्गेरियन सैन्यास यावेळीं इतका चेव आला होता कीं उद्दाम अशा सर्व्हियन सैन्याची याहूनही जास्त राख रांगोळी उडवावी. कोणत्याही प्रकारें अपराध न करतां ज्या सैन्यानें आपल्यावर स्वारी केली त्याचा सत्यनाश करण्यास बल्गेरियन सैन्य तयार झालें. पण इतक्यांत आस्ट्रियाचा बादशहानें बल्गेरियास अशी तंबी दिली की जर तुह्मी सर्व्हियाची सरहद्द ओलांडून सर्व्हिया प्रांतांत शिराल तर या लढाईत आह्मी सर्व्हियातर्फे पडूं. बलाढ्य अशा आस्ट्रियाच्या या धमकावणीनें गरीब आणि कर्मी बलवान असे बल्गेरियन लोक नरम

पडले यांत नवल नाहीं. तरीपण बल्गेरियन लोकांनी यावेळीं आपल्या देशाचें जें उत्कृष्ट रितीनें संरक्षण केलें त्याबद्दल ते खरोखरचा स्तुतीस पात्र होत. यानंतर इंग्रजी वकीलाच्या मध्यस्थीनें बल्गेरियानें कांहीं विशेष केलें नाहीं व सुलतान हमीद यानेंही शांततेच्या मीषा खालीं त्या प्रांतात आपलें सैन्य पाठविलें नाहीं.

इ. स. १८८५ च्या सुमारास एक मोठें चमत्कारिक आणि जुन्या काळासच शोभेल असें कृत्य घडलें. बल्गेरियन लष्करी अमलदारांनीं प्रिन्स अलेक्झांडर याच्या जागीं रशियन राजपुत्र गादीवर बसविला जावा ह्मणून प्रिन्स अलेक्झांडर यांस पळवून नेलें. हा कट आगष्ट महिन्याच्या तिसऱ्या आठवड्यांत सिद्धीस गेला. प्रिन्स अलेक्झांडर यांस पळवून सरहद्दीवर नेण्यांत आलें. रशियानें या देशा संबंधानें जी राजकीय वर्तणूक दाखविली त्यावरून रशियन सरकार बल्गेरियन लोकांस गुलामा प्रमाणें वागवावें अशा मताचें होतें असेंदिसतें. या कटाबद्दल बल्गेरियन लोक बरेच खवळून गेले व त्यांनी आपल्या राजाची मागणी केली. या कामीं रशियन सरकारास उघड असें कांहींच करता येत नसल्यामुळें त्यास राजाला सोडून देणें भाग पडलें. पण, अशी सुटका होण्यापूर्वी ' मी गादीवर बसतांच स्वतःस पदच्यूत करून घेईन ' अशी कबुली करून घेण्यांत आली होती असें दिसतें; कारण सदर राजपुत्र गादीवर बसल्या नंतर लागलीच पदच्युत होऊन आपल्या देशीं निघून गेला. अशा रितीनें राजा एकाएकीं गेल्यामुळें राज्य कारभार तीन रीजंटच्या

[illegible] तरुण बल्गेरियाची परिस्थिति फार नाजूक झाली होती. [illegible] आपले लष्करी अम्मलदार परत बोलावले होते इतकेंच नाहीं तर त्या देशानें नाक हातीं धरून आपल्याकडे यावें ह्मणून रशिया जारांचे प्रयत्न करीत होता. यामुळें या देशांत जवळ जवळ अराजकताच सुरू झाली होती. याचवेळीं प्रधान आणि रीजंट यांच्यांत भांडणें लागलीं यामुळें तर राजकीय स्थिती अधिकच बिघडली.

या दोन तीन वर्षांत बल्गेरिया संबंधानें मोठी खळबळ उडून गेली होती व त्यामुळें अबदुल हमीद यांसही एक प्रकारची चिंता उत्पन्न झाली होती. रूमेलियाच्या गव्हरनरास लोकांनी हाकून लावलें होतें. चालू अव्यवस्था आणि राजपुत्राची उणीव या कारणानीं बर्लिन च्या तहावरून अबदुल हमीद यांस या प्रकरणीं लष्कर पाठवून हात घालण्यास चांगलीच सबब मिळाली होती पण त्यानें तसें केलें नाहीं ह्मणूनच युरोपांत शांतता नांदली असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

बल्गेरियामध्यें यावेळीं तीन पक्ष निर्माण झाले होते. स्टांबुलॉफ नांवाचे एक अत्यंत हुषार आणि मुत्सद्दी गृहस्थ तीन रीजंटांपैकीं एक होते. यांचें मत " बल्गेरिया देश बल्गेरिअन लोकां करतांच आहे इतरांनी त्यांत गडबड करूं नये " असें होतें. अर्थात या कामीं रशियानें मुळींच ढवळा ढवळ करूं नये. रॅडोस्लाफ नावांचे एक गृहस्थ मुख्य प्रधान होते यांचें मतही स्टांबुलॉफ प्रमाणेंच होतें तरी पण ते

त्यांस बराच विरोध आणीत असत. झ्यानकॉफ नांवाचे एक प्रमुख एक पुढारी होते. यास रशियाचा अम्मल बलगेरियावर असावा असें वाटत होतें. या पक्षांतील लोकांनी या पुढाऱ्यास कान्स्टांटिनोपल येथें पाठविलें होतें. हेतू हा कीं, सुलतानानें याकामीं लष्कर पाठवावें. ही गोष्ट अबदुल यांस बर्लिन तहानें सहज करता आली असती पण त्यानें तसें करण्याचें साफ नाकारलें. पण याहुनही रशियाचा नीचपणा ह्मटला ह्मणजे बलगेरियावर आपण दोघे मिळून स्वारी करूं असें त्यानें अबदुल हमीद यांस स्पष्ट कळविलें हा होय. ज्या रशियानें बलगेरियास तुर्की साम्राज्यांतून काढून स्वतंत्र केलें तोच रशिया आपला स्वार्थी हेतू साधत नाहीं ह्मणून आपल्या शत्रूस सामील होऊन आपणच स्वतंत्र केलेल्या देशास पुनः पारतंत्र्यांत लोटण्यास प्रवृत्त होतो हा अगम्य चमत्कार नव्हे काय ? मनुष्याला स्वार्थी बुद्धि कसें नाचवील हें सांगतां येणें कठीण आहे.

बलगेरियाच्या गादीवर कोणाला बसवावें याबद्दल मोठा लढा पडला होता. झ्यानकॉफ यानें स्पष्टपणें असें जाहिर केलें होतें कीं, ज्या लष्करी कटवाल्यांनीं प्रिन्स अलेक्झांडर यांस पळवून नेलें होतें त्यांस पुनः त्यांचे अधिकार द्यावेत. लष्करी प्रधान रशियन असावा आणि मिंग्रेलियाचा राजपुत्र बलगेरियाच्या गादीवर बसवावा. हा राजपुत्र रशियन प्रजा होता. झानकॉफ कान्स्टांटिनोपल येथून हात हालवील परन

आल्यावर त्याच्या पक्षानें बंडही केलें. पण त्यांस अधिकाऱ्यांनी कैद केलें व कित्येकांस फाशीही दिलें.

सुलतानानें तशा प्रकारें नम्राचा पाढा वाचल्यामुळें आणि झॉनकॉफ पक्षाचें बंड मोडल्यामुळें बलगेरियांत रशियाचें महत्व हळू हळू कमी होत चाललें होतें. आपल्या पक्षाचा राजपुत्र निवडला जात नाहीं हें पाहून रशियानें सर्व राष्ट्रांची एक परिषद बोलावली, रक्तपात न होतां या प्रकरणाचा शेवट लागावा असा रशियानें यावेळीं बहाणा केला होता. पण बलगेरियांत लोकमत प्रिन्स अलेक्झांडरबद्दल अनुकूल होतें. रशियानें या प्रकरणांत ढवळा ढवळ करूं नये या मताचा स्टांबुलॉफ हा होता. व त्यानें सर्व बलगेरिया देशांत हिंडून लोकमत आपल्या पक्षाचें तयार केलें होतें. ज्या ७०० बलगेरियन लष्करी कामगारांनी प्रिन्स अलेक्झांडर यांस पळवून नेलें होतें त्यापैकीं १०० लोकांस यांणीच बडतर्फ केलें.

युरोपांतील सर्व राष्ट्रांस शांतता पाहिजे होती अर्थात कांस्टांटिनोपल सर्व येथील परकीय वकिलांनीं या कामीं ढवळा ढवळ करावयाची नाहीं असेंच ठरविलें होतें. या मतास एक रशियन वकील मात्र अनुकूल नव्हता. सर्व वकिलांचें हें मत विशेष परिणामकारक होण्यास अबदुल हमीद यांचें ढवळा ढवळ न करण्याचें स्पष्ट मत व आस्त्रियाची विशेष हीं दोन कारणें झालीं होतीं.

वर सांगितलेल्या रशियाच्या दुष्ट खटपटी चालू असतां बल्गेरियांतील कांहीं शिष्ट व सुज्ञ मंडळी एखादा तरतरीत राजपुत्र शोधून काढण्यासाठीं मध्य यूरोपांत गेली होती. देनमार्क देशांतील प्रिन्सवॉल्डरमन याची त्यांनी भेट घेतली आणि कोबर्गचा राजपुत्र फर्डिनंड याच्याशीं बोलणें सुरू केलें. ' सर्व राष्ट्रांस व विशेषतः रशियास माझी निवड पसंत असेल तर मी राजा होण्यास तयार आहे ' असें या राजपुत्रानें वरील शिष्ट मंडळीस कळविलें. आस्त्रिया आणि रशिया यांच्यांत वैर असल्यामुळें या राजपुत्राची नेमणूक केल्यास रशिया सुलतानाच्या मदतीनें बल्गेरियावर खास स्वारी करील असें या लोकांस वाटलें. ' सोब्रांजी ' सभा बोलावण्यात आली आणि प्रिन्स फर्डिनंड यांची निवड करण्यांत आली. या राजपुत्राची निवड झाल्यामुळें पुनः नवी गडबड सुरू झाली. स्टॅाबुलाफ याणें कांहीं कारणानें राजीनामा दिला.

सोफिया येथील अबदुल हमीदच्या मुखत्यारांनी ही निवड योग्य प्रकारें झाली नाहीं अशी तक्रार पुढें आणली. रशियाचे हेर रशियन राजपुत्राची नेमणूक व्हावी म्हणून गुप्त तऱ्हेनें खटपट करीत होतेच. खुद्द रशियानें तर व्हर्ना येथें मारमार पाठवून बल्गेरियाला भिवविण्याचाही प्रयत्न केला. रशियन जनरल कौलबार याणें बल्गेरियांत रशियन सैन्यही आणलें. पण इतक्यांत रशियन सरकारानें या जनरलास व आपल्या वकिलास परत बोलावलें व लढाईची तयारीही दाखविली.

प्रिन्स फर्डिनंडची निवड ‘ सोब्रांजी ’ सभेच्या मेंबरांच्या सर्वानुमतें झाली होती तरी ती रशियास मान्य झाली नाहीं ! बर्लिन येथें झालेल्या तहान्वयें पहातां ही निवड त्या तहावर सह्या करणाऱ्या सर्व राष्ट्रांच्या अनुमतीन झालेली असली पाहिजे. या तहान्वयें फर्डिनंड याणें रशियासची व इतर राष्ट्रांची अनुमती विचारली. या विचारण्यानें एवढें दिसून आलें कीं रशिया शिवाय सर्व राष्ट्रांची या निवडणूकीस संम्मति आहे. अशी सम्मत्ति दिसून येतांच फार्डिनंडनें राजपद स्वीकारण्याचें कबूल केलें. पण या बद्दल रशियाची कुरकुर चालूच होती. ही निवड आमच्या सम्मती वाचून झाली असें सुलतानानेंही ध्वनित केलें पण त्याहून अधिक त्यानें कांहींच केलें नाहीं. नव्या निवडीवर नजर ठेवण्यासाठीं कमिशनर पाठविण्याची युक्ति रशियानें काढली व त्यास फ्रान्सनें पुष्टी दिली. अबदुल हमीदला परकीय कमिशनर येणें योग्य वाटलें नाहीं. जर्मनीनें आपला वकील परत बोलावला. फक्त इग्लंडच्या वकिलानें फार्डिनंडच्या निवडी बद्दल कुरकुर केली नाहीं. अशा गोंधळांतच फर्डिनंड गादीवर आरूढ झाला.

फर्डिनंडचा स्वभाव उमदा नव्हता व तो प्रजेला फारसा आवडताही झाला नाहीं पण तो स्टांबुलाफ यांच्या तंत्रानें वागत असल्यामुळें बल्गेरियन प्रजा फार्डिनंड संबंधानें विशेष नाराज झाली नाहीं. स्टांबुलाफ लोकांस फार प्रीय झाला होता. फार्डिनंडची राज्यकरण्याची पद्धत थोडी बादशाही थाटाची होती. आपणांस लोकांनी बादशहा प्रमाणें सन्मान द्यावा आपली तैनात उत्तम राखावी वगैरे पूर्व कालचे बादशाही

विचार त्याच्या डोक्यांत नेहमीं खेळत असत. हे विचार अर्थातच रय-तेस् आवडले नाहींत.

फर्डिनंड याणें ‘ सोब्रांजी ’ सभा ता. २४ आगष्ट रोजीं बंद केली तेव्हां पुनः नवी निवड सुरू झाली. रशियाची स्वार्थी बुद्धि त्यांस स्वस्थ बसूं देईना. बलगेरियांचा ‘ बंडखोरपणा ’ नाहिसा करण्यासाठीं रशियानें सुल्तानाचीही मदत मिळविण्याच्या प्रयत्न केला. यावेळीं रशियानें सुलतानाच्या मनांत असें भरवून दिलें की ‘ आपण दोघांनी दोन कमिशनर नेमूं व रशियानें सुचविलेल्या दोन राजपुत्रांपैकीं एकाची निवड करून घेऊं या. ’ ही व्यवस्था इतर राष्ट्रांस नापसंत झाली व या व्यवस्थेस बलगेरियन प्रजा तर मुळींच कबूल नव्हती. या व्यस्थेस सुलतानानें अनुमती देण्याचें साफ नाकारलेंच पण प्रिन्स फर्डिनंडनें बलगेरिया देशांतून निघून जावें या म्हणण्यासही तो कबूल होईना. या मुळें रशियाचा बेत फिसकटला.

बलगेरियाचे लोक कोणताही प्रसंग आला तरी डगमगत नाहींत हें पाहून या प्रकरणांत आपण पडावयाचें नाहीं असें सर्व राष्ट्रांनी ठरविलें होतें यामुळें रशियाला यापुढें कांहींच करता येईना. तरी पण सुलतानानें इतराजी दाखविण्यासाठीं बलगेरियांतून येणाऱ्या मालावर शेकडा ८ टक्के जकात बसविलीच. आस्त्रियाच्या सूचनेवरून प्रिन्स फर्डिनंड यांस सर्व राष्ट्रांनी बलगेरियाचा राजा कबूल केलें आणि बलगेरि-

याची ही धुसपुस कायमची नाहींशी करण्यांत आली. बेलग्रेड येथून एक रेल्वेचा फाटा तयार करण्यासाठीं कर्ज काढण्याची सूचना फर्डिनं यानें पुढें आणली. ' अशा प्रकारचें कर्ज सुलतानाच्या सम्मतीवाचून फर्डिनंड यांस काढतांच येत नाहीं ' अशी एक अडचण रशियानें पुढें आणली पण या रेल्वेनें आपला व्यापार वाढणार आहे असें पाहून सुलतानें ही संमत्ती लागलीच दिली. पुनः रशिया हतबुद्ध झाला.

इ. स. १८८१ ता. २७ मार्च रोजीं स्टांबुलाफ याचा गोळी घालून कोणीं खून केला या खुनांस रशियन हेरांचें अंग असावें असें प्रथम वाटत होतें पण स्टांबुलाफ याचा करडा अम्मलच त्याच्या नाशांस कारणीभूत झाला असें मागाहून स्पष्ट झालें.

मासिडोनिया प्रांतांत सुराज्य व्यवस्था व्हावी ह्मणून फर्डिनंडनें फार प्रयत्न केले पण ते सर्व व्यर्थ गेले. बलगेरियाच्या कामीं सुलतानानें जें वर्तन केलें तें युरोपस्थ खिस्ती राष्ट्रांच्या दृष्टीनें कदाचित् शहाणपणाचें असेल पण तुर्की माणसाच्या दृष्टीनें पहातां अबदुल हमीद यानें ज्या अर्थी राज्याची परिसीमा कमी करून घेतलेली होती त्या अ[illegible] तो अदूरदर्शी सुलतान होता यांत संशय नाहीं. बलगेरिया प्रांत पु[illegible] आपल्या साम्राज्यांत जोडण्याचे प्रसंग वारंवार प्राप्त झाले असतां त्या प्रसंगाचा त्यानें फायदा घेतला नाहीं यावरून तो टर्की साम्राज्याचा शत्रूच ठरतो. तुर्की साम्राज्यांतून जो जो भाग बाहेर पडला तो तो

सुधारणेच्या दृष्टीनें पावन झाला असें इंग्रजी इतिहासकार ह्मणोत पीहिजेत तर पण तुर्की दृष्टीनें अबदुल हमीद गुन्हेगारच ठरतो.

---

### भाग ७ वा.

## अबदुल हमीदची दिनचर्या.

तुर्कांचा बादशाही अमल गाजविणारा शेवटचा सुलतान अबदुल हमीद याची दिनचर्या कशी होती हें सांगितलें असतां त्याच्या एकंदर राजकीय वागणुकीवर बराच प्रकाश पडणार आहे ह्मणून आम्ही ती अगदीं थोडक्यांत देतों.

टर्कीची सर्व प्रकारची राजकीय सत्ता त्यानें आपल्या स्वतःकडे घेतली होती. पूर्वीच्या सुलतानाप्रमाणें तो प्रधानांवर कोणचीही गोष्ट निसंबांत नव्हता. त्याच्या वेळचे प्रधान सांगितलेल्या हुकुमाचे चाकर बनले होते. तसेंच त्यांचें इति कर्तव्य ह्मटलें ह्मणजे सुलतानानें फर्माविलेला हुकूम अक्षरशःअम्मलांत आणावयाचा. सदर हुकूम न्यायाच आहे कीं अन्यायी आहे हें पहाण्याचें त्यांचें काम नव्हतें ! अशी ही एकतंत्री राज्यपद्धत इ० स० १९०८ पर्यंत अव्याहत चालू होती.

अबदुल हमीद यिलझिद येथें राहात असे. सदरहू ठिकाण बास्फरस सामुद्रधुनीवर एका उंच जागीं आहे. या ठिकाणा सभोंवतीं उत्तम प्रकारची बाग आहे.

आपला वाडा व राहण्याची जागा उत्तम दिसावी ह्मणून त्यानें प्रजेच्या मालकीच्या कित्येक जागा किंमत न देतां उपटल्या होत्या व दोन ख्रिस्ती स्माशानेंही त्यानें अशींच ताब्यांत घेतलीं होतीं. यानें आपल्या वाड्याच्या सभोंवती उंच भिंत बांधली आहे यामुळें त्याचें ठिकाण एक प्रकारचा मजबूत किल्लाच झाला आहे. या वाड्याची जागा फार मोहक आहे. या ठिकाणाहून बास्फरस सामुद्रधुनीच्या दोन्ही बाजूचे देखावे दिसतात. याणे आपल्या मजबूत बांधलल्या भिंतीवर दुर्बिणी लावल्या आहेत यामुळें लांबीचा प्रदेश ही तेथून दिसूं शकतो. असें ह्मणतात कीं अबदुल हमीद एकाच जागीं दोन रात्रीं घालवीत नसे. अबदुलचें राहण्याचें हें ठिकाण अत्यंत मजबूत केलेलें असून त्याच्या आसपासची सर्व वस्ती उठवून लावण्यांत आली आहे. या राजवाड्या-संबंधानें गमतीच्या गोष्टी सांगतात. व्हॉन गोल्ट पाशा नांवाचा एक जर्मन मनुष्य लष्करी शिक्षण देण्यासाठीं ठेवण्यांत आला होता. हा गृहस्थ एके दिवशीं राजवाड्यापासून एक मैलावर असें शिक्षण देत असतांना त्यानें आपल्यापुढें राजवाड्याचा नकाशा ठेवला आणि त्यानें विद्यार्थ्यांस असा प्रश्न केला कीं मी राजवाडयावर कोठच्या बाजूनें मारा केला असतां परिणामकारक होईल ? या गोष्टीला कांहीं दिवस लोटल्यावर सदर शिक्षकास सुलतानानें मुद्दाम बोलावून ' आमच्या राजवाड्याचें नाव शिक्षण देतांना निघतां कामा नये ' असें बजावलें !

इ. स. १८९४ सालीं मोठा धरणीकंप झाला. त्यानंतर त्यानें या राजवाड्यांत अकरा खोल्या अशा तयार केल्या कीं त्यांस धरणीकंप किंवा आग यापासून भय राहणार नाहीं. या राजवाड्यांत त्यानें अतिशय बंदोबस्त ठेवला होता. त्यांस आगीचें फार भय वाटत असे आणि ह्मणून त्यानें या बाबतींत फार काळजी घेतली होती. इ. स. १८९८ सालीं त्यानें राजवाड्यासभोंवतीं आणखी एक भिंत बांधली व त्यावरही नाकेबंदी केली होती. या राजवाड्यांत त्यानें सर्व प्रकारच्या सोयी केल्या होत्या व वेळ पडल्यास त्या राजवाड्यांत बाहेरच्या मदतीशिवाय कित्येक दिवस राहतां येईल अशीही त्यानें व्यवस्था केली होती. या राजवाड्यांत एक लहानशी शेत जमीन, एक कृत्रिम सरोवर, तबेले, लोहारकामाचा कारखाने जनावरांची शाळा, वगैरे गोष्टीही होत्या. याच्या राण्या, झनाना, खिजमतगार वगैरे लोकांची एकंदर संख्या ६००० होती आणि त्यांची रखवाली करण्याकरतां ५०,००० लष्कर ठेवण्यांत आलें होतें ! हा राजवाडा ह्मटला तर वाडा होता नाहीं तर कैदखानाही होता. या राजवाड्याजवळच ‘ कोलक ’ ह्मणजे पोलीस ठाणे व तुरुंग हीं होतीं. या तुरुंगांत पुष्कळ लोकांस अत्यंत क्रूरतेनें वागविण्यांत येत होतें व या ठिकाणीं सुलतानानें नानातऱ्हेचीं दुष्ट कृत्यें व अनाचार केले असें ह्मणतात.

अबदुल हमीदची राहणी नियमित असे. तुर्कस्थानांतील मुसलमा-

नाप्रमाणें तो पहाटेस उठत असे. तो सकाळीं आठ वाजतां काम कर-ण्याच्या खोलींत जाऊन बसत असे व साखर न घातलेली कॉफी दर रोज सकाळीं पीत असे. यानंतर एक लांबलचक सिगारेट तो ओढीत असे. ही विडी त्यास काम संपेपर्यंत पुरत असे! त्याचा सकाळचा उपहार म्हटला ह्मणजे थोडीं अंडीं व दूध हाच होय. हा घेतल्यानंतर तो आपल्या हेराकडून आलेलें रिपोर्ट अगदीं प्रथम वाची. त्याचा पत्रव्यवहार मोठा असे. लष्करी मक्तेदार, अर्ज्या आणि व्यापारी जमाखर्च वगैरे गोष्टी त्यास पहाव्या लागत असत. याचा बहुतेक वेळ आपल्या राजवाड्याची मजबुती करण्यांतच जाई. आपल्या सभोंवार असलेल्या लोकांवर त्याचा मुळींच विश्वास नसल्यामुळें सर्व पत्रव्यवहार तो स्वतः करी. दिवस वर येत चालला ह्मणजे त्याचे चिटणीस व हेर त्यांस येऊन भेटत व गेल्या रात्रीं काय केलें तें सांगत असत. नंतर जे लोक भेटण्यास आले असतील त्यांची ता भेट घेई. त्याचा राजवाड्यांत कोणासही मज्जाव नव्हता. अशा भेटीच्या वेळीं त्याच्या जवळ एक खोजा नेहमी असें व याच्या पुढें अर्जांचे ढीग पडलेले असत. आपल्या बादशहाजवळ मागणी करणें हा रयतेचा हक्क आहे अशीं तुर्की लोकांची समजूत होती व या समजुतीविरुद्ध वागण्याचें धैर्य अबदुल हमीद यांस झालें नाही.

सुमारें १० वाजतां तो सकाळचें जेवण जेवीत असें. त्यांस पोट दुखीची व्यथा पुष्कळ वर्षें जडलेलीं होती व त्यामुळें तो जेवण घेतां

नेंच जेवी. तुर्की लोक पिण्याच्या पाण्या संबंधानें विशेष खबरदारी घेत असतात. सुलतान अबदुलहा तशीच खबरदारी घेत असे. सुलतान अबदुल्ला यांस एका मांत्रिक बाईनें असें सांगितलें होतें कीं तुझें मरण प्लेग अथवा पटकी यामुळें होण्याचा विशेष संभव आहे तेव्हां तें टाळण्यासाठीं तूं ' कियत हने ' येथील झऱ्याचें पाणी पीत जा' या सांगीप्रमाणें तो नेहमी हेंच पाणी पीत असे. 'कियत हने ' हें एक लहानसें खेडें असून तें गोल्डन हार्न या ठिकाणा जवळ आहे. अशा प्रकारच्या धर्मभोळ्या समजुतींवर ह्याचा फार विश्वास असें. भविष्य सांगणाऱ्या कुडमुड्या जोश्यांवर इतर तुर्कां प्रमाणें त्याचाही विश्वास होता.

सकाळचें जेवण झाल्यावर तो आपल्या प्रधानांस हुकूम सोडित असे. प्रधानांची व याची गाठ कधींही पडत नसे अथवा तो कधींही घेत नसे. त्याचें कर्तव्य हुकुमाचीं बजावणी करणें एवढेंच होऊन राहिलें होतें.

अबदुल हमी यांस बाल्यपणीं घोड्यावर बसण्याची हौस होती पण वृद्ध उत्तर वयांत तो आपल्या राजवाड्या सभोंवतीच सहल करीत असे. सहल करतानां त्याच्या बरोबर एक खोजा असे व हा खोजा सुलतानाचा रस्ता साफ ठेवीत असे म्हणजे ज्या रस्त्यानें सुलतान जाऊं इच्छित असे त्या रस्त्यावर तो कोणाही मनुष्यास येऊं देत नसे.

सुलतान यास एकलकोंडेपणा फार आवडे. या वेळांत तो सुताराचें काम करी. पिस्तुलानें नेम मारण्यांत तो फार पटाईत होता. पंचवीस पावलांवर ठेवलेल्या फळ्यावर तो पिस्तुलाच्या गोळीनें आपलें नांव खोदीत असे. त्याच्या तैनातींत असलेल्या एका शिपायानें नारिंगें वर फेकावींत व सुलतान तीं गोळांनें नेम मारून खालीं पाडी. त्यास वैद्यकाचाही नाद होता व या नादामुळेंच त्यानें कांस्टांटिनोपल येथें एक वैद्यकी शाळा सुरू केली होती. लहान खोदकाम करण्याची त्यास आवड होती. त्यानें एक लहानशी होडी तयार केली होती. ही होडी स्प्रिंगच्या योगानें चालत असे व त्यांत बसून तो आपला एखादा तास नेहमीं घालवीत असे.

सायंकाळीं ४ ते ६ वाजतां तो जेवीत असे. या वेळींही तो एकटाच असे व हें जेवणही पांचचार मिनिटांत आटोपे तयार केलेलें अन्न स्वयंपाक्याकडून प्रथम खपविण्याची पद्धत त्यानें स्वीकारली होती. हें जेवण झाल्यावर रात्रौ हेरांकडून आलेले रिपोर्ट तो वाचीत असे.

यिलझिद येथें एक लहानसें नाटकगृहही बांधण्यांत आलें होतें. येथें एक दोन कंपन्या नेहमीं खेळ करीत असत. सुलतान स्वतः आनंदानें कधीं टाळी वाजवीत नसल्यामुळें नाटकगृहातहीं भरावा तसा रंग भरत नसे.

अबदुल हमीद रंगेल नसल्यामुळें त्याचा झनानखाना बराच लहान होता. त्यास गृहसौख्य मुळीच लाधलें नाहीं.

मुसलमानी राजे निरनिराळे वेष घेऊन आपल्या प्रजेंत गुप्तपणानें संचार करीत असत, घोड्यावर बसणें ख्याली खुशाली करणें, नाच रंग तमाशे यांत दंग असणें वगैरे नैसर्गीक सुलतानी गुण अथवा अवगुण या सुलतानांत मुळींच नव्हते. त्यांस एकांतवासच फार प्रिय असे.

---

## भाग ८ वा.

# अबदुल हमीदचा परराष्ट्रांशीं स्नेह संबंध.

युरोपस्थ ख्रिस्ती राष्ट्रांच्या कैचींतून तुर्कीराष्ट्र किंबहुना कान्स्टां-टिनोपलचा भाग अजून पर्यंत कसा सुटून राहिला आहे याबद्दल तुर्की लोकांत एक गमतीचें उपरोधिक उदाहरण देण्यांत येतें. हें उदाहरण असें. एका बोकडाचें प्रेत एका धर्म शाळेंत अशा उंच ठिकाणीं टांगून ठेविलें आहे कीं त्या ठिकाणीं त्या ठिकाणच्या कुत्र्यास पोचतां येऊं नये असें जरी आहे तरी प्रत्येक कुत्रा त्याचा शक्य तितका तुकडा उडी मारून काढीतच आहे; कित्येक वेळां असे तुकडे त्यांस मिळतात हें खरें पण कोणालाही तें प्रेत खालीं ओढून घेतां येत नाहीं. शेवटीं ते आपसांत एकमेकांवर भूंकूं लागतात. टांगलेलें प्रेत ह्मणजे टर्की आणि कुत्रे ह्मणजे युरोपांतील राष्ट्रें हें सांगावयास नकोच ' टर्कीनें आपल्या सर्व

प्रजेबद्दल निदान ख्रिस्ती प्रजेबद्दल तरी न्याय पथानें वागलें पाहिजे आणि टर्कीला अशा तऱ्हेनें वागण्यास भाग पडणें असल्यास युरोपस्थ राष्ट्रांनी ऐक्यानें वागलें पाहिजे ' असें लार्ड क्यानिंग नेहमीं ह्मणत असत. याच मताचे मि. ग्लाडस्टन हेही होते व त्यांनीं या हेतूनेंच युरोपियन राष्ट्रांची एक परिषद तयार केली होती. लार्ड स्यालिसबरीही याच मार्गानें जाणारे होते इ. स. १८९० पासून प्रत्येक वर्षी हीं राष्ट्रें आणि टर्की यांच्यांत कांहींना कांहीं प्रश्नावरून खटका उडालेला आहे. हा हमरी तुमरी अबदुल हमीद पदच्युत होईपर्यंत सारखी चालू होती.

प्यारिसच्या तहान्वयें डार्डानेलिस सामुद्र धुनीवर टर्कीचा पूर्ण ताबा होता; आणि या सामुद्रधुनींतून सलामी देण्या पुरतेंच इतर राष्ट्रांस आपलें आरमार नेतां येत असे. पण व्यापारी आगबोटी जाण्यास प्रतिबंध नव्हता. इ. स. १८७१ तील लंडनच्या तहा नंतर रशियानें बऱ्याच सशस्त्र आगबोटी बांधल्या पण त्यावर व्यापारी निशाण फडकत असे. अशा आगबोटी पैकीं कोस्ट्रोमा नांवाच्या एका सशस्त्र आगबोटीस अबदुल हमीदनें इ. स. १८९१ सालीं बंदी केली. ' पूर्व वहिवाटीला अनुसरून मी वागत आहे ' अशी रशियानें तक्रार केली. शेवटीं दोघांच्याही सम्मतीनें असें ठरलें कीं, जेव्हां अशा प्रकारचें सशस्त्र व व्हालंटीयरनी भरलेलें जहाज न्यावयाचें असेल तेव्हां तशा प्रकारची सूचना रशियाकडून टर्कीस देण्यांत येईल. रशियानें पुढें आणलेली ही

सबब अगदीं लंगडी होती पण अबदुल हमीदनें प्रथम केलेली बंदी मागाहून सोडून दिलेली आहे यावरून अबदुल किती चंचल वृत्तीचा होता हें स्पष्ट समजतें.

इ. स. १८९४ ते ९७ या सालीं आरमेनियन लोकांची कत्तल उडविण्यांत आली. यावेळीं राजधानींत असणाऱ्या फ्रेंच रहिवाश्यांनीं या कत्तलीबद्दल बरीच ओरडा ओरड केली. कान्स्टांटिनोपलच्या बंदरांत असणाऱ्या फ्रेंच आगबोटींनी कित्येक लोकांस आश्रय दिला आणि सुलतानानें त्यांची मागणी केली असतांही त्यांस परत देण्याचें त्या आगबोटींनीं साफ नाकारलें. इस्मिद येथील फ्रेंचांच्या ताब्यांत असणाऱ्या देवळांत तुर्की लोक बळजोरीनें शिरले. या देवळावर तीन रंगाचें निशाण फडकत होतें. हें निशाण या तुर्की लोकांनीं फाडून टाकलें आणि तेथील जोगी लोकांस हाकलून देण्यांत आलें. या त्वेष उत्पन्न करणाऱ्या कृत्याबद्दल फ्रेंच वकिलानें तक्रार केली. फ्रेंच सरकारानें तर याबद्दल 'क्षमा मागितली पाहिजें' असें स्पष्ट सांगितलें. सुलतान कांहींच करीना, तेव्हां फ्रेंच आरमार बास्फरस येथून इस्मिद येथें जाऊन त्यांतील लष्करानें संगीनें पुढें करून देवळावरील निशाण पुनः उभारलें. या व इतर कारणांनी सुलतानांस अतीशय राग आला, फ्रेंच ख्रिस्ती मिशनऱ्यांनी तुर्की प्रांत बिटाकूल टाकला आहे तेव्हां त्यांचा समाचार अगोदर घेतला पाहिजे असेंही तो त्वेषानें बोलून गेला. पण योग्य वेळ येईपर्यंत त्यानें गम खाल्ली. इ. स. १९०१ सालीं त्यानें असा हुकूम

काढला कीं, फ्रेंच जातींचे रोमन क्याथोलिक लोक तुर्की प्रांतांत हुकुमावाचून येतां कामा नयेत. अशा प्रकारचो मजाव सुलतानास मुळींच करता येत नव्हता कारण अशाप्रकारचे लोक त्या प्रांतांत इ. स. १५३५ पासून येऊन राहिले होते. या हुकुमानें फ्रान्स देशांतील रोमन क्याथोलिक लोकांत फार चळवळ उडवून दिली. स्मर्ना येथील धक्के बांधण्यासाठीं एका फ्रेंच कंपनानें सुलतानास कांहीं पैसा कर्जाऊ दिला होता. या पैशाची फेड वेळवर झाली नव्हती. हें देणें बरोबर आहे असें तुर्की न्यायासनापुढें ठरलें होतें. सुलतानानें वर जो हेका दाखविला त्यामुळें फ्रान्स आणि टर्की यांच्यांत भांडण होण्याची वेळ येऊन ठेपली. यासंबंधानें कांहीं आठवडे बोला चाली चालू होती पण फ्रेंच सरकारानें कांहीं आरमारी जहाजें पाठवून मिटिलेन येथील जकातीच्या ठिकाणाचा ताबा घेतला. इतका प्रकार होतांच पैशाची फेड करतो असें सुलतानानें आश्वासन दिलें. पण फ्रान्सनें लढाऊ आरमार आणलें असत्यामुळें पूर्वीच्या एकंदर वादग्रस्त प्रश्नांचा निकाल याचवेळीं झाला पाहिजे असा आग्रह धरला. तुर्की साम्राज्यांत रोमन क्याथॉलिक लोकांस वस्ती करून राहातां येतें व त्यांस कोणताही कर द्यावा लागत नाहीं या प्रश्नाचाही विचार याचवेळीं करा अशी मागणी करण्यांत आली. ता. ९ नवंबर रोजीं सुलतानानें फ्रेंच सरकारच्या सर्व मागण्या मान्य केल्या; या उदाहरणावरून सुलतान आपलाच हेका चालविण्यासाठीं शेवटपर्यंत कसा प्रयत्न करीत असे आणि अगदीं नाइलाजच झाला

ह्मणजे निरुपायानें प्रजेच्या मागण्या कशा कबूल करीत असें हें स्पष्ट होतें.

आरमेनियन लोकां संबंधानें अबदुल हमीदनें जी वर्तणूक दाखविली त्यामुळें अमेरिकन, इंग्रज आणि फ्रेंच रहिवाशांनीं त्याच्याकडे बऱ्याच मागण्या केल्या. आरमेनियन प्रांतांत कत्तल झाली त्यावेळीं मुसलमान दंगेखोरांनीं, परकीय लोकांच्या मालमत्तेची धूळधाण करूं नका असा सरकारी स्पष्ट हुकूम असतांही, वाटेल तशी दंगल केली. ख्रिस्ती लोकांची घरें व दुकानें लुटण्यांत आलीं, आणि ही लूट करतांना ज्याला आपण लुटतों आहों तो ग्रीक, ज्यू अथवा आरमेनिअन आहे याची विचार पूसहीकेली नाहीं. लुटला जाणारा माणूस मुसलमान नसला ह्मणजे त्यांस खुशाल लुटावें हाच नियम त्यांनीं स्वीकारला होता. यामुळें पुष्कळ परकीय लोकांची मालमत्ता चोरली गेली अथवा नासधूस करण्यांत आली कांहीं आरमेनियन लोक अमेरिकेंत जाऊन अमेरिकन प्रजा झाले होते व नंतर टर्कीमध्यें येऊन राहिले होते. अशाप्रकारच्या लोकांची संख्या शेकड्यांनीं होती. कांहीं अरमेनियनांचे वडील, भाऊ बंद, फ्रान्स, इग्लंड व इतालींत राहणारे होते. हे आरमेनियन केवळ व्यापार करण्यासाठीं टर्कीच्या प्रांतांत येऊन राहिले होते व त्यांचा व्यापारही तेथें भरभराटीनें चालला होता; कांहीं लोक मुखत्यार ह्मणून काम करीत होते. तेव्हां अशा लोकांचीं घरें दारें

१०

व दुकानें लुटण्यांत आल्यामुळें त्या त्या राष्ट्रानें या लुटीबद्दल स्पष्टीकरण विचारलें व नुकसानी मागितली. या मागणीचा सुलतानानें स्पष्टपणें निषेध केला राज्यांत दंगा झाला असतां तुर्की प्रजेचेंही जर नुकसान झालें आहे तर परकीयांनीं आपल्या नुकसानींबद्दल ओरड करण्याचें कांहींच कारण नाहीं असें सुलतानाचें ह्मणणें पडलें. पण ही कत्तल सुलतानाच्या हुकुमावरून झालेली होती व त्यावर सुलतानाचे अधिकारी नजर ठेवीत होते ही गोष्ट सर्व राष्ट्रास अवगत होती. ह्मणून त्यांनीं नुकसानीची भरपाई होण्याबद्दल जोराचें मागणें केलें व ही नुकसानी शांतपणानें न मिळेल तर शस्त्रीचाही उपयोग केला जाईल असें त्यांनीं सुलतानांस बजावलें. या नुकसानीची भरपाई करण्याची एक अजब युक्ति एका सुपीक डोक्यांतून बाहेर पडली आणि ती सुलतानास कबूलही झाली. ती युक्ति अशी:सुलतानानें अमेरिकन प्रधान मि. ग्रिसकम यांस बोलावूं पाठविलें. तो आल्यावर सुलतानानें अमेरिकेंतील नामांकित जहाजें बांधणाऱ्या एका कंपनीस एक लढाऊ जहाज तयार करण्याचा त्यास हुकूम केला. जहाजाचा आकार वगैरे ठरल्यावर किंमतही ठरली. या किंमतींतच कत्तलींत अमेरिकन रहिवाशांचें जें नुकसान झालें असेल तें मिळवून एकंदर रकम जहाजाची किंमत ह्मणून देण्याचें ठरलें. ही रकम अमेरिकन प्रधानास चुकती करून देण्यांत आली. हीच युक्ति इंग्रजी प्रधानासही करण्यास सांगितली व इतालीच्या प्रधानानेंही असेंच केलें. येणेंप्रमाणें कत्तलीची नुकसानी भरून देण्यांत

आली मात्र हीं गोष्ट गुप्त ठेवण्याविषयीं त्यावेळीं ठरलें होते पण त्या वातमी कांहीं दिवसांनीं बाहेर फुटलीच हीं जहाजें ' गोल्डन हार्न ' बंदरांत ठेऊन दिलीं. या युक्तीनें टर्कीच्या आरमारांत तीन मजबूत जहाजांची भर पडली हा एक फायदा झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

अबदुल हमीद स्वतःचें राज्य हीकात असे. त्यांस प्रधानांच्या मताची किंमत मुळींच नव्हती हें मागें सांगितलेंच आहे. या वागण्यानें तो कधीं कधीं परराष्ट्रास बराच नावडता होई. टर्कीसारख्या बिन सुधारलेल्या देशांत कित्येक चाली रीती अशा पडून गेल्या होत्या कीं, त्या ऐकतांच सुधारलेल्या देशांत त्याबद्दल आश्चर्यच वाटेल. अशांपैकींच प्रत्येक परराष्ट्रीय वकिलांस आपलें स्वतंत्र पोष्ट आफिस ठेवण्याची परवानगी होती ही एक रीत होय. इ. स. १५३५ नंतर टर्कीच्या राज्याचा विशेष संबंध फ्रान्स वगैरे देशांशीं विशेष तऱ्हेनें येऊं लागला, अर्थात यामुळें त्या त्या देशाचा व्यापारही हळू हळू वृद्धिंगत होऊं लागला. तुर्कस्थानांतील परकीय व्यापारी आपापल्या देशाच्या वकिलाच्या संरक्षणाखालीं होते. खुद्द तुर्कस्थानांत सरकारी पोष्ट आफिसें मुळींच नव्हतीं परदेशस्थ व्यापाऱ्यांस बाह्य देशाचीं आणलीं पत्रें वकिलाच्या पिशवी बरोबरच मिळत असत. मोठमोठ्या राष्ट्रांनीं सोईसाठीं ह्मणून आपापल्या वकिलातीजवळच स्वतंत्र पोष्ट आफिसें सुरू केलीं होतीं. याशिवाय कांहीं बड्या राष्ट्रांनीं तुर्कस्थानच्या अंतः प्रदेशांतही पोष्ट आफिसें स्थापन केलीं होतीं. ही स्वतंत्र पोष्टाची व्यवस्था क्रीमियन लढाई नंतर

तुर्कस्थान सरकारानें आपल्या स्वाधीन करून घेतली होती परंतु ती व्यवस्था चांगली न राहिल्यानें पुनः पूर्ववत् व्यवस्था सुरू ठेवण्यांत आली. अबदुल हमीदला आपली हेरांची व्यवस्था विस्तृत करून कोणती प्रजा असंतुष्ट आहे हें अजमावून पहावयाचें होतें. ह्मणून इ स. १९०१ सालीं परराष्ट्रीय स्वतंत्र पोष्ट हाफिसांची व्यवस्था त्यानें एकदम बंद पाडली. परराष्ट्रीय पत्रव्यवहार कांस्टांटिनोपल येथें येतांच तो आपल्या ताब्यांत घेण्याचा हुकूम त्यानें मे महिन्यांत सोडला. तुर्कस्थान देशांतून परराष्ट्रीय व्यापाराचा जो पत्रव्यवहार राजधानीमध्यें आला होता तो तर सुलतानाच्या हुकमानें पूर्वीच फोडून पाहाण्यांत आला होताच पण आठवड्यांतून तीन वेळा येणारा प्यारिस, लंडन वगैरे परकीय देशांतील पत्रव्यवहार एकदम जप्त करण्याचा हुकूम सोडण्यांत आला. हा पत्रव्यहार ब्रिटिश व फ्रेंच पोष्ट मास्तरांच्या नावानें सीलबंद होता पण तो सर्व तुर्की पोष्ट हाफिसांत नेण्यांत आला, तेथें फोडण्यांत आला आणि त्यापैकीं तुर्की प्रजेस लिहिलेला सर्व पत्रव्यवहार सरकारानें आपल्या ताब्यांत घेतला. बाकी राहिलेला परकीय पत्रव्यवहार ते ते पोष्ट मास्तर आपल्या ताब्यांत घेईनात कारण त्यांस त्यांच्या वकिलांची तशाप्रकारची सांगी होती. या व्यवस्थेनें एकच गोंधळ उडाला व या गोंधळाचा परिणाम इतका चमत्कारिक झाला कीं, वळीं अबदुल हमीदनें आपला तो हुकूम एका आठवड्यांतच परत

नं.
ता.
ठाणे.

घेतला. ही गोष्ट अबदुल हमीदच्या चंचल वृत्तीचें आणखी एक उदा-हरण होय.

रयतेच्या जमिनी आपल्या नांवावर चढवून घेण्याच्या हावेनें अब-दुल हमीद असाच एकेवेळीं घोटाळ्यांत आला होता व या हावेमुळें तो ब्रिटिश व इतर वकिलांस अप्रिय झाला होता.

इ. स. १८८२ तें ९० सालांच्या दरम्यान या सुलतानानें शेकडों प्रजेच्या जमिनी खालसा करून त्या आपली खाजगी मिळकत म्हणून सरकारी दप्तरांत नोंदविल्या होत्या. हा जमिनी गट्ट करण्याचा प्रयत्न प्रथमतःमुसलमानी प्रजेबद्दलच करण्यांत आला. असें करण्याचा हेतू एवढाच कीं, या दरोड्याची ओरड परदेशीं जाऊं नये. ज्या ज्या वेळीं अबदुल हमीदच्या हेरांस असें कळून येई कीं. कांहीं जमिनींचे मालकी हक्काचे कागदपत्र गहाळ झाले आहेत त्या त्या वेळीं सदर जमिनी सर-क्याशियन किंवा नोमाद लोकांच्या स्वाधीन त्या जमिनी केल्या जात. या लोकांस सुलतानांचीं कुळें म्हणून ठेवण्यांत येत असत आणि त्यांच्या नांवावर सरकारी दप्तरांत त्या जमिनी चढविल्या जात. आसपासच्या जमिनीचे मालक या संबंधानें पुष्कळ ओरड करीत व कित्येक वेळां दर हे कागदपत्र आगीमध्यें जळून गेले असेंही सिद्ध करून देण्यास ते तयार असत पण त्यांची दाद कोणीच घेत नसत. नव्या कुळा विरुद्ध अशा प्रकारचा ओरड करण्यास तुम्हांस मुळींच हक्क नाहीं असें अबदु-

लचे हेर त्या लोकांस सांगत असत. पुढें पुढें अबदुलचे हे हेर अधीक धीट झाले व त्यांनीं परकीय लोकांच्या जमिनींही खालसा करण्याचा सपाटा सुरू केला. इ. स. १८९० सालीं तर या तक्रारी इतक्या झाल्या कीं अशी तक्रार नाहीं अशी एकही परकीय वकिलात उरली नाहीं. प्रत्येक वकिलातींत या तक्रारी आहेतच अशी परिस्थिति प्राप्त झाली. नुसत्या जमिनींच खालसा करून सुलतानाची तृप्ती झाली नाहीं तर त्या जमिनीवरील इमलेही त्यानें गट्ट करण्याचा प्रयत्न चालू ठेवला. अशा प्रकारच्या गोष्टीसंबंधानें सर्व वकिलातींतीं खूप तक्रारी केल्या. पण तुर्की कायद्यांतच एक मेख अशीहोतीः इ.स. १८६९ च्या कायद्यानें असें ठरविलें होतें कीं या सालापासून परकीय लोकांस तुर्कस्थानांत जमिनी विकत घेण्यास परवानगी देण्यांत येत आहे पण त्यास अशी एक अट आहे कीं, त्या जमिनी त्यांनी तुर्की प्रजेच्या मालकीच्या आहेत अशी कबुली दिली. पाहिजे या अटीमुळें परकीय लोकांस तुर्की न्यायास-नापुढें कांहीच तक्रार करण्यास जागा नव्हती. हीं न्यायासनें वरून हुकूम येई त्याप्रमाणें न्याय देत. तेव्हां परकीय लोकांस वकिलातीकडे दाद मागण्यावाचून दुसरा उपाय नव्हता. परकीय वकिलांनी यासंबं-धानें तक्रारी केल्यामुळें ही पद्धत बंद पडलीच पण शिवाय दरबारां-तील प्रधानांनी अशी तक्रार केली कीं, या जमिनी सुलतानाच्या झाल्या-मुळें त्यांच्यावरील सरकारी कर माफ होतो व त्यामुळें उत्पन्न कमी होतें तेव्हां हा अन्याय दूर झाला पाहिजे. प्रधानांनींच अशी तक्रार

केल्यामुळें प्रजाजनांत असंतुष्टता वाढूं नये ह्मणून सुलतानानें ही पद्धत बंद केली. या पद्धतीनें अबदुल हमीद बराच गबर झाला पण तितक्याच प्रमाणानें तो रयतेस अप्रिय झाला.

---

## भाग ९ वा.

# ईजिप्त प्रकरण.

ईजिप्त संबंधानें अबदुल हमीदनें कसें वर्तन ठेविलें होतें हें या भागांत थोडक्यांत दिलें आहे. तुर्कस्थानच्या गादीवर वारसा सांगण्याच्या पद्धतींत फेरबदल करणें, ग्रेट ब्रिटन विरुद्ध प्यानइस्लामिझम या संस्थेस उत्तेजन देणें आणि येणें करून ईजिप्तांत परकीयांचें व विशेषतः इंग्लंडचें वाढलेलें प्रस्थ कमी करणें हें या भागांत वर्णन केलें आहे. इस्माइल खेदीवाच्या राज्यकारभाराचा इंग्लंड व फ्रान्स यांणी नायनाट केला. अबदुल हमीदचीं प्यानइस्लामिझम संस्थे मार्फत जीं गुप्त कारस्थानें चालू होतीं तीं रसातळांस गेलीं. इंग्रजी फौजेबरोबर अबदुल हमीदनें तुर्की फौजही ईजिप्तमध्यें न पाठविल्यामुळें इंग्रजांनी इजिप्तचा ताबा घेतला ही गोष्ट सरळ अशीच झाली. इजिप्त मधून इंग्लंडनें आपली फौज काढून घेण्याबद्दल अबदुल हमीदनें वेळों वेळीं जे डावपेच लढविले आणि बुल्फ तहा प्रमाणें न वागण्यांत अब-

तुर्क हमीदनें जो आग्रह धरला त्यामुळें अबदुल हमीदवरील इंग्लंडचा विश्वास अजिबात उडाला. सदरहू तह अबदुल हमीदच्या मुखत्यारांनी मान्य केला होता अर्थातच त्यासही तो मान्य असलाच पाहिजे इजिप्तच्या सरहद्दी जवळ येण्याचा त्याचा प्रयत्न तर व्यर्थ गेलाच पण त्याच्या या प्रयत्नांनी इंग्लंडनें आपले पाय मात्र इजिप्तमध्यें कायमचे रोवले !

इजिप्तच्या बादशाहीपणास अबदुल हमीद फार किंमत देत असे. आपल्या मुकुटांत हें एक अमूल्य रत्न आहे असें तो समजत असे. अबदुल हमीद ईजिप्तला विशेष मान देत होता याचें कारण ' मी खलीफ आहे ' असें त्यांस ह्मणवून घ्यावयाचें होतें. अशा प्रकारची महत्त्वाकांक्षा त्याच्या पूर्वज्यांस नव्हती.

अबदुल हमीद सुलतान झाला त्यावेळीं इस्मायल हा ईजिप्तचा खेदीव होता. इस्मायलनें अबदुल हमीदच्या कारकीर्दीतच खेदीवाच्या गादीचा मुसलमानी धर्माप्रमाणें वारसा न चालतां युरोपियन पद्धतीनें चालवत असें ठरवून घेतलें होतें. ही नवी वहिवाट सुरू करण्यासाठीं त्यानें तुर्कांच्या सुलतानास व इतर सरदारांस खूप पैसा चारला होता. या बदलेल्या पद्धतींत अबदुल हमीद कांहीं ढवळा ढवळ करील हें शक्यच नव्हतें कारण त्यांसही मुलगे होतेच. वरील हुकूम सुटल्या नंतर ईजिप्त सुलतानाच्या बादशाही अमलाखाली गेलें होतें. इस्मायल हा खरा पूर्वात्य खेदीव होता. आपणांस वाटेल तितका पैसा पुरवठा करण्यासाठींच

आपल्या दिवाणांचा आपण उपयोग करून घेतला पाहिजे असें त्याचें ठाम मत झालें होतें, तसेंच तो मिळेल तितका पैसा चैनींत खर्च करीत होता. त्याच्या झनाना फार मोठा होता व त्या प्रीत्यर्थ खर्चही बेसुमार होत असे. इजिप्तला बरेंच कर्ज झालें होतें. हे कर्जरोखे बहुत्येक इंग्लंड व फ्रान्स या देशांत घेतले गेले होतें. शेतकऱ्यावर बेसुमार कर लादण्यांत आले होते पण त्यांची दाद कोण घेणार ? पूर्वी चांगले असलेले रस्ते रिपेर नाहीं म्हणून खराब झाले होते. योग्य वेतन न देतां जुलमानें मजुरांकडून मजूरी घेण्यांत येत होती, आणि बहुत्येक प्रजेवर जुलूम झाला होता. आपण दिलेला कर्जाऊ पैसा परत कसा मिळेल या विवंचनेंत इंग्लंड व फ्रान्स या देशांतील सावकार पडले होते. नवे कर बसविण्याचा हक्क इ. स. १८५९ सालीं खेदिवानें सोडून दिला होता पण वारसाच्या नव्या पद्धती प्रमाणे ईजिप्तचा खेदीव आतां पूर्ण स्वतंत्र झाला होता. त्यानें जहाजें बांधूं नये, परकायाशीं तह करूं नयेत आणि नाणीं पाडूं नयेत एवढ्याच गोष्टींत ते सुलतानास बांधलेला होता. इस्मायलनें गुलामांच्या व्यापारास उत्तेजन दिलें पण हा व्यापार हाणून पाडण्यासाठीं युरोपस्थ ख्रिस्ती राष्ट्रांच्या सल्यानें सरस्याम्युएलबेकर यास मध्य आफ्रिकेंत पाठविण्यांत आलें होतें. हे गृहस्थ इ. स. १८८३ त परत आले; यांच्या जागीं खारटूम येथें विजय पावलेले गॉर्डन यांस पाठविण्यांत आलें. ईजिप्तमध्यें राज्यकारभारासंबंधानें जो खर्च होतो त्यावर दाब ठेवण्यासाठीं इंग्लंड व फ्रान्स या देशांनी आपल्या तर्फे

योग्य अधिकारी नेमले होते व त्या राज्यांत सुधारणा व्हाव्यात म्हणून बराच प्रयत्नही चालू होता. या सुधारणांपैकीं महत्वाची सुधारणा म्हणजे राज्यांत मिश्र न्यायासनें स्थापन करणें हीं होय. ज्यावेळीं ईजिप्त प्रजा आणि परकीय लोक यांच्यांत तंटा लागेल असता तो या न्यायासनानें तोडावा हा या न्यायासनांचा उपयोग होता. अशा प्रकारची न्यायासनें ता. १ जानेवारी १८७६ मध्यें सुरू करण्यांत आलीं होती. इ. स. १८७२ सालीं इंग्लंडचे प्रधान मि. डिझरायली यांणी एक फार फायद्याची गोष्ट केली. सुएझ ही पूर्वी संयोगीभूमी होती ती या प्रधानांनी सामुद्रधुनी केली, ती करण्याकरतां जें एकंदर कर्ज काढण्यांत आलें त्यांपैकीं ईजिप्तच्या खेदिवानें बरेंच दिलें होतें पण इस्मायल यांस नेहमीं पैशाची गरज लागे तेव्हां त्यानें हे कर्ज रोखे विकावयास काढले. व ते प्रधान मि. डिझरायली यांणी इंग्रज सरकारातर्फे विकत घेतले. ही गोष्ट ता. १ नवंबर १८७५ त घडली. या विक्रीमुळें ब्रिटिश भागीदारांचें बहुमत झालें. इ. स. १८७८ च्या सपटेंबर महिन्यांत सरवुइलसन यांस पैसा खर्च करण्यासंबंधाचे दिवाण नेमण्यांत आले आणि कांहीं आठवड्यांनीं एम. ब्लिग्नायर्स यांस पब्लिकवर्क्स खात्याचे प्रधान नेमण्यांत आले. या दोघां दिवाणांची खेदिवाबरोबर खर्चा संबंधानें नेहमीं खडाजंगी उडे. खर्चवेंच कसा करावा या संबंधानें एक कमिशन नेमण्यांत आलें. सुएझकालवा ज्यांनी बांधला ते एम लेसेप या कमिशनचे अध्यक्ष होते व सर वुइलसन उपाध्यक्ष होते. सरकारी

कर्जखात्याचे चार कमिशनर यांच्याबरोबर चवकशी करीत होते. खर्चावर दाब ठेवणारे दोघे इंग्रज गृहस्थ यांस या कमिशन मधून मुद्दाम दूर ठेवण्यांत आलें होतें. या कमिशनचा रिपोर्ट लार्ड क्रोमर यांणी तयार केला होता. हे गृहस्थ इ. स. १८७७ सालीं सरकारी कर्जाबद्दलचे कमिशनर होते आणि इ. स. १८७९ सालीं कंट्रोलर जनरल झाले.

या कमिशनचें काम उत्तम रितीनें करण्यांत आलें. इजिप्तचें उत्पन्न व खर्च या संबंधानें या कमिशननें चांगला विचार केलेला आहे. इजिप्त सरकारचे जे सावकार होते त्यांची तडजोड कशी करावी हें या कमिशननें उत्तम रितीनें ठरविलेलें होतें. पण हें कर्ज इसमायल यांच्या गैरशिस्तखर्चा मुळें झालेलें होतें. तेव्हां खरा ऋणको खेदीवच होय. यानें खेदिवाची खाजगी मिळकत गहाण टाकूनही उधळपट्टी केलेली होती. यामुळें त्याचा खर्च नियमित करणें जरूरीचें होतें. या कमिशनचा रिपोर्ट ता. ८ एप्रील १८७९ रोजीं प्रसिद्ध झाला पण आदल्या दिवशींच खेदिवानें युरोपियन दिवाणांस बडतर्फ केलें ! या बडतर्फीमुळें युरोपस्थ राष्ट्रांस पुनः पेच घेऊन पडला. या बडतर्फीचा अर्थ असा कीं आपल्या खर्चांत काट कसर करण्याची खेदिवाची इच्छा नव्हती. मे महिन्यांत युरोपियन दिवाणाची पुनः नेमणूक करा अशी इंग्लंड व फ्रान्स याणीं खेदिवाकडे मागणी केली. कमिशनरांनी राजीनामे दिले व ते मंजूर करण्यांत आले. सर्वांस धुडकावून लावण्याचा प्रयत्न खेदिवानें प्रथम केला; त्यानें सैन्य वाढविलें पण या सैन्यावर आप-

णांस विश्वास ठेवतां कामा नये असें त्यांस वाटूं लागलें. लोकमत त्याच्या अगदीं विरुद्ध होतें. हीं परकीय यूरोपस्थ राष्ट्रें आपसांत भांडत बसतील असें त्यांस वाटत होतें. पण मिश्रन्यायासनानें ज्या अर्थी खेदीव यांसच कर्जा बद्दल जबाबदार धरलें आहे त्या अर्थी त्याची फेड खेदिव कडूनच झाली पाहिजे असा सणसणीत खर्डा जर्मनीच्या कौन्सिल जनरलनें खेदिवास लिहिल्यामुळें आपला प्रयत्न व्यर्थ असें खेदिवास वाटूं लागलें. जर्मनीचें कर्ज फारसें नव्हते तेव्हां त्या लहानशा कर्जासाठीं प्रिन्स बिस्मार्कनें ही जी उठाठेव केली त्यावरून इजिप्त मध्यें इग्लंड व फ्रान्स या देशांबरोबर आपणांसही फायदा व्हावा असा यांत जर्मनीचा कावा असावा असें दिसून आल्यामुळें या कर्जा संबधानें पुनः कांहीं कटकट माजते कीं काय अशी भीति उत्पन्न झाली. तें कसें ही असलें तरी या दोन राष्ट्रांनीं ( इग्लंड व फ्रान्स ) असें ठरविलें कीं, इस्मायल यांणें पदच्युत झालें पाहिजे. आणि यां कामीं आणखी कोणी अडथळा आणूं नये ह्मणून या पदच्यूती संबंधानें या राष्ट्रांनीं यत्किंचित् ही दिरंगाई केली नाहीं. ता. १८ जून रोजीं सर फ्रांक लास केलेस यांणी लार्ड सालिसबरीं यांच्या सांगण्यावरून खेदिवास असा खलिता पाठविला कीं, ' फ्रेंच आणि ब्रिटिश सरकार सरकारी तऱ्हेनें आपणास असें कळवितात कीं खेदीव साहेबांनी पदच्युत व्हावें आणि इजिप्त सोडून बाह्य प्रदेशीं जावें.' या खलित्यांत आणखी असेंही नमूद केलें होतें कीं, आह्मी आपणांस जो उपदेश करीत आहोत तो आपण एकाल

तर युरोपियन पद्धती प्रमाणें वारसा होण्याबद्दलचा आपला हक्क अमलांत आणून आपल्या जागीं आपले चिरंजीव तोफिक यांस खेदर्दी करण्यांत येईल; शिवाय आपणांस पेन्शनही देण्यांत येईल. ( हें पेन्शन दर वर्षास ४० हजार पौंड होतें. ) पण आमचा हा उपदेश आपणांस कबूल नसेल तर व आपण आपखुशीनें पदच्युत होण्यास तयार न झालात तर दोन्ही देशांच्या प्रधान मंडळांस सुलतानाकडे जाणें भाग पडेल आणि असें झालें तर आपणांस पेन्शन मिळेलच किंवा आपला मुलगा खेदीव होईलच याबद्दल आम्हांस खात्री देतां येत नाहीं. प्रधान मंडळांच्या खलित्यास खेदिवानें उत्तर देण्यासाठीं कांहीं वेळ मागून घेतला व या बाबतींत मी सुलतानास अभिप्राय विचारला आहे असेंही त्यानें प्रधान मंडळास कळविलें. सुलतानाचा अभिप्राय मिळविण्यासाठीं ज्या मुखत्यारास खेदिवानानें सुलतानाकडे पाठविलें होतें त्या मुखत्याराबरोबर त्यानें सुलतानास असें कळविलें होतें कीं प्रधान मंडळाचा हा प्रयत्न सुलतानाचा बादशाही अम्मल झुगारून देण्यासाठीं आहे. अशा प्रकारें दरबारांत गडबड उडाली होती आणि इजिप्त देशांत तर असेंही ध्वनित करण्यांत येत होतें कीं पाश्चिमात्य पद्धतीचा हुकूम रद्द होऊन हालीम यांस खेदीव करण्यांत येईल. खरोखर पाहूं गेल्यास टर्कीच्या सुलतानास गुंडाळून ठेऊन युरोपस्थ ख्रिस्ती राष्ट्रें ईजिप्तच्या खेदिवास पदच्युत करूं शकतील हें अबदुल हमीदच्या स्वप्नींही नव्हतें. हालीमला गादी मिळावी असें जरी अब-

दुःख वाटत होतें तरी इस्मायलानें जी नवी वारसाची पद्धत सुरू केली होती ती नाहिशी व्हावी अशी अब्दुल यांची इच्छा नव्हती; इतकेंच नव्हे तर तीच नवी पद्धत तुर्की बादशाहीसही लागू करावी अशी त्याची फार इच्छा होती. इस्मायलला पदच्युत करण्या बद्दल त्याची नाखुषी नव्हती पण तसें करण्याबद्दल इंग्लंड व फ्रान्स मला विचारतील कारण मी इजिप्तचा बादशाहा आहे असें त्यांस वाटत होतें. पण तसें कांहींच घडून आलें नाहीं.

पदच्युत होण्याबद्दलचें पत्र ता. १९ जूनचें होतें व विचार करण्यास फक्त दोन दिवस मुदत देण्यांत आली होती. ईजिप्त चालू असलेल्या या घडामोडी तुर्कस्थानांत मुळींच कळल्या नव्हता. फ्रान्स व इंग्लंड यांणी ४८ तासाची नोटिस दिली आहे हें जेव्हां अब्दुल हमीद यांस कळलें तेव्हां तो बराच बावरून गेला. ईजिप्त ह्मणजे आपल्या राज्यांतील एक सोन्याचा तुकडा आहे व आपल्या मुकुटांतील एक दैदीप्यमान हिरा आहे असें अदुल यांस वाटत होतें. तेव्हां असा बहुमोल प्रांत आपल्या ताब्यांतून गेला तर राज्याचें नुकसान होईलच पण प्रजेच्या मनांतूनही आपण उतरूं अशी त्यास भीति पडली. युरोपांतील खिस्ती राष्ट्रांनीं आपल्या अनुमती शिवाय इजिप्तच्या खेदिवास पदच्युत करणें अत्यंत मानहानीकारक आहे असें त्यांस वाटलें. यावेळीं त्यांस जितकें दुःख झालें तितकें पूर्वी कधींही झालें नव्हतें त्यानें आपल्या सर्व प्रधानांस एकदम एकत्र बोलावलें. अशा प्रकारची

उल्थापाल बादशहाच्या अनुमतीशिवाय घडणें मुळींच इष्ट नाहीं असें सर्वांनीं ठरविलें. या संबंधानें मध्यरात्रींपर्यंत वादविवाद चालू होता. बर्लिन येथील परिषदेंत ज्यानें टर्कीचा मुखत्यार ह्मणून काम केलें होतें तो अलेक्झांडर क्याराथि ओडोटि नवाचा प्रधान फार बुद्धिवान होता. सर्व प्रधानांनी आपलें मत दिल्यावर या प्रधानास मत विचारण्यांत आलें. त्यानें सुलतानास असें स्पष्ट सांगितलें कीं यावेळीं धाडसाचें काम केलें पाहिजे. पण अबदुल हा नेहमी चंचल वृत्तीचा असल्यामुळें 'कांहीं दिवस लांबणीवर टाका' अशी कुरकुर करीत होता. अलेक्झांडरचें असें स्पष्ट मत होतें कीं इस्मायल यांस एकदम पदच्युत करून त्याच्या जागीं तोफिक यांस नेमावें. असें केलें असतां इजिप्त वरील टर्कीचा हक्क शाबीत केल्या सारखें होईल आणि इस्मायलला पदच्युत केल्याचें श्रेय इग्लंड व फ्रान्स यांस मिळणार नाहीं. याकामीं दिरंगाई केली तर इजिप्त प्रांत हातचा गमावून बसावें लागेल. ही सूचना मोठ्या धाडसाची होती व त्यासंबंधानें वादविवादही जोराचा झाला. यावेळी अलेक्झांडरनें सुलतानास असेंही बजावलें कीं थोडी दिरंगाई झाल्यास तुमची अनुमती मिळो किंवा न मिळो खेदिवास दुर्दैव खात्रीनें पदच्युत केलें जाईल याची खात्री बाळगा. यावेळीं अलेक्झांडर ह्मणतात त्याप्रमाणें धाडसच केलें पाहिजे असें ठरवून ता. २४ जूनच्या पहाटेस अलेक्झांडर पूर्ण मुखत्यारी घेऊन इलाझिद येथून तार आफिसाकडे निघाला. तो पेरा येथें आला व त्यानें तीन ठिकाणीं तीन तारा केल्या.

पहिली तार इस्मायल यांस होती. सुलतानाच्या तर्फे त्यास असें कळ-विण्यांत आलें होतें कीं, सुलतान साहेबांस तुमची उधळपट्टी समजून आली आणि सुलतानाशीं तुह्मी तुमचें कर्तव्य केलें नाहीं हेंहीं समजून आलें ह्मणून आह्मी असा फर्मान काढतो कीं तुह्मांस आह्मी पदच्युत केलें आहे. दुसरी तार तौफिक यांस करण्यात आली. यांत ‘ तुह्मांस तुमच्या वडिलांच्या जागीं खेदीव नेमलें आहे व वडिलांचे दुर्गुण तुह्मी चालू ठेवणार नाहीं अशी आशा आहे ’ असें लिहिलें होतें. तिसरी तार प्यारिस येथील तुर्की वकिलास करण्यांत आली होती. या तारेंत वरील दोन तारांचा मतलब लिहिला होता. या युक्तीनें इंग्लंड व फ्रान्स यांचे बेत जरी अवदुल्लनें ढासळून पाडले नाहींत तरी इजिप्त वरील बादशाही हक्क टर्कीच्या सुलतानाचा आहे या प्रजेच्या समजुतीस त्यानें दुजोरा आणला आणि त्याची बभ्र प्रजाजनांत झाली नाहीं.

इस्मायलनें इजिप्त सोडलें व ४० हजार पौंडाचें वार्षिक पेन्शन घेऊन तो आपल्या जनानखान्यासह नेपल्स येथें जाऊन राहिला. मुलास गादी देणें आणि पेन्शन या शिवाय त्याचें कोणतेंही ह्मणणें मान्य करण्यांत आलें नाहीं. तरी पण त्याचे खाजगी राजवाडे त्यास देण्यांत आले. हे वाडे सरकारी पैशानेंच बांधले होते पण ज्या [illegible] तो खाजगी ह्मणत होता त्या अर्थीं ते त्यास देण्यांत आले. हे वाडे त्यानें मागाहून विकून टाकले.

कैरो शहर सोडण्यापूर्वी इस्मायल याणें झानानखान्यांतील रणयांचे सर्व जड जवाहिर एकत्र केलें व शहरांतील जवाहिरवाल्याकडून जवाहीर तेवढें निराळें काढून घेतलें आणि तें जवाहीर एका टुवाकांत गुंडाळून तो इतालीकडे निघून गेला.

ता. २४ जून १८७९ रोजीं तैफिक हा इजिप्तचा खेदीव झाला. इस्मायल यास पदच्युत करून त्याच्या मुलास गादी देण्यांत आपण राजकीय विजय मिळविला अशा अबदुल खुशींत गाजरें खात होता. पण खुद्द कान्स्टांटिपाल येथे सरदारांत असा पक्का समज होऊन राहिला होता कीं, जर कोणाचा विजय झाला असेल तर तो इंग्लंड व फ्रान्स यांचाच होय. पाश्चिमात्य राष्ट्रांचे बेत अबदुल हमीद यांस पूर्वीच कसे कळले नाहींत याबद्दल पुष्कळांस आश्चर्य वाटत होतें. या राष्ट्रांनी जी चपळाई दाखविली ती खरोखरच अत्यंत महत्वाची होती. अशा प्रकारची चपळाई न दाखवितां त्यांनी इजिप्तचा बादशहा अबदुल हमीद याच्याशीं बोलणें चालू ठेवलें असतें तर हा पत्रव्यवहार बरेच दिवस चालू राहता कारण पत्र व्यवहार करीत राहणें हें तुर्की प्रधानांच्या अंगवळणी पडलेलें होतें. शिवाय या कामीं दिरंगाई झाली असती तर सुलतानातर्फे जर्मनीनेंही एखादें नवें खेंगटें काढलें असतें. इग्लंड व फ्रान्स यांनी आपला बेत झटक्या सरसा अमलांत आणला म्हणून त्यांत फारशा अडचणीही

उत्पन्न झाल्या नाहींत किंवा कोणी तिऱ्हाइत मध्यस्थीही करावयास आलानाहीं. या दोन्ही राष्ट्रांनीं सुलतानास कस्पटाप्रमाणें वागविलें होतें, आपणांस या दोन्हीं राष्ट्रांनीं अत्यंत तिरस्करणीय रितीनें वागविलें हें अबदुल हमीद जाणून होता आणि त्या वेळीं ईजिप्तमध्यें राज्यकारभाराची पद्धत सुरू करण्यां संबंधानें या दोन राष्ट्रांत तंटा लागला त्यावेळीं याचा त्यानें इंग्लंडवर सूड उगवूनही घेतला.

खेदीव इस्मायल हा १८७९ च्या जूनमध्यें पदच्युत झाला व तेथून दोन वर्षे पर्यंत इंग्लंड व फ्रान्स या देशांतील राज्यपद्धतीसंबंधानें ऐक्यानें वागलें. पुढें पण या दोघांत कांहीं कारणांवरून मतभेद उत्पन्न झाला, व त्यामुळें दोघेही भिन्न मार्गानें वागूं लागले. इ. स. १८८० सालीं पगार मिळाला नाहीं ह्मणून लष्करीं शिपायांनीं बंड केलें. या वेळीं या दोन्ही राष्ट्रांनीं एक दिलानें खेदिवास उत्तम प्रकारचा सल्ला दिला; यामुळें हें बंड न वाढतां लवकरच शमलें. लष्करी अमलदारांची एक कमेटी स्थापन झाली. या कमेटींत अहमद अरबी आणि महमुद हे मुख्य होते. या कमेटीचा विशेष कटाक्ष तुर्की व परकीय कामगाराविरुद्ध होता. इ. स. १८८१ च्या आगस्ट महिन्यांत अहमद अरबी याणें आपल्या अनुचरांच्या मदतीनें कैरो येथील खेदावाच्या राजवाड्यास गराडा दिला आणि पगार वाढविण्याची मागणी केली. इ. स. १८८२ च्या फेब्रुवारी महिन्यांत खेदिवास अशी राज्य पद्धत सुरू करण्यास त्यांनीं भाग पाडलें कीं, ज्या पद्धतींत महमुद हा

मुख्य अधिकारी असून अहमद अरबी हा लष्करी दिवाण असावा. या गडबडीबद्दल परकीय राष्ट्रांस मध्यस्थी करण्याबद्दल पाचारण करण्यांत आलें व त्यांनी आपली परिषद कॉन्स्टांटिनोपल येथें बोलावली या परिषदेंत असें सांगण्यांत आलें की, खेदिवास पदच्युत करून आरबीस ठार मारण्याचा कट झाला होता. पण इंग्रजी वकील लार्ड क्रोमर यांणीं असा कट झालाच नाहीं असें सांगितल्यामुळें ही कटांची गोष्ट तशीच राहिली. सिरक्याशियन जातीचे सुमारे ४९ लोक कैद करण्यांत आले. अलेक्झांड्रिया आणि केरो येथें फार मोठे दंगे झाले अलेक्झांड्रिया हें शहर तटबंदी आहे आणि या तटबंदीच्याविरुद्ध व ईजिप्त देशातील जुलमी राज्यपद्धती विरुद्ध आणि विशेषतः आरबी विरुद्ध फ्रान्स आणि इंग्लंड यांणीं विशेष प्रकारची तक्रार केली. या दोन्हीं देशांतून आरमाराच्या एकेक तुकडी इ. स. १८८२ सालांत या ठिकाणीं आली आरबानें राजीनामा देण्याचें साफ नाकारल्यावरून इंग्लंड व फ्रान्स यांणीं अशी नोटिस पाठविली की खेदाव यांचा अम्मल कायम करण्यासाठीं सर्व प्रधानांनीं आपले शिक्के मोर्तब परत पाठवावे. मे महिन्याच्या शेवटच्या तारखेस सर्व प्रधानांनी शिक्के मोर्तब परत केले. यामुळें अलेक्झांडर येथें मोठी गडबड उडाली. अरबीचे अनुचर असलेल्या आरबांनी या ठिकाणीं मोठा दंगा केला. या शहरांतील युरोपियन या दंग्याच्या भीतीनें शहर सोडून निघून गेले. सुमारें ९००० इजिप्त शिपायांस ठार मारण्यांत आलें असें ह्मणतात. दंगेखोरांनी युरोपियन

लोकांवरही हल्ला केला होता. ता. ११ जून १८८२ रोजीं फार मोठा दंगा झाला. ता. १० जुलै रोजीं अलेक्झांड्रा येथील तटबंदी आरमारी कामदार सेमूर यांणी जमीन दोस्त केली. खेदिवानें आरबीस बंडखोर ठरविलें आणि या दंग्यास उत्तर ह्मणून त्यानें जेहाद किंवा धर्म-युद्ध पुकारलें.

फ्रान्सनें आपलें आरमार इजिप्त मधून ता. ३० जुलै रोजीं परत नेलें, तेव्हां इजिप्तमध्यें शांतता करण्याचें काम एकट्या इंग्लंडवर येऊन पडलें. ता. १३ सपटेंबर १८८२ रोजीं सर वेल्स्ली हा ११,००० पायदळ, २०० घोडेस्वार आणि ४० तोफां यासह तेल-एल-कबीर येथें लढाई लढला. ता. १४ रोजीं विजयी इंग्रज सेना केरो शहरांत शिरली. बंडखोराचा पुन्हां बीमोड झाला आणि ता. २५ रोजीं खुद्द खेदीव मोठ्या समारंभानें राजधानींत आला.

यावेळीं इंग्लंडनें एकट्यानेंच लढाई लढल्यामुळें इजिप्त देशावर आतां पर्यंत दोघांची ( इंग्लंड व फ्रान्स ) राज्यसत्ता चालू होती ती नष्ट झाली आणि आतां फक्त इंग्लंडचीच राज्यकारभार चालू झाला व ही द्विमुखी राज्यसत्ता ता. ११ जानेवारी १८८३ झालीं बंद करण्यांत आली असें फ्रान्सला जाहीर नोटिशीनें कळविण्यांत आलें.

अबदुल हमीदचे हेर इजिप्त मधील इत्थंभूत हकीकत अबदुल हमीद यांस कळवीत होते आणि इंग्लंड व फ्रान्स यांच्यांत

आपसांत तंटा लागला आहे हें जेव्हां त्यांस समजलें तेव्हां त्यानें आपला आनंद स्पष्टपणें दाखविला. अबदुल हमीद नेहमी एक गोष्ट सांगत असे. त्याचें तात्पर्य असें होतें कीं जोपर्यंत काफीर लोक ( ख्रिस्ती राष्ट्रें ) आपसांत तंटे बखेडे करीत आहेत तोंपर्यंत टर्कीला भय नाहीं. फ्रान्स आणि इंग्लंड यांच्यांतील बेबनाव हें अशाच प्रकारचें उदाहरण होय. हा बेबनाव अबदुलच्या हेरांनीं बनवून आणला असेल असें ह्मणतात, आणि यामुळेंच अबदुल आपल्या हेरांवर नेहमी खूष असे.

ईजिप्तची भविष्यवत् राज्यव्यवस्था सुव्यवस्थित होण्यासाठीं तो देश कांहीं कालपर्यंत इंग्रजी अमलाखालीं राहिला पाहिजे असें इंग्रज सरकारनें ठरविलें हा ताबा केवळ जुजबीच असला पाहिजे ही गोष्ट लार्ड स्यालिसबरी व मि. ग्लाडस्टन यांसही मान्य होती. या प्रत्येकानें आपलें मत असें दिलें आहे कीं हा ताबा कायमचा न होईल असेंच वर्तन ग्रेटब्रिटननें ठेविलें पाहिजे. ईजिप्तचा हा तत्कालीन प्रश्न एके बाजूस ठेविला तरी या दोन्ही मुत्सद्यांनीं व विशेषत: मि. ग्लाडस्टन यांणीं टर्की स्वतंत्र असला पाहिजे या पूर्वपरंपरागत समजूतीस चांगला पाठिंबा दिला होता. वर सांगितलेला जुजबी ताबा घेतांना टर्कीच्या सुलतानाची अनुमती घेतली पाहिजे यामतापासून मि. ग्लाडन व परकीय चिटणास लार्ड ग्रेन्व्हिल हे परावृत्त झाले नाहींत. फ्रेंच सरकार जरी यावेळीं इंग्रज सरकाराबरोबर असतें तरीही ' तुमचा बादशाही अम्मल

दाखविण्यासाठीं तुमची थोडीशी फौज आमच्या फौजेबरोबर पाठवा' अशी विनंति ब्रिटिश मुत्सद्यांनी अब्दुल हमीद यांस केलीच असती. टर्कीच्या सुलतानाच्या नांवानेंच आह्मी हा तावा घेतला आहे असें इंग्रज मुत्सद्दी त्यावेळीं ह्मणत होते टर्कीच्या सुलतानाचा बादशाही हक्क हिरावून घेतला नाहीं ही गोष्ट स्पष्ट व्हावी ह्मणून तुर्की सुलतानांस फौज पाठविण्याविषयीं विशेष आग्रह करण्यांत आला होता.

ईजिप्त संबंधानें इंग्लंड आणि फ्रान्स यांच्यांत बराच तेढ उत्पन्न झाला होती. इंग्लंडच्या फौजे बरोबरच फ्रान्सनेंही आपली फौज पाठवावी अशी त्यांस विनंति करण्यांत आली होती. ईजिप्त मधील फ्रेंच अधिकाऱ्यांस ईजिप्त देश दोघांनी मिळून ताब्यांत घ्यावा असें वाटत होतें. पण अलेक्झांड्रा येथें इंग्लडनें दाखविलेलें वर्तन आणि तेल-एल-कबीर येथें स्वतंत्र लढाई लढणें यावरून फ्रान्स आपलें सैन्य आणो वा न आणो ईजिप्त आपल्या ताब्यांत घ्यावयाचें असें इंग्रजी धोरण दिसत होतें. पण यामताविरुद्ध इजिप्त व विशेषतः केरो येथें असलेल्या फ्रेंच रहिवाशांचें मत होतें. फ्रान्सनें आपलें आरमार परत नेल्यावर या फ्रेंच रहिवाश्यांत भांडाभांड सुरू झाली. दोन्हीं राष्ट्रांनी एक मतानें ईजिप्तचा तावा घ्यावा याविरुद्ध फ्रान्स मधील प्रसिद्ध मुत्सद्दी एम. ग्यांबाटा यांस तारेनें कळविण्यांत आलें. या तारेंत आणखी असेंहो ध्वनित केलें होतें कीं तावा घेण्याचें मुळीं कारणच नाहीं आणि फ्रान्सच्या अनुमतीवांचून तसा तावा घेण्याचा इंग्लंडचो छातीही नाहीं

इजिप्तमध्यें राहणारा त्या वेळचा एक प्रसिद्ध फ्रेंच गृहस्थ ह्मणतो की ह्या दवळादवळीचा परिणाम त्या वेळच्या सरकारी खलित्यांवर फार चमत्कारिक झाला. इंग्लंड बरोबर फ्रान्स इजिप्तचा ताबा घेण्यास तयार नाहीं हें ऐकून आरबीचे अनुचर जे आरबी दंगेखोर त्यांस फार आनंद झाला. असाच अत्यानंद अबदुल हमीद यांसही झाला. तुमचें सहचारित्व इंग्लंड मागेल असें अबदुल हमीद यांस आगाऊच कळविण्यांत आलें होतें. पण यामुळें अबदुल चमत्कारिक परिस्थितींत येऊन पडला होता. हा सहचारीपणा कबूल केल्यास साम्राज्याचा महत्वाचा भाग जो इजिप्त त्यामध्यें हात घालण्यास इंग्रजांस हक्क होता असें आपण होऊन कबूल करणें होय. बरें सहचारित्व न घ्यावें तरीही पंचाइत कारण इंग्लंड स्वतःच तो ताबा स्वतंत्रपणें घेईल याबद्दल त्यांस शंका नव्हता सुलतानानें सहचारित्व देण्याचें नाकारावें अशी फ्रान्सची इच्छा आहे असें अबदुल हमीद यांस समजलें होतें. पण याच्याच बरोबर त्यास अशीही खात्री होती की फ्रान्सच्या मदतीवाचूनही इंग्लंड इजिप्तचा तावा घेऊं शकेल तेव्हां सहचारित्व मागितल्यास त्यास सम्मत्ती देण्याचें लांबणीवर टाकणें हाच एक मार्ग आहे असें अबदुल हमीद यांस वाटलें.

राजधानीच्या ठिकाणीं फार महत्वाची घडामोड चालू होती. अबदुल हमीद आणि इंग्रज सरकार यांच्यातील बोलणें चालणें लार्ड डफ्रिन यांच्या मार्फत चालू होतें. हे गृहस्थ तुर्की लोकांचे चाहते होते इतकेंच नाहीं तर खुद्द सुलतानाबद्दलही त्यास सहानुभूति होती. लार्ड डफ्रिन

पॅरिश नातोचे होते व ऐलंड व इंग्लंड यांच्यांत विशेष सख्य नव्हतें; तसेंच मुख्य प्रधान ओझरावली यांच्याशींही यांची मैत्री होती हें सर्व प्रसिद्ध होतें. लंडन संधीने बाबतींत इतर राष्ट्रांच्या वकिलांनी नकार दिला तरीं इंग्लंडचा वकील सुलतानांस आपली अनुमती देत असे. सुलतानानें एके वेळीं असा हुकूम काढला कीं कोणाही परकीयानें सुशोभित करण्यासाठीं तुर्की निशाणाशिवाय इतर निशाणांचा उपयोग करूं नये. हा हुकूम इतरांस मानवला नाहीं पण इंग्लंडच्या वकिलास मानवला. टर्कीच्या सुलतानाचें मन दुखावेल अशी कोणचीही गोष्ट इंग्लंडनें केलेली नव्हती. असें जरी होतें तरी या प्रकरणांत कसें वर्तन करावें याबद्दल अबदुलचा ठाम विचार होईना. त्यास एवढें मात्र खास वाटे कीं आपलें सैन्य नसेल तर इंग्लंड एकटेंच ईजिप्तमध्यें जाऊं शकणार नाहीं.

सरतेशेवटीं इंग्रज सरकाराकडून अबदुल हमीद यांस ईजिप्तमध्यें सैन्यासह येण्याविषयीं आमंत्रण देण्यांत आलें. या वेळीं तुमच्या सैन्याची संख्या इतकी असावी कीं त्यावरून इंग्लंडनें सुलतानाच्या बादशाही हक्कास चांगला मान दिला असाच प्रजेचा ग्रह झाला पाहिजे असें या आमंत्रणांत नमूद केलें होतें.

सुलतानाचा स्वभाव व त्याचे मार्ग लार्ड डफरिन यांस आतां चांगलें समजून चुकले होते. टर्कीच्या साम्राज्यांत पूर्वीप्रमाणें प्रधानांच्या

मराठी ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ठाणे

साह्यानें राज्य कारभार चालत नसून अबदुल्हमीदच्या एकट्या स्वाप तंत्रानें तो चालत आहे असें यावेळीं लॉर्ड डफरिन यांस स्पष्टपणें दिसून आलें. वर नमूद केलेली आमंत्रण पत्रिका दिल्यानंतर आपणास ' सकाळीं या, दुपारी या, उद्या या ' अशा चाळवण्या दाखविण्यांत येतील ही गोष्ट लार्ड डफरिन यांस पूर्वीच कळून चुकली होती. ह्मणून त्यांनीं यावेळीं निराळाच मार्ग शोधून काढला. लार्ड डफरिन हे आपल्या पत्नीसह आठवड्याच्या शेवटच्या दिवशीं प्रिन्सेस आयलंड नांवाच्या बेटांत जात असत. याच बेटांत बेकर पाशा नांवाचे एक प्रधान राहत असत. हे अबदुल हमीदच्या राजवाड्यांत दररोज जात व सायंकाळीं या बेटांत परत येत. इंग्रजसरकार सुताल्नाशीं अत्यंत स्नेह भावानें वागतात ही गोष्ट बेकरपाशा यांस चांगल्या तऱ्हेनें माहीत होती. अर्थात् ईजिप्त प्रकरणांत इंग्रज सरकाराशीं सहकारित्वानें वागण्याविषयीं त्यानें अबदुल हमीद व त्याचे इतर प्रधान यांस वारंवार सल्ला दिला होता. इंग्रजांच्या मागणीस सुलतान मान देईल असें बेकर यांस प्रथम वाटत होतें पण दिवस गत झाल्यामुळें आणि हमीद कांहींच करीत नाहीं हें पाहून बेकरचा विश्वास पुढें पुढें शिथिल होत चालला सुलतान व त्याच्याच मताचे इतर प्रधान यांस पक्केपणीं वाटत होतें कीं, आपल्या सहकारित्वा शिवाय इंग्रज ईजिप्तचा ताबा घेऊं शकणार नाहींत. तसेंच आपण

असें सहकारित्व देत नाहीं असें सांगितल्यास मि. ग्लाड्स्टन व त्यांचा पक्ष यांची फजीती उडेल व विरुद्धपक्ष आपणास मिळेल. पण हमीदच्या या कल्पना पूर्णपणें निर्मूळ होत्या; या कल्पना संबंधानें बेकर यानें एकेवेळीं हमीद सुलतान यांस असें सांगितलें की, ज्यां अर्थी इंग्लंडनें ताबा घेण्याचें ठरविलें आहे त्या अर्थीं आतां फ्रान्सनें अनुमती न दिली किंवा तुह्मी आपलें सैन्य त्यांच्या सैन्याबरोबर न पाठविलें तरी इग्लंड तो ताबा खास्रीनें घेईल यांत शंका नाहीं. इग्लंडचे प्रधान पुढें टाकलेलें पाऊल कधींच मागें घेणार नाहींत. बेकर मि. ग्लाड्स्टन पक्षाभिमानी आहे अशी त्याची हेटाळणी करण्यांत येत असे. पण खरोखर पहातां तो त्या पक्षाविरुद्ध होता व त्यानें सुलतानास जो उपदेश केला होता तो केवळ टर्कीच्या हिताचा ह्मणूनच केला होता.

ताबा घेण्याची वेळ जसजशी जवळ येत चालली तसतसें बेकर इलडिस येथील राजवाड्यांत जास्त वेळ राहूं लागला. या कामीं टर्की फार मोठी चूक करीत आहे असें त्यानें कित्येक वेळा स्पष्ट बोलून दाखविलें. एक आठवडा अशा रितीनें गेल्यावर अगदीं शेवटीं सुलतानानें लार्ड डफिन यांस बोलावूं पाठविलें. लार्डसाहेब आल्यावर ' आपण या प्रकरणीं नवी तडजोड काढूं या ' असें सुलतानानें त्यास विचारलें. मला तडजोडी संबंधानें बोलण्याचा अधिकार नाहीं असें लार्ड डफिन यांनी सांगितलें. ज्या दिवशीं सुलतानानें लार्डसाहेबांस बालावणें पाठ-

घेतलें होतें त्याच दिवशीं इंग्रज इजिप्तचा ताबा घेणार होते. त्या दिवशीं सायंकाळीं खाना येथें घ्या असेंही सुलतानानें सांगितलें पण लार्ड डफ्रिन यास इजिप्तची बातमी पाहिजे होती. तेव्हां ते तडक परत गेले. तेथें त्यांस इजिप्त ताब्यांत घेतल्याचें तारेनें समजलें. ताबा घेतल्याची बातमी अबदुल हमीद यास समजतांच तो रागानें काळा झाला. बेकर पाशानें आपणांस जें सांगितलें तेंच शेवटीं खरें झालें.

दुसऱ्या दिवशीं बेकरपाशा कॉन्स्टांटिनोपल येथून निघून गेला. यापुढें सुलतानाची नोकरी करावयाची नाहीं असा त्यानें निश्चय केला. जो पर्यंत अबदुल हमीद टर्कीचा सुलतान आहे तोपर्यंत त्या राज्यांत सुधारणा ह्मणून कधींच व्हावयाची नाहीं असें त्यानें स्पष्ट बोलून दाखविलें.

बेकरपाशा राजधानी सोडून गेला हें ऐकतांच सुलतानास विशेषच संताप चढला त्याच्यावर जोराच्या टीकेचा भडीमार करा अशा बद्दल वर्तमान पत्रकारांस ईशारा देण्यांत आला. बेकरपाशा देशद्रोही आहे असा जिकडेतिकडे गवगवा करण्यांत आला. खरोखर पाहतां इंग्रज सरकाराशीं सहकारित्वानें वागून इजिप्त वरील आपला बादशाही हक्क कायम ठेवा असा उपदेश त्यानें वडोघडीं केला होता. पण सुलतानानें तो ऐकला नाहीं त्यांस बेकरपाशा काय करणार ? बेकर तुर्कस्थानांतून पळाला तो इजिप्तमध्यें गेला. त्यांस तेथील

खेदिवानें सन्मानपूर्वक वागविलें. थास लवकरच नव्या तयार केलेल्या फौजेचे मुख्य अधिकारी नेमण्यांत आलें पण या देशांत त्याची कार- कीर्द त्यास सुखावह झाली नाहीं. महादीच्या पक्षपाती सैन्यानें हिक्स पाशा याची सर्व फौज नाहिशी केली होती. बेकरपाशाचीही नवी फौजही त्याच महादीच्या फौजेवर पाठविण्यांत आली होती. पण हें नवें सैन्य चांगलें लढणारें नव्हतें व सौडन प्रांतांत लढणाऱ्या आरबाशीं त्यास टिकाव धरता येईना. या सैन्याचाही पराभव झाला. या पराभवा- मुळें तो आत्महत्याही करण्यास तयार झाला होता ह्मणतात. या नंतर तो लवकरच मृत्यू पावला.

या नंतर सुलतानाचा ईजिप्तशीं संबंध मुळींच नव्हता पण तो येथील खेदिवाशीं गुप्त मसलती करी व ईजिप्त देशांतील असंतुष्ट प्रधानाशीं गुप्त संबंध ठेवी. या गोष्टी करण्यांत त्याचा हेतू इंग्रजी अम्म- लास खो घाला हाच होता. याच सुमारास पार्लमेंटांतील दोन्ही पक्षांनीं व बाहेरच्या मुत्सद्यांनीं इंग्लंडनें ईजिप्त सोडावें असें ध्वनित केलें होतें ईजिप्तमध्यें एतद्देशीय राज्यकारभार असावा असें या पुढाऱ्यांस अतः- करणपूर्वक वाटत होतें. लार्ड डफ्रिन यांनी तर स्वराज्याची एक योजना तयार केली होती पण बुद्धिवान परकीय लोक एकदा ताबा घेतल्यानंतर इंग्लंडला ईजिप्त सोडतांच यावयाचें नाहीं असें ह्मणत होते. कान्स्टांटिनोपल तेथील अमेरिकन वकील ईजिप्तमध्यें एकदा जाऊन आला तेव्हां त्यानें असें स्पष्ट ह्मटलें होतें कीं, इंग्लंडची

१५८९८

पुष्कळ इच्छा असली तरी एकदा ताबा घेतल्यावर तो देश इंग्लंडला सोडतांच यावयाचा नाहीं.

अशी जरी वस्तुस्थिति होती तरी अबदुल हमीदच्या इच्छेला अनुसरून नव्हे तर इंग्लंडच्या पुढाऱ्यांनीं विशेष चळवळ केल्यामुळें इंग्लन्डनें अबदुल हमीदला हाताशीं धरून ईजिप्त किती मुदत पर्यंत इंग्लिश साम्राज्यांत राहील हें ठरवून घेतलें. या व्यवस्थेला **वुल्फ कन्व्हेनशन** असें ह्मणतात.

मि. ग्लाडस्टनच्या पक्ष निवडणुकींत हरल्यानंतर कान्सरव्हेटीव पक्ष अधिकारारूढ झाला. लार्ड स्यालिसबरी हे त्या पक्षाचे पुढारी होते. त्यांनींच ही कन्व्हेनशनची कामगिरी हातीं घेतली. इंग्रजी फौजेबरोबर सुलतानी अम्मल दिसावा ह्मणून सुलतानी फौजही ईजिप्तमधा घेताना असवी या मताचे हे गृहस्थ होते व याबेळींही त्यांनींच पुढाकार घेतला होता. या ईजिप्त प्रकरणासंबंधानें शेवटचा निकाल लावण्यासाठीं आन. सर. वुल्फ यांस स्पेशल वकील ह्मणून टर्कीच्या दरबारीं ता. ५ आगष्ट १८८५ रोजीं पाठविण्यांत आले. हे गृहस्थ फार चांगले होते व योग्य माणसाचीच नेमणूक झाली होती असें सर्वांचें मुखी झालें होतें. या प्रकरणांत जी जी गोष्ट घडून येत होती त्यावर अबदुल हमीदची बारीक नजर होती. या संबधानें तुर्की प्रधानांनीं ज्या सूचना केल्या होत्या त्या कशा निरुपयोगी आहेत हें शान

सर वुल्फ यांणी स्पष्ट करून दाखविलें होतें. दोन्ही राष्ट्रांनीं हरविल्या नंतर सातें वर्षांनीं इंग्रजी फौज ईजिप्त मधून काढून घेण्यांत यावी असें या कन्व्हेन्शनमध्यें नमुद केलें होतें. या करारांत आणखी असेंही लिहिलें होतें कीं, या मुदती नंतर या देशांत पुन: परकीय सैन्याची जरूरी पडल्यास त्या वेळीं सुलतानानें इंग्रजी फौजेसच अग्राधिकार दिला पाहिजे. अशा प्रकारची ही व्यवस्था टर्कीच्या अत्यंत हिताची होती व ही अमलांत आल्यास खऱ्या मुत्सद्यास तुर्की राजकारणाचा विजय झाला असें वाटलें असतें. यावेळीं इग्लंड व फ्रान्स या मधील मित्रत्व नष्ट झालेलें होतें; अर्थात तुर्की दरबारांतील फ्रेंच वकिलांनी ' हा करार नापसंत आहे ' असाच सल्ला सुलतानास दिला. रशियन वकीलही याच मताचा होता. अशा प्रकारचा विरोध असतांही हा करार कबूल करण्यांत आला व त्यावर योग्य अधिकाऱ्यांच्या सह्याही झाल्या. कान्स्टांटिनोपल मधील बऱ्याच लोकांस ईजिप्त मधील इंग्रजांचें आयुष्य कायम झालें असें खात्रीनें वाटूं लागलें होतें. हा दावा खुजवी असावा असें इंग्लंडांतील दोन्हीं पक्षांस वाटत असल्यामुळें हा करारही न्यायाचाच झाला असें इंग्रजांस वाटत होतें. पण अत्यंत आश्चर्याची गोष्ट हीच कीं, या करारास इंग्रज सरकारानें आपली अनुमती दिल्यानंतर सुलतानानें तशी अनुमती देण्याचें साफ नाकारलें. या बाबतींत सुलतानानें घोड चूक केली असें त्याचे प्रधान आणि सुसमंजस प्रजा ह्मणूं लागली. पण सुलतान निराळ्याच रंगांत होता. तो ह्मणूं लागला कीं, मी इंग्लंडवर हा

मराठी ग्रंथ संग्रहालय ... नं. ... ता. ...

राजकीय जयश्च मिळविला. याच विचारांस अनुसरून राजवाड्यास हर्ष झाला व जिकडे तिकडे आनंदाच्या टाळ्या वाजू लागल्या. आतां इंग्लिश सरकार काय करणार याबद्दल सर्व जण विचार करूं लागले. सुलतानाच्या या कृतीनें लार्ड स्यालिसबरी यत्किंचितही डगमगले नाहींत मात्र त्यांस सुलतानाच्या वाईट हेतूबद्दल दुःख झालें.

या गोष्टीस एक वर्ष होतें न होतें तोंच सुलतान साहेबांचे डोळे उघडले. त्यास आतां असें वाटूं लागलें कीं फ्रान्स व रशिया यांनी जो उपदेश केला तो अयोग्य होता व आपणही त्या कामीं मोठी चूक केली. हें कळून येतांच त्यानें इंग्लंडच्या दरबारांतील आपल्या वकिलास असें कळविलें कीं, लार्ड स्यालिसबरी यांची गांठ घेऊन इजिप्तचा प्रश्न पुनः वादविवादास काढण्याबद्दल त्यांस सांगावें. इंग्लंडच्या मुख्य प्रधानांनी स्पष्ट कळविलें कीं, या प्रश्नासंबंधानें वाटाघाट करण्याची आमची इच्छा नाहीं आणि वुल्फ कन्व्हेन्शनला ना कबुली दिल्यानंतर आह्मांसही कांहीं नव्या सूचना करण्याची जरूरी वाटत नाहीं. या जबाबामुळें सुलतान साहेब फार गोंधळून गेले. तुर्की सरकारानें आपल्या वकिलास " " . पुढें आणण्यासाठीं हुकूम करून दिला. पण मुख्य प्रधानांनी स्पष्ट कळविलें कीं 'मी फार कामामुळें त्रासून गेलों आहे व मला विश्रांतिची फार जरूरी आहे. तसेंच हा इजिप्तबद्दलचा प्रश्न आतां कांहीं विशेष महत्वाचा नाहीं तेव्हां त्याचा विचार इतक्या तातडीनें करण्याचें कांहीं कारण नाहीं."

इ. स. १८९६ सालीं ट्यूनिस प्रांतासंबंधानें फ्रान्स आणि इताली यांच्यांत समजी झाली त्यावेळीं असेंही ठरलें होतें कीं या ट्यूनिस प्रकरणीं इंग्लंडनें कांहीं बोलूं नये आणि ईजिप्त प्रकरणीं फ्रान्सनें आळीमिळी गुपचेळी धारण करावी. इतकें कशाला इ. स. १९०४ सालीं इजिप्त वरील इंग्रजी अम्मल फ्रान्सनें स्पष्टपणें कबूलही केला. अर्थात वुल्फकन्व्हेनशन ( करार ) मृतप्राय झाला. अबदुल हमीदला जशास तसें उत्तर मिळालें.

इ. स. १८९२ सालीं सर क्लेरफोर्ड हे तुर्की दरबारांत इंग्रजी वकील असतां इजिप्त संबंधानें पुनः एक प्रश्न उपस्थित झाला. यावेळीं अबदुल हमीदनें डाव टाकला होता पण तो फसला. ईजिप्तचा खेदीव तेफिक याच्या मागून अबास हिल्मी नांवाचा नवा खेदीव नेमण्यांत येणार होता. याच्या नावानें सुलताना कडून नवें फर्मान यावयाचें होतें ही संधी साधून सिनाई द्वीपकल्पाची सरहद्द वाढवून घेण्याचा हमीदचा बेत होता. एल आरीश पासून सुएस पर्यंत सरहद्द करून घेण्याचा हमीदनें आपला इरादा प्रदर्शित केला होता. हा फर्मान तयार झाला पण तो लार्ड क्रोमर यांणीं तपासला नव्हता. हा फर्मान काय आहे हें तो प्रसिद्ध होण्यापूर्वी लार्ड क्रोमर यांस पहावयाचा होता हें काम सर क्लेअरफोर्ड यांच्या हातून झालें नाहीं. हें रजेवर गेलें असतां त्याच्या जागीं काम करीत असलेले सर फेन यांणी हा फर्मान फोर्ड यांस दाखविला होता. या फर्मानमध्यें इंग्रजी हिताविरुद्ध कांहीं गोष्टी होत्या त्या

काढून टाकण्यासाठीं लार्ड क्रोमर यांनी सुलतानास बजावलें व आपला बेत तडीस गेला नाहीं ह्मणून सुलतानानेंही नाइलाजास्तव त्या गोष्टी परत घेतल्या आणि नंतर हा फर्मान केरो येथें प्रसिद्ध करण्यांत आला.

इ. स. १९०६ सालीं ईजिप्त संबंधानें असाच एक घोटाळ्याचा प्रश्न उपस्थित झाला होता. यावेळींही टर्की आणि ईजिप्त या मधील सरहद्द बदलण्याचा प्रयत्न करण्यांत आला. या वेळीं सर निकोलस ओकोनोर हे तुर्की दरबारांत इंग्रजी वकील होते. इझ्झतपाशा नावाचे एक गृहस्थ अबदुल हमीदचे चीफ सेक्रेटरी व मर्जीतले गृहस्थ होते. यांनी सुलतानाच्या हुकुमावरून दमास्कस पासून हेडजेझपर्यंत एक रेल्वे फाटा यात्रेकरूंच्या सोईसाठीं तयार केला. या रेल्वेनें कांहीं तुर्की फौज दमास्कस येथून निघाली व तिनें आकाबा नावाच्या आखाताच्या पश्चिमेस असलेले तबा नावाचें खेडें आपल्या ताब्यांत घेतलें. हें खेडें इजिप्तच्या सरहद्दींत निखालस होतें, सरकारी नकाशे पाहिल्या नंतर तुर्की सरकारास आपली चूक स्पष्ट दिसून येईल अशी आकोनोर यांस खात्री होती. यासंबंधानें बोलाचाली करण्यांत तीन महिने निघून गेले. तरी सुखासमाधानानें या तंट्याचा निकाल होईना तेव्हां ओकोरनो यांणी मे महिन्यांत तुर्की सरकारास नोटिशीनें असें कळविलें कीं दहा दिवसांच्या आंत तबा खेडें रिकामें करून देण्यांत आलें पाहिजे. याच सुमारास या ठिकाणीं इंग्रजी आरमारही आणण्यांत आलें होतें. आपण

याकामीं मोठी चूक करीत आहोंत असें पुन: अबदुल हमीद यांस आढळून आलें. या प्रकरणीं कांहीं तरी तडजोड करा ह्मणजे सुलतानाचें समाधान करतां येईल अशी तुर्की प्रधानानीं ओकोनोर यांची मनधरणी केली. पण ओकोनोर यांनीं आपलेंच ह्मणें खरें केलें. अबदुल हमीदचें सैन्य तबा खेड्यांतून निघून गेलें. या प्रकरणावरून दोन गोष्टींचा उलगडा झाला. तबा हें खेडें इजिप्तच्या सरहद्दींत आहे असें कायमचें ठरलें व ईजिप्तच्या हक्का-संबधानें सुलतानाशीं भांडण्याचा हक्क इंग्लंडला आहे ही गोष्ट सिद्ध झाली.

ईजिप्त प्रकरणांत प्रत्येक वेळीं अबदुल हमीद यास हारच खात्री लागली आहे. वुल्फ कन्व्हेनशनच्या वेळीं ही सुलतानानें उत्तम प्रकारची संधी गमावली होती. मि. ग्लाडस्टन व लार्ड स्यालिसबरी हे दोघेही मुत्सदी नियमित मुदतींत इजिप्त सोडून देण्यास तयार झाले होते पण अबदुल हमीदनें केवळ हेकेखोरपणानें ही संधी गमावली. नंतर इंग्रजी सेनेबरोबर तुर्की सैन्य पाठविण्यासाठीं इंग्रज सरकाराकडून गळ घालण्यांत आली असतांही तें सैन्य त्यानें पाठविलें नाहीं यामुळें इजिप्त वरील टर्कीचा बादशाही हक्कही संपुष्टांत आला. एकंदरीनें पहातां इजिप्त प्रकरणांत अबदुल हमीद कोणत्याही प्रकारची मुत्सदे-गिरी दाखविली नाहीं असेंच मोठ्या दुःखानें ह्मणावें लागतें.

## खलीप.

टर्कीच्या सुलतानास खलीफ ह्मणण्या संबंधानें मुसलमानी लोकमत कसें आहे हें पुढील लेखांत आह्मीं दाखविणार आहोत. हा प्रश्न इंग्रजी साम्राज्यास फार महत्वाचा आहे. या साम्राज्यांत १० कोट मुसलमानांची लोकसंख्या असून त्यांतील ९ कोट मुसलमान टर्कीच्या सुलतानास मुसलमानी धर्माचा पालनकर्ता असें मानतात.

कान्स्टांटिनोपल जिंकून घेणारा दुसरा महंमद याच्या मागून सुलतान झालेला पहिला सेलीम यास खलीफ हा हुद्दा अगर खलीफ आजपासून इ. स. १५१८ त मिळाला.

मुसलमानी धर्म प्रस्थापित करणारा महंमद यानें आपल्या धार्मिक जातींत सर्वोटीपणा रहावा ह्मणून आपला धार्मिक श्रेष्ठपणा कायम राहण्यासाठीं आपल्यामागें गादीवर नवा माणूस नेमण्याची पद्धत सुरू केली होती. याचे पूर्वज काबा या पूज्य स्थानाचे वहिवाटदार होते आणि या ठिकाणा वरूनच मक्का शहरास पवित्रस्थान मानण्यांत येतें. मदीना येथें मशीद असल्यामुळें त्या स्थानास महत्व प्राप्त झालेलें आहे. हीं दोन ठिकाणें मुसलमानी अमलाच्या बाहेर काफीरांच्या ताब्यात गेल्यास जगांतील सर्व मुसलमानी लोक खवळून जातील असा पक्का समज झालेला आहे. या दोन स्थानाहून थोडें कमी दर्जाचें तिसरें पवित्र स्थान ह्मटलें ह्मणजे इराक अथवा

मेसापोटेमिया हें होय. या ठिकाणीं पवित्र इसमांचीं थडगीं आहेत. स्टांबोळ याठिकाणीं पुष्कळ पवित्र मुसलमानांचीं थडगीं आहेत ह्मणून तें स्थानही पवित्र मानण्यांत येतें.

मुसलमानी धर्म स्थापन करणाऱ्या नंतर जे चार खलीफ झाले ते उत्तम बुद्धिवान होतें आणि चारीं जणाचीं नावें निरनिराळ्या मुसल-मानी मशिदींत कोरलेलीं आढळतात.

मुसलमानी धर्मांत दोन महत्वाचे पंथ आहेत. एक सुनी व दुसरा शिया या पंथांत उपपंथ पुष्कळच आहेत. तीस किंवा पस्तीस कोटी मुसलमानांत शियपंथाचे मुसलमान तीस कोटीवर नाहींत. या दोन्ही पंथांचें पुढील गोष्टी संबंधानें ऐक्यत्व आहे. पवित्र शास्त्रानें घालून दिलेलीं कर्तव्यें व विधी यांचें योग्य रितीनें प्रतिपालन केलें पाहिजे; इस्लामी धर्माचा कायदेशीरपणा त्या धर्माच्या संस्थापकाचा मुखत्यार असण्यावरच आहे आणि हाच मुखत्यार मुसलमानी धर्माचा आद्य गुरू होय. या आद्य गुरूस इमामत किंवा खलीफत ह्मणण्याची वहिवाट पडून गेली आहे. या दोन पंथांत महत्वाचा भेद हाच आहे कीं शिया पंथाचें मत प्रार्थना करतांना इमाम हे आत्म्याच्या स्वरूपांत हजर असतात आणि सुनी पंथाचें मत इमाम शरीर धारण करून मुखत्यार ह्मणून प्रार्थनेच्या वेळीं हजर असतात.

महंमदाच्या घराण्यांत जे बारा आचार्य झाले त्यांचे जे अनुयायी

ह्मांस 'शिया' असें ह्मणतात. शियापंथाचे इमाम हे महंमदाची मुलगी फतीमा इचे वंशज होत. या मुलींचें लग्न अली नांवाच्या चवथ्या खलीफाशीं झालें होतें.

सहाव्या इमामाचा मुलगा इस्मायल याच्या अनुयायांनीं आपणांस खऱ्या वंशजापासून फोडून घेतले आणि ते इस्मायलच्या मुलाचे अनुयायी बनले. यानीं जो पंथ स्थापन केला तो खऱ्या इस्लामी धर्मापासून बराच भिन्न आहे. ओबेदुल्ला नांवाच्या इस्मायलच्या एका वंशजानें दहाव्या शतकांत उत्तर आफ्रिकेंत एक गादी स्थापन केली. याच्या वंशजांनीं साम्राज्य बरेंच भरभराटीस आणलें आणि केरो हें त्या साम्राज्याची राजधानी झाली. यांनी आपणांस खलीफ अशी एक पदवी लावून घेतली आणि या काळापासून या वंशजांस 'फती मेद खलीफ' असें ह्मणण्याची वहिवाट पडली. या पंथाच्या मतांची वृद्धि आशिया आणि आफ्रिका या खंडांत फार झाली. पण या पंथाच्या पुढाऱ्यांनी 'खलीफ' ह्मणून जें पद आपणांस लावून घेतलें तें फक्त त्यांच्यांच पंथांत मान्य होतें इतरांस तें मान्य नव्हतें.

या वंशजांचा शेवटचा खलीफ इ. स. ११७१ सालीं ईजिप्त येथें मरण पावला. यानंतर या देशांत सलादीन याणें सुनीपंथ प्रचलित केला व तोच अजूनही चालू आहे.

ज्यू लोकांप्रमाणें सुनी पंथाचें ह्मणणें असें आहे कीं, इस्लामी धर्माचा

क्षण कर्ता अजून जन्मास यावयाचा आहे. सुनी धार्मिक शास्त्रा प्रमाणें 'धार्मिक शिक्षण देण्यासाठीं इमाम जातीनें हजर असला पाहिजे आणि अशाप्रकारें प्रार्थनेच्या वेळीं इमाम हजर नसेल तर धार्मिक सद्गुण ज्यांच्या अंगीं वसत असतील असे सूज्ञ गृहस्थांतरीं हजर असले पाहिजेत.' असें मानलें आहे. इस्लामी धर्म शाश्वत राहण्यासाठीं स्वर्गीय कायद्यानें खलीफतची नेमणूक झालेली आहे अर्थात खलीफ ह्मणून कोणी तरी असलाच पाहिजे. सार्वजनिक प्रार्थनेच्या वेळीं खलीफ हजर असलेच पाहिजेत आणि हा नियम तुर्की राज्यांत अबाधित पाळण्यांत आलेला आहे.

मुसलमानी धर्माचा संस्थापक महंमद आजारी पडला असतां त्यानें अबुबकर यांस आपला मुखत्यार ह्मणून प्रार्थनेच्या वेळीं पाठविला. महंमदाच्या मृत्यू नंतर त्यांनीच ठरविलेला अबुबकर हा पहिला खलीफ झाला. सर्व मुसलमानांच्या अनुमतीनें यांस या गादीवर स्थापन करण्यांत आलें. हीच वहिवाट पुढें चालू होती.

हा खलीफ सुनी पंथाचाच असला पाहिजे व त्याच्यावर संसारिक उपाधींचा दाब नसला पाहिजे. महंमदी धर्म संस्थापक आरबस्थानांतील कोरीश जातीचा होता तेव्हां त्या जातीतील खलीफ होण्यास अडचण मुळींच नाहीं. कित्येकांच्या मतें तर हा खलीफपणा कोरीश जातींतच राहिला पाहिजे, पण या संबंधानें बराच मतभेद आहे

अबूबकर यानें ओमार यास आपल्या मागून गादीचा मालक केलें व ही नेमणूक सर्व मुसलमानांस पसंत झाली. एका मारेकऱ्यानें जखमी केल्यामुळें ओमार हा लवकरच मृत्यू पावला. आपल्या मृत्यू पूर्वी याने सहा जणांची एक कमेटी नेमली होती. या कमेटीनें ओसमान यांस ही गादी दिली व याची नेमणूकही लोकांस मान्य झाली. ओसमानच्या मृत्यूनंतर महंमदाचा जावई अल्ली यांस ही गादी देण्यात आली. ही नेमणूकही सर्वांस पसंत झाली. पण इतक्यांत त्याच्या विरुद्ध बंड झालें. या बंडांत एका मारेकऱ्यानें अल्लीस ठार मारलें. अल्ली हा ६६१ त मृत्यू पावल्या नंतर हसन पासून मुआवीया यांस खलीफची पदवी मिळाली. हा हसन अल्लीचा श्रेष्ठ चिरंजीव होय. ओमेयाद व मुआवीया यांच्यांत खलीफ पदवी संबंधानें मोठा तंटा लागला. ओमेयादच्या वंशजाचा ७५६ मध्यें पूर्ण पराभव झाला. या नंतर अबासिद हें घराणें पुढें आलें. या घराण्यानें बगदाद येथें गादी स्थापून तेथेंच ५०० वर्षे पर्यंत मुसलमानी लोकांवर धार्मिक श्रेष्ठत्व चालविलें यावेळीं बगदाद हें फार मोठें शहर होतें येथें फार व्यापार चालत होता व बुद्धिवान लोकांचें तें एक ठिकाण होतें. खलीफच्या नेमणुकीं संबंधानें जे नियम आहेत ते याच ठिकाणीं तयार केलेले आहेत. यावेळेपासून सुनी पंथ या खलीफास सर्व दृष्टीनें श्रेष्ठ मान देतो. खलीफ ही पदवी दोन ठिकाणीं वाटली जात नाहीं असें याच वेळीं ठरलेलें आहे. अर्थात एकाच वेळीं दोन खलीफ असणें

शक्य नाहीं. खलीफाची निवड होणें जरूरीचें असतें आणि ही निवड मोठ्या उत्सवानें करण्यांत येते.

तारतार तुर्की लोकांनी इ. स. १२५८ सालीं बगदाद शहरावर हल्ला केला व त्याचा नाश केला. या वेळेपर्यंत खलीफ हा पदवी बगदादच्या राज्यकर्त्यास लावण्यांत येत होती. यासाठी त्यावेळचा खलीफ आणि त्याचे वंशज येथें उडालेल्या कत्तलींत नष्ट झाले. या भयंकर स्वारीनें ग्रीक बादशाहीस बराच धक्का बसला पण मुसलमानांचा फार नाश झाला. झेंगिशखान हा आशिया मायनर प्रांतांत आला त्यावेळीं बगदाद येथील खलीफाच्या अमलांत बौद्धिक चळवळ फार जोराची होती. ज्ञान, कलाकौशल्य आणि हस्त कौशल्य यांची या ठिकाणी भरभराट होती. या शहराच्या आसपासचीं गांवें लोकवस्तीनें भरून गेलीं होतीं आणि इस्लामी धर्म अत्युच्च शिखरास पोंचला होता. झेंगिझखानाच्या मागून हुलाकुश गादीवर आला. त्यानें बगदादच्या खलीफास आपल्या तबूत बोलावून सर्व शहर लुटलें. या ठिकाणीं अशी लुटालुट केल्यावर तो ख्रिस्ती धर्मयुद्ध करणारांकडे वळला. पण या ख्रिस्ती लोकांस इजिप्तच्या सुलतानाचा पाठिंबा असल्यामुळें हुलाकू यांस कांहीं करता येईना.

खलीफ ही पदवी पाच शतकेपर्यंत आब्बास घराण्यांत चालत होती. या घराण्यांतील एक माणूस कत्तलींतून निसटला होता. या गृहस्थास केरो तेथें पाचारण करण्यांत आलें व त्यास खलीफ ही पदवी

देण्यांत आली. हा महोत्सव फार चित्ताकर्षक आणि पवित्र असा झाला. या नव्या खलिफाच्या नावानें नाणीं पाडण्यांत आलीं आणि रोजच्या प्रार्थनेंत त्याचें नाव येऊं लागलें. या खलीफानें इजिप्तच्या सुलतानास काळा झगा आणि सनद दिली. या दानावरून त्यानें आपला अधि-कार सुलतानास दिला असें मुसलमान मानूं लागले.

अशा रीतीनें स्थापन झालेली ही आबास खलाफत सुमारें २॥ शतकें कैरो येथें चालू होती. इजिप्तचा नवा सुलतान गादीवर आला म्हणजे त्यास काळा झगा व सनद मिळत असे. हीं चिन्हें मिळालीं म्हणजे सुलतान खलीफाचा हक्क चालवीत असे. धार्मिक मंत्री किंवा न्यायाधीश यांच्या नेमणुका सुलतानांच्या सम्मतीनें होत असत.

महंमदाचा दुसरा वंशज पहिला सलीम याणें १४५३ सालीं कान्स्टांटिनोपल जिंकलें. यास उसमानचो तरवार १५१२ मध्यें देण्यांत आला. यापूर्वी २० वर्षे पर्यंत इजिप्तमध्यें सुलतानांनीं नुसती मोंगलाई सुरू केली होती तेव्हां त्या देशांतल प्रजेच्या कांहीं प्रमुखांनी सेलीम यांस हा देश काबीज करण्यांबद्दल आमंत्रण दिलें. त्यानें निःसशक्त बनलेल्या सुलतानास उडवून ठाकून तो प्रांत तुर्की साम्राज्यास जोडला. सुनी पंथाच्या कागद पत्रावरून असें दिसतें कीं, हा सेलिमच खलीफाचा अधिकार चालविण्यास योग्य होता तेव्हां इजि-

मच्या खलिफांनी १५१७ मध्यें खलिफचा अधिकार तुर्की साम्राज्याचें प्रतिपालन करणाऱ्या सलिमास दिला. याच वर्षी मेक्का येथील शेरिफानें सेलीम यांचें सन्मान पूर्वक श्रेष्ठत्व कबूल केलें अर्थात मदीना मक्का वगैरे पवित्र शहरांचें प्रतिपालन करण्याचा हक्क सेलीमला प्राप्त झाला. मदीना व मक्का येथें त्याच्या नावानें प्रार्थना होऊं लागल्यामुळें सेलीम कायमचा खलीफ बनला. या नंतर त्याची राज्यकरण्याची जागा जें कान्स्टांटिनोपल शहर त्यास ' दर-उल-खेलाफत ' असें ह्मणण्यांस येऊं लागलें आणि मुसलमान लोक त्यास ' इस्लाम बोल ' ( इसलामचें शहर ) असें ह्मणूं लागलें. येणें प्रमाणें खलीफ ही पदवी तुर्की सुलतानास प्राप्त झाली.

तुर्की सुलतानास खलीफ पदवी प्राप्त झाली पण त्याबद्दलही पुष्कळ लोक शंका काढीत आहेत. रेव्ह. ह्यूजेस हे ख्रिस्ती गृहस्थ याविषयीं बरेंच साशंक आहेत. हे गृहस्थ हिंदुस्थानांत पुष्कळ फिरलेले आहेत व त्यास तुर्की सुलतान हाच खात्रीनें खलीफ होय असें निर्विवाद सिद्ध करून देणारा कोणीही मिळाला नाहीं असेंच मत एड्वर्ड यांचेंही आहे.

खलीफाच्या अंगी कोणते सद्गुण असले पाहिजेत हे प्रत्येक मशिदींत जतन करून ठेविलेले असतात. सदर कागद मशिदींतून काढून टाकावेत असा एक हुकूम अबदुल हमीद यांणीं एके वेळीं काढला. यावर एक प्रसिद्ध मुसलमान ह्मणतो कीं आझांम अबदुल हमीद मूर्ख

समजतों कीं काय ? हे उतारे आह्मी पाठ करून ठेवलेले आहेत तेव्हां ते उतारे काढून नेले तरी आह्मी शिक्षणच्या वेळीं त्याबद्दल शिक्षण देणारच. '

## प्यान—इस्लामिझम.

धार्मिक पुस्तकांत नमूद केलेल्या गोष्टी विरुद्ध जेव्हां अबदुल हमीद एखादी गोष्ट करूं इच्छित असे त्यावेळीं तेथील उलेमा ( धर्म-गुरू ) त्यास जोराचा विरोध करीत असत. उदाहरणार्थ पुढील गोष्ट पहा. खलीफाच्या अंगीं कोणचे गूण पाहिजेत हें ज्या कागदपत्रांत लिहिलेलें होतें ते कागदपत्र मशीदींतून काढून टाकावे असा हुकूम सोडतेवेळीं त्यानें त्याबद्दल उलेमा यांचें मत विचारलें होतें. या हुकुमांत टर्कीच्या गादीवर बसण्याचा जो मामूल हक्क होता तो बदलण्याचा त्याचा विचार होता. पण उलेमा यांणी विरुद्ध मत दिल्यामुळें इंग्लिश-मध्यें गादीच्या वारशासंबंधानें जी व्यवस्था आहे तीच तुर्कस्थानांतही सुरू व्हावी ही त्याची इच्छा निष्फळ झाली.

हिंदुस्थानांतील मुसलमानी प्रजेंत असंतोष उत्पन्न करण्याचा अबदुल हमीद यानें प्रयत्न केला होता या संबंधानें लार्ड डफरिन यांस असें आढळून आलें कीं अबदुल हमीद यानें इलदिझ येथें एक छापखाना सुरू केला असून त्यांत जाहिराती व लहान लहान पुस्तकें छापलीं जातात. या जाहिराती व हीं पुस्तकें आफगाणिस्थान व हिंदु-

स्थान या देशांत फुकट वाटलीं जातात. या प्रकरणीं लार्ड डफ्रिन यांनीं स्वत: सुलतानाची गांठ घेतली व त्यास असें बजावलें कीं ' अशा प्रकारच्या जाहिराती किंवा पुस्तकें तुह्मी आफगाणिस्थान किंवा हिंदुस्थान या देशांत पाठवूं नयेत. आणि यापुढें असा प्रयत्न करण्यांत आला तर तो प्रयत्न मित्रत्वाला विघातक आहे असें इंग्रज सरकार मानील. इंग्रजी साम्राज्यांतील मुसलमानांस योग्य तीं स्वतंत्रता देण्यांत येईल तसेंच इंग्रजी वागणुकीवर मुसलमानांचा पूर्ण विश्वास आहे हीही गोष्ट सुदैवानें चांगली आहे. पण साम्राज्यांतील मुसलमानांच्या धार्मिक विश्वासांत बाह्य देशामार्फत ढवळाढवळ करण्यांत येईल तर ती गोष्ट इंग्रज सरकार कधींही सहन करणार नाहीं. '' इतका प्रकार झाला तरी अबदुल हमीदनें आफगाणिस्थान व इतर ठिकाणीं धार्मिक असंतुष्टता उत्पन्न करण्यासाठीं आपले हेर पाठविले होते.

प्यान् इस्लामिझमचा प्रसार करण्यासाठीं अबदुल हमीदनें जे जे प्रयत्न केले ते सर्व फुकट गेले. गेल्या ४० वर्षांत हिंदुस्थानांतील पुष्कळ प्रतिष्ठित मुसलमान तुर्कस्थानांत गेले होते व त्या ठिकाणीं आपणास कांहीं विशेष महावकास मिळेल असें त्यांस वाटलेंही होतें पण ते सर्व पूर्ण निराशेनें परत आले. तुर्कस्थानांतील मुसलमानांनी त्यांचें चांगलें आदरातिथ्य केलें. पण ' इस्लामबोल ' येथें राज्यकारभार अव्यवस्थित रितिनें चालू असून न्यायाचीं कोर्टें तर शुद्ध फार्स आहेत असें त्यांस आढळून आलें होतें.

प्यान इस्लामिझम याचा अर्थ धर्म रक्षणार्थ शक्तीचाही उपयोग करणें हा आहे तेव्हां अशा अर्थी या पंथाचा प्रसार अब्दुल हमीदच्या कारकीर्दीत झालेला नाहीं. पूर्व कालीं महंमदी धर्माचा प्रसार तरवारीनें कितीही झाला असला तरी पूर्वात्य देशांत ख्रिस्तानुयायांकडून जो जुलूम झाला त्याच्या प्रतीकारार्थ त्याचा जन्म झालेला होता हे कोणासही कबूल करावें लागेल. फक्त धर्म प्रसारार्थ हातीं शस्त्र घेण्याचा काळ आज निघून गेलेला आहे सेनूसी, महादी आणि दुसऱ्या कित्येक व्यक्तींनी आफ्रिका, आरबस्थान व इतरत्र असा धर्म प्रसार केला आहे. पण हा प्रसारही पूर्व कालीन साधा भोळा इस्लामी धर्म प्रचारांत यावा एवढ्याचसाठीं झालेला आहे असें पुष्कळांचें मत आहे.

तुर्कस्थानांत दरवेशी जातींत इस्लामी धर्माचा साधेपणा आणि ईश्वरी ज्ञान फार चांगल्या तऱ्हेनें आढळून येतें. या जातींत हा धर्म किती श्रेष्ठत्वास गेला आहे हें युरोपियनासारख्या परस्थास समजणें कठीण आहे. दरवेशी जातींत मेहेलविस म्हणून एक पोट जात आहे. त्यांत तर सर्व धर्मांबद्दल सहानुभूति बाळगण्यांत येतें. ही जात फार पुरातन काळची आहे व या जातीचा धर्मगुरु कित्येक शतकें कोनिया येथें राहत असे.

दरवेशी जातीच्या धर्म प्रेरणेनेंच प्यान इस्लामझिम हा द्वाड पंथ जोरांत आला नाहीं. धर्म प्रसार जर करावयाचा असेल तर त्यांत राजकीय हेतू असतां कामा नये असें पुष्कळ मुसलमानांचें मत आहे.

**भाग १ ला. समाप्त.**

# प्रतिज्ञेवर प्रेमदर्शिका.

नाट्यकला प्रसारकमंडळी खेळ करीत असून अत्यंत
लोकप्रिय झालेलें रा. ना. वि. कुलकर्णी
कृत नवीन सचित्र साग्र संगीत

# पार्थ-प्रतिज्ञा नाटक.

REFBK-0017809

कागद ग्लेज रंग [illegible], पो स्टे. पां.
खर्च २ आणे [illegible] र प्रेमदर्शिका
दहा आणे वि[illegible]क्षीस ठेविलें
आहे. याशिवाय नवीन संगीत नाटकें, कादंबऱ्या,
वैद्यक व ज्योतिष ग्रन्थ वगैरे सर्व प्रकारचीं
पुस्तकें सवलतीच्या दरानें
विकत मिळतील.

**मिळण्याचा ठिकाणा**

## मेसर्स पी. वी. पाठक आणि कंपनी.

**हेड ऑफिस पारोळा--खानदेश.**

ब्रांच, मुगभाटलेन, गिरगांव, मुंबई नं. ४.